वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



१९ ऑगस्ट



२० ऑगस्ट

# मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट २०१३ । किंमत १५ रुपये

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक










सर्व वाचकांना स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!









साहित्य क्षेत्रातील संस्मरणीय आनंदयात्रा -

# मेहता मराठी ग्रंथजगतचा
# दिवाळी अंक २०१३

## या अंकात आपल्या वाङ्‌मयीन सर्कलबद्दल, अनुभवांबद्दल लिहिणार आहेत खालील मान्यवर -

- डॉ.द.भि.कुलकर्णी
- डॉ. श्रीपाल सबनीस
- डॉ. अनुराधा औरंगाबादकर
- डॉ. आनंद पाटील
- प्रा. अनंत मनोहर
- स्वाती चांदोरकर
- अंजनी नरवणे
- डॉ. संजय ढोले
- न्या. एस.व्ही.नाईक
- शकुंतला फडणीस
- शंकर सारडा
- महावीर जोंधळे
- संजय भास्कर जोशी
- मंजूषा आमडेकर
- डॉ.संतोष मुळावकर
- श्याम भुर्के
- डॉ. वासुदेव मुलाटे

आणि इतरही अनेक

**किंमत १००रु.**

ऐन दिवाळीच्या आनंदात भर टाकणारा वाङ्‌मयीन उत्सव

DIGITAL EDITION

SAVE PAPER, SAVE TREE

# मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट २०१३ | वर्ष तेरावे | अंक आठवा

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| दखल | १२ |
| साहित्यवार्ता | १६ |
| पुरस्कार | ५६ |
| स्मृतीची चाळता पाने | ६१ |
| पुस्तक परिचय | ६८ |
| अभिप्राय | ९२ |
| इंग्रजी पुस्तक परिचय | ९८ |
| श्रद्धांजली | १०२ |
| बालनगरी | १०९ |

संपादक :
सुनील मेहता
कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
पल्लवी धामणे-रेखी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
मेहता
पब्लिशिंग
हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension (ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३
E-mail : info@mehtapublishinghouse.com

वार्षिक वर्गणी १००रु. तीन वर्षांसाठी ३००रु. पाच वर्षांसाठी ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

# जागतिकीकरणाच्या लाटेत अभिजात भाषेचा आवाज बुलंद

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून आपले प्रयत्न चालू आहेत. मराठी भाषेच्या विकासाचे नवनवे मार्ग समोर येत आहेत.

सर्जनशील लेखकांच्या प्रतिभेला आपल्याकडे सहजपणे दाद वा मान्यता मिळते असे नाही आणि अशी दाद विलंबाने मिळाली तरी आर्थिकदृष्ट्या त्याला त्या मान्यतेचा पुरेसा फायदा त्याच्या उमेदीच्या काळात मिळण्याची शक्यता तर क्वचितच संभवते. आताआतापर्यंत मराठी भाषेतील एकूणच ग्रंथव्यवहार हा फार मर्यादित होता. हजार पंधराशे प्रतींची आवृत्ती संपायला पाच-दहा वर्षे जात. हजार-दोन हजार रुपये मानधन मिळाले तर मोठीच लॉटरी लागल्याचा आनंद लेखकाला होई. त्यामुळे आपली नोकरी वगैरे सांभाळून, घर चालवण्याची तुटपुंजी का होईना तरतूद करून फावल्या वेळात हौस म्हणून लेखन करण्याचीच वहिवाट होती. लेखन हा पूर्णवेळ व्यवसाय वा निर्वाहाचा मार्ग म्हणून स्वीकारणारे लोक अत्यल्प आणि अपवादात्मकच असत. १९६५ पर्यंत तर शाळा-कॉलेजच्या पाठ्यपुस्तकांमधून होणाऱ्या फायद्यावरच प्रकाशन व्यवसायाची मुख्य मदार होती. त्या नफ्याच्या बळावर हौस म्हणून कथा-कादंबऱ्या आणि ललित लेखन पुस्तकरूपात प्रकाशित होई. त्यावेळी उच्चशिक्षित वर्ग हाच केवळ पुस्तके विकत घेऊन वाचणारा, पुस्तकांचा संग्रह करणारा, विशिष्ट ज्ञानशाखांचा पाठपुरावा करणारा असे. स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक शिक्षणाच्या सुविधा वाढत राहिल्या. महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर साठोत्तरी काळात आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना मोफत किंवा सवलतीच्या शुल्कात शिक्षण उपलब्ध झाले. राखीव जागांमुळे शासकीय सेवेत कनिष्ठ वर्गाला उच्चपदे मिळण्याची प्रक्रिया सार्वत्रिक व सुलभ झाली. मंडल आयोगामुळे इतर दुर्बल घटकांनाही उच्च अधिकारपदे मोठ्या प्रमाणावर मिळू लागली. तशात शहरीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण आणि माहितीतंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांती यामुळे उच्च शिक्षणाचा आर्थिक सुबत्तेचा लाभ

मिळालेला मोठा वर्ग वाचन-रंजन-फॅशन-पर्यटन यासारख्या गोष्टींकडे अधिक लक्ष देऊ लागला. पुस्तकांचा खप हा वरिष्ठ वा उच्च वर्गापुरता सीमित राहिला नाही. रंजन, फॅशन, पर्यटन, हॉटेलिंग- या गोष्टी बऱ्याच लोकांच्या आटोक्यात आल्या. तशात मोबाईल, इंटरनेट, तंत्रज्ञान, ई-बुक्स, दूरदर्शन, यामुळे अद्ययावत तंत्रज्ञानाची गोमटी फळे सुलभ, स्वस्त, सर्वत्र उपलब्ध झाली. शहर-खेडी यातले अंतर कमी होऊ लागले. नवे पर्याय समोर येऊ लागले. मायक्रोसॉफ्ट, गुगल, ॲपल, इन्टेल, ॲमेझॉन, याहू, नोकिया, सॅमसंग, सोनी, फेसबुक वगैरे संस्थांनी, डिजिटल तंत्रज्ञानाने तसेच नवनवी साधने, उपकरणे, सुविधा यांनी जागतिक माध्यमक्रांती घडवून आणली.

डिजिटल तंत्रज्ञानामुळे इंग्लिश भाषा ही जागतिक केंद्रभाषा होणार असे प्रथमत: समजले गेले. प्रादेशिक आणि बोलीभाषांचे महत्त्व कमी कमी होत जाणार आणि काही भाषा लुप्त होणार अशी शक्यताही अनेक भाषा-अभ्यासकांना भेडसावू लागली.

कुठल्याही भाषेचे वैभव तिच्या शब्दसंपत्तीवरून ठरते. भाषेत नवनव्या शब्दांची सतत भर पडत असते. नव्या शब्दांना सामावून घेण्याची क्षमता जितकी जास्त तितकी ती भाषा प्रगत होत जाते. गेल्या काही शतकात इंग्रजी भाषा या दृष्टीने जागतिक भाषेकडे घोडदौड करीत आहे; संगणक-इंटरनेटमुळेही या भाषेचा वापर वाढत्या प्रमाणावर होऊ लागला आहे. त्याचबरोबर अनेक बोलीभाषा व्यवहारातून अस्तंगत होत चालल्या आहेत, असेही भाषाशास्त्रज्ञांचे निरीक्षण आहे. मराठीचा विचार केला तर बोलीभाषांमध्ये निवेदन किंवा संभाषणे असणाऱ्या कादंबऱ्यांची संख्या वाढत आहे. पूर्वी या बोलीभाषांमध्ये लेखन करायचे लोक टाळत होते. प्रमाण भाषेतलेच लेखन प्रकाशित करण्याकडे प्रकाशन संस्थांचा कल असे. पुढच्या काही दशकात एकूणच जागतिक पातळीवर भाषांचे काहीतरी व्यवस्थापन होणे अपरिहार्य आहे. शंभर कोटी लोकांची चिनी भाषा ही दहा वर्षांपूर्वी प्रथम क्रमांकावर होती. त्या खालोखाल इंग्रजी (५० कोटी), हिंदी (४८ कोटी), स्पॅनिश (४० कोटी), रशियन (२८ कोटी), अरबी (२४ कोटी) बंगाली (२० कोटी), पोर्च्युगीज (१८ कोटी), इंडोनेशियन (१७ कोटी), जपानी (१३ कोटी), फ्रेंच (१२.७ कोटी), जर्मन (१२.७ कोटी), उर्दू (११ कोटी) यांचे क्रम होते. पंजाबी, कोरियन, तेलुगू, मराठी तमीळ, बोलणाऱ्यांची संख्या प्रत्येकी दहा कोटींच्या दरम्यान होती. जगातील पहिल्या वीस भाषांमध्ये आठ भारतीय भाषांना स्थान होते.

मराठी भाषेतील साहित्याला गेल्या वीस वर्षांत चांगलाच बहर आला असून, ग्रंथव्यवहाराची एकूण उलाढालही वेगाने वाढत आहे. एक ज्ञानभाषा म्हणून मराठीची वाटचाल चालू आहे. जगातील दहा-बारा देशांमध्ये मराठी माणसांचे

लक्षणीय वास्तव्य आहे. इंटरनेटवरून सोशल नेटवर्किंगमध्ये त्यांचा सहभाग लक्षात येण्याजागा आहे.

मराठीच्या भविष्यासंबंधीही अनेक पातळ्यांवर विचारमंथन चालू आहे. वेगवेगळ्या प्रकारचे ज्ञानकोश, शब्दकोश वगैरे सिद्ध होत असून त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मराठीत पारिभाषिक शब्दांचे कोशही संध्या तयार होऊ लागले आहेत. भाषा संचालनालयाने विविध विषयांवरच्या पारिभाषिक संज्ञांचे तीसावर कोश प्रकाशित केले आहेत. ज्ञानभाषा मराठीला ते पायाभूत ठरणारे आहेत.

डिजिटल तंत्रज्ञानाने इंग्लिशचे वर्चस्व वाढत चालले आहे– हे खरे आहे. चीन, जपान, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांमध्येही त्यामुळे इंग्रजीला शालेय शिक्षणात सामावून घेण्यात आले. तेव्हा महाराष्ट्रात मराठी ऐवजी इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे पेव फुटावे यात आश्चर्य काय? परंतु गुगलने सर्वच भाषांतील पुस्तकांचे डिजिटायझेशन करण्याचे ठरवून लाखो दुर्मिळ पुस्तके उपलब्ध करून दिल्याने प्रादेशिक आणि बोली भाषांना नवे जीवन मिळाले.

भारतीय भाषांच्या टंकलेखनात सुसूत्रता आणण्याचे काम गुगलने हातात घेतले आहे. ते जमले की कोणालाही इंटरनेट वापरणे सोपे होईल. डॉ. गणेश देवी यांच्यासारख्या संशोधकामुळे भारतातील अनेक भाषांच्या अभ्यासाला चालना मिळाली. मराठीच्या बोलीभाषांकडे, आदिवासी बोलीभाषांकडे लक्ष वेधले गेले. जागतिकीकरणामुळे इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढून इतर भाषा निष्प्रभ होत जातील हे गृहीत बरोबर नाही असे आता म्हणावे लागते.

सामान्य व्यवहाराची, राज्यकारभाराची, अर्थसत्तेची, माध्यमांची भाषा म्हणून मराठीला नव्याने झळाळी प्राप्त होऊ शकेल. मराठी प्रतिभावंतांना आणि सत्ताधीशांना ते कसे जमते ते बघायला हवे. अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी बरेच लॉबिंग करावे लागते. कन्नड, तेलुगु, मल्याळम् , तमीळ या दक्षिणेतील भाषांना तेथील राज्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळे अभिजाततेची मान्यता मिळाली. तसा प्रयत्न आपले विद्यमान नेते करू शकतील का याबद्दल साशंकता वाटते. प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात मराठी भाषा समितीने आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. या अहवालाचे इंग्रजी भाषांतर करून तो साहित्य अकादमी, केंद्र सरकार यांच्या शिफारशीनंतर अंतिम टप्पा गाठू शकेल. आपण त्या दृष्टीने आपला बुलंद आवाज उठवायला हवा.



# 20% Flat Discount on all English Titles




Fiction
Paperback
Pages : 296
978-81-8498-493-4
August, 2013
Rs. 300.00




Fiction
Paperback
Pages : 154
978-81-8498-466-8
April, 2013
Rs. 200.00




Health & Personal Development
Paperback
Pages : 256
978-81-8498-462-0
June, 2013
Rs. 300.00




Fiction
Paperback
Pages : 284
978-81-8498-464-4
April, 2013
Rs. 350.00




Autobiography
Paperback
Pages : 180
978-81-8498-491-0
June, 2013
Rs. 240.00


MEHTA PUBLISHING HOUSE
1941, Sadashiv Peth Madiwale Colony,
Near Bajirao Road Telephone Bhavan,
Pune-411 030. (Maharashtra, India)
Tel.: +91 020-24476924, 24460313
E-mail : info@mehtapublishinghouse.com
sales@mehtapublishinghouse.com


**www.mehtapublishinghouse.com**

आगामी




**टी बुक क्लब २३ मधील दुसरे पुस्तक**

# स्टिल लाइफ

मूळ लेखिका **जॉय फिल्डिंग**
अनुवाद **माधव कर्वे**

सौंदर्य आणि श्रीमंती यांचे वरदान लाभलेल्या केसीला एक भरधाव कार उडवून लावते. केसी कोमात जाते; अंथरुणाला खिळते....

केसी पुन्हा भानावर येईल, तिचे पुढे काय होईल, अशा प्रश्नांचा विचार करत केसीचे जवळचे नातेवाईक व खास मित्रमैत्रिणी तिच्याभोवती येत-जात असतात; तिच्याविषयी बोलत असतात. शरीर निश्चल असलेल्या; पण मनाने भानावर असलेल्या केसीला; तिच्याविषयीच्या या बोलण्यातून अनेक रहस्ये उलगडायला लागतात... जीवनमरणाच्या सीमारेषेवर असलेल्या केसीला विलक्षण थरारक घटनाचक्रातून जावे लागते....

केसीची ही कथा केवळ रहस्ये उलगडत नाही, तर मानवी मनाचे कोपरे उत्कंठावर्धक शैलीत आपल्यासमोर उघडे करते.

आगामी




# ॲना आणि सयामचा राजा

मूळ लेखिका **मार्गारेट लॅन्डन**
अनुवाद **माणिक फाटक**

ॲना ही पाश्चात्त्य संस्कृतीत वाढलेली, मानवतावादी मूल्ये जपणारी स्त्री; सयामसारख्या (आताचा थायलंड) बुरसटलेल्या, व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा असलेल्या, रूढी-प्रथांना महत्त्व देणाऱ्या गुलामांच्या देशात इंग्रजी शिकवायला जाते.

सयाममध्ये ॲनाला जुळवून घेणे फार जड जाते, पण तरी व्यक्तिगत आयुष्यातली सुखदु:खे भोगत, ती तिच्या इतरांचे कष्ट दूर करण्याच्या मनोवृत्तीला, ऊर्मीला थांबवू शकत नाही. तिचे उदार अंत:करण आणि अन्यायाविरुद्ध उभे ठाकण्याची वृत्ती यांमुळे सयामचा राजा आणि राजपुत्र प्रभावित होतातच; पण तिच्या पश्चात सयामी जनताही तिची ऋणाईत राहते. तिच्या शिकवणुकीच्या प्रभावामुळेच राजपुत्र सयाममधील अयोग्य चालीरीतींना कायमची तिलांजली देतो आणि सयामला नवी दिशा दाखवतो.

जवळजवळ दीडशे वर्षांपूर्वीच्या कालखंडातली ही हकिकत म्हटली तर अद्भुत; म्हटली तर वास्तववादी —

अंधारात चाचपडणाऱ्या एका समाजाची; मानवतेसाठी संघर्ष करणाऱ्या एका स्त्रीची.

आगामी




# आठवणींचे मोती

मूळ लेखिका **व्हेरा गिसिंग**

अनुवाद
**डॉ. विजया धारवाडकर**

*दुसऱ्या महायुद्धाचा काळ*

जून, १९३९.

व्हेराचा अकरावा वाढदिवस जवळ आलेला असतानाच, अचानक तिला तिचा प्रिय देश सोडून जावं लागतं. आपलं कुटुंब, आई-वडील आणि मित्रमैत्रिणी यांना सोडून व्हेरा सहा वर्षं ब्रिटनमध्ये राहते.

ब्रिटनमधल्या वास्तव्याच्या काळात व्हेरा डायरी लिहायला सुरुवात करते. आई-वडिलांपासून झालेली ताटातूट, त्यांच्या आठवणी, तिच्या आशाआकांक्षा, इच्छा आणि देशासाठी तिने केलेल्या प्रार्थना... असे सगळे ती डायरीत टिपत जाते.

१९४५मध्ये ती मायदेशात परतते तेव्हा तिचे आई-वडील मरण पावलेले असतात. ती इंग्लंडला परतते; तेव्हा तिच्या मनात पुन्हा त्या आठवणी, त्या भावना आणि तो काळ जागृत होऊ लागतो. आणि ती पुन्हा वळते तिच्या डायरीकडे....

प्रतिकूल परिस्थितीमध्ये वाढणाऱ्या एका मुलीची ही करुण, हृदय हेलावणारी भावनिक आंदोलनं म्हणजे हे 'आठवणींचे मोती'!




# बियॉन्ड अग्ली

मूळ लेखिका **कॉन्स्टन्स ब्रिस्को**

अनुवाद **उल्का राऊत**

स्वत:च्या आईनेच कॉन्स्टन्सला 'तू कुरूप आहेस, कुरूप' असं म्हटल्याने तिला अनेक यातना झाल्या होत्या. तिचं शारीरिक, तसंच मानसिक शोषण झालं होतं. पण तिची स्वप्नं आणि तिच्या आशाआकांक्षा यांची झेप मोठी होती. तिची जिद्द चिवट व बळकट होती.

कॉन्स्टन्सने कायद्याचा अभ्यास करण्याकरिता विद्यापीठामध्ये प्रवेश घेतल्यावर तिच्या पुढे प्रश्न होता तो, खर्चाचा; तो कसा भागवायचा याचा? पण अर्धवेळ छोट्या-मोठ्या नोकऱ्या करून तिने हा प्रश्न सोडवला.

त्यानंतर तिला एका चांगल्या, नामांकित कायदेविषयक फर्ममध्ये काम करण्याची संधी चालून आली, पण कॉन्स्टन्सची ही अडथळ्यांची शर्यत सहजसहजी संपली नाही....

केवळ बाह्य सौंदर्याकडे न पाहता; त्यापलीकडे पाहण्याचा संदेश देणारे, अंतर्मुख करणारे कथन.

दखल

# वामन चोरघडे यांची जन्मशताब्दी



मराठीतील एक नामवंत कथाकार आणि १९७९ मध्ये येथे झालेल्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वामन कृष्ण चोरघडे यांच्या जन्मशताब्दीला १६ जुलै २०१३ रोजी आरंभ झाला. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी देवाजीपंत चोरघडे यांच्या घराण्याचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वामन चोरघडे यांनी १९३६ साली मराठीत बी.ए. आणि १९३८ साली एम.ए.झाल्यावर वर्धा येथील महाविद्यालयात अध्यापन कार्य सुरू केले. त्यावेळच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे वातावरण त्यांनाही भारावून टाकणारे होते. १९३० च्या असहकार आंदोलनात त्यांनी स्वःताला झोकून दिले. १९४२ च्या चलेजाव चळवळीत कारावास पत्करला. काका कालेलकर, विनोबा भावे, दादा धर्माधिकारी यांच्या सहवासामुळे त्यांच्या वृत्तिप्रवृत्तींवर गांधीवादाचा अमिट ठसा उमटला. पुढे मात्र त्यांनी नागपूरच्या गोविंदराम सक्सेरिया कॉमर्स कॉलेजमध्ये पुनश्च प्राध्यापक म्हणून काम केले. उपप्राचार्यपदही भूषविले. महाविद्यालयात अध्ययन करीत असतानाच वामनरावांनी ज्योत्स्ना, प्रतिमा या त्यावेळच्या अग्रगण्य मासिकांत कथालेखन सुरू केले. १९३६ साली बीएच्या जोडीनेच 'सुषमा' या कथासंग्रहाद्वारे लेखनक्षेत्रतही पदार्पण करून आपल्या समकालीनांचे लक्ष वेधून घेतले. १९३८ मध्ये हवन, १९४१ मध्ये यौवन, १९४५ मध्ये प्रस्थान, १९४६ मध्ये पाथेय वगैरे संग्रह एकामागून एक निघत गेले आणि त्यांच्या मानवतावादी, उदात्त, मालती दांडेकर, कुमुदिनी प्रभावळकर ध्येयवादी कथांना वाचकांची दाद मिळत राहिली.

फडके, खांडेकर, कुसुमावती देशपांडे, दिवाकर कृष्ण, शांताराम वगैरे कथाकारांच्या प्रभावळीत वैदर्भीय वामन कृष्णांच्या कथा उठून दिसत. साहित्य संमेलनांना ते आवर्जून उपस्थित राहात. व्याख्यानाच्या निमित्ताने सतत भ्रमंती करीत. साहित्यक्षेत्रातील सर्वांशीच त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध असत. गोष्टीवेल्हाळ स्वभावामुळे आणि सौहार्दपूर्ण आचरणाने त्यांनी अनेकांच्या जीवनात फ्रेंड, फिलॉसॉफर, गाइड म्हणून जिव्हाळ्याची भूमिका बजावली. त्यांच्या कथांतील मांगल्याचा आणि मानवी नात्यातील चांगुलपणाचा आविष्कार हृदयाचा ठाव घेई. १९४६नंतर मराठी नवकथेचा जमाना सुरू झाला. प्रभाकर पाध्ये यांनी त्यांना एका पत्रात लिहिले होते,''तुमचे वाङ्मय वाचताना पहाटे दिशा फाकतात, तेज पसरते तसे अंतःकरणात तेज पसरते. त्यांची उत्पत्ती कशी लावायची ते कळत नाही.'' वि.स.खांडेकरांनी चोरघडे यांच्या काही कथा रवींद्रनाथ ठाकूर यांच्या वळणावर जाणाऱ्या आहेत असे म्हटले आहे. वामनरावांना ते मत मान्य नव्हते. ते आपल्याला शरच्चंद्रांच्या संप्रदायातले समजत.

शरच्चंद्र चटोपाध्याय यांच्या लेखनाचे आणि जीवनाचे पडसाद वामनरावांच्या एकूण वाङ्मयीन दृष्टिकोनात आणि निर्मितीत जाणवतात. आवारा मसिहा, कलंदर फकिरी, भ्रमंतीची आणि नवनवीन अनुभव घेण्याची हौस, स्त्रीशक्तीबद्दलचा आदर आणि भक्तिभाव, कष्टकरी आदिवासी, दीनदलितांच्या अवस्थेबद्दलची आस्था आणि तळमळ (''गरिबांबद्दल मला मुद्दाम कळवळा निर्माण करावा लागला नाही. मी तसाच जगत होतो'') यांचा प्रत्यय त्यांच्या कथांतून येतो. सानेगुरुजींचा करुणभाव हा त्यांना शरच्चंद्रांच्या कफल्लकपणासारखा आणि गांधीजींच्या साधेपणाप्रमाणेच प्रिय होता. कथालेखनातले त्यांचे प्रयोगही लक्षवेधक होते. कथानकापेक्षा भाववृत्तीच्या चित्रणाला प्राधान्य देत ते नवकथेच्या दिशेने वाटचाल करीत होते असेही म्हणायला हरकत नाही.

वामनराव उतारवयातही भरपूर भ्रमंती करीत. सभासंमेलनात भाग घेत. ओळख झाल्यावर आठवण ठेवून भेटीगाठींचे सत्र चालू ठेवत. गोष्टीवेल्हाळ, दिलखुलास, रंजक कथनशैली यामुळे त्यांच्या भेटीगाठी संस्मरणीय ठरत. सातारला ते माझ्याकडे कधी कधी येत. त्यांच्या बरोबर काही वेळा प्रवासही घडलेला आहे. त्या सहवासाच्या स्मरणाने आजही प्रसन्नता वाटते. त्यामुळे त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या साहित्याकडे नव्याने लक्ष द्यावे लागेल. त्यांची बरीचशी पुस्तके आज दुर्लभ आहेत. नव्या स्वरूपात त्यांचे संपादन, प्रकाशन होण्याची गरज आहे. १९९५मध्ये त्यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या सहवासाचा लाभ मिळालेली चाळिशी-पन्नाशीतील रसिक चाहत्यांची पिढी अजूनही कार्यरत आहे. शताब्दी निमित्ताने वामनरावांचे एक भव्य स्मारक व्हावे.

# जे न जमे सरकारला,
# ते करू शकते गुगल !

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून सध्या प्रयत्न चालू आहेत. ते उपयुक्तच ठरावेत. मराठी साहित्याच्या प्रसाराच्या आणि भाषाभाषातील संपर्क वाढण्याबाबत 'गुगल' चे सहकार्य आपल्याला अनपेक्षितपणे आणि आश्चर्यकारकरीत्या मिळू शकेल असे वाटते. पुढच्या दोन तीन वर्षात भारत हा सर्वात जास्त इंटरनेट वापर करणाऱ्या देशांमध्ये अग्रगण्य असेल असे 'गुगल' ला वाटते. भारतातील नागरिक हे सुमारे ३२ भाषांचा वापर करतात. याचा अर्थ या भाषांपैकी किमान एक-दोन भाषा प्रत्येकाला लिहितावाचता येतात. ज्या नागरिकांना इंग्रजी येत नाही, त्यामुळे ते आज इंटरनेट वापरू शकत नाहीत. जर त्यांना त्यांच्या भाषेत इंटरनेट वापरण्याची सुविधा मिळाली तर ते इंटरनेट सहजपणे वापरू शकतील. भारतात आता शेकडा ८० लोकांकडे मोबाईल आहेत. भारतीय भाषांच्या लिप्या वेगवेगळ्या असल्याने टंकलेखन करताना वेगवेगळे सॉफ्टवेअर वापरावे लागते. गुगल या बाबत एकसूत्रीपणा आणण्याचा प्रयत्न करीत आहे. मोबाईल, संगणक, स्मार्टफोन यावर भारतीय भाषांत टंकलेखन करण्यात सुसूत्रता आली तर कोणालाही आपल्या भाषेत इंटरनेटचा वापर करता येईल. इंग्रजी शिवाय अडून राहणार नाही. गुगलला त्यामुळे कोट्यवधी नवे वापरकर्ते मिळतील.भारतीय भाषांमधील प्रोमोज आणि व्हिडिओ, जाहिराती, उत्पादनांची माहिती ज्याला जी भाषा येते, त्या भाषेतून बघता येतील.सर्वच भारतीय भाषांना त्यामुळे जीवनदान मिळेल. मराठी आणि तिच्या बोलीभाषा यांचाही अनायासे प्रभाव वाढेल. 'गुगल इंडिया'चाही फायदा होईल. 'गुगल इंडिया' चे कार्यकारी संचालक राजन आनंदन हे त्या दिशेने पावले टाकत आहेत. भारत सरकारला जे जमू शकले नाही, ते 'गुगल' च्या कल्पकतेमुळे जमू शकेल हा विचारच किती थरारक आहे!

**– शंकर सारडा**
**मो. ९८२३२६१०२३**

> पालकांच्या पदचिन्हावरच मुले चालत असतात.
> आईवडिलांना वाचनाची आवड असल्यास
> मुलांनाही वाचनाची गोडी लागते.
> *- ईमलीन बुचवलड*




# छावणी

मूळ लेखक **धीरेन्द्र मेहता**
अनुवाद **अंजनी नरवणे**

*२६ जानेवारी, २००१. भुज.*

*आई-वडिलांचं छत्र नसलेला एक तरुण थोरल्या भावाच्या आणि वहिनीच्या वागण्याने उद्ध्वस्त झालेलं मन सावरायला मित्राकडे जातो, आणि तो बसमधून उतरत असतानाच प्रचंड मोठा भूकंप होतो –*

*दीड मिनिट – हजारो निरपराध जिवांचे मरण... अनेक स्वप्नं उराशी बाळगून कष्टानं उभी केलेली घरकुलं क्षणार्धात जमीनदोस्त...*

*कुणाचे पोटचे गोळे जमिनीत गाडले गेले; कुणाचे जीवनसाथी, कुणाची तरणीताठी मुलं, तर कोणाचं छत्र!*

भक्कम वाटलेला आसरा जातो, आपली वाटणारी माणसंही जातात, तेव्हा माणसं कशी वागतात; त्यातून सावरताना, गुण-दोषांसकट त्यांचे मूळ स्वभाव कसे वर येतात; त्यातून मनुष्यस्वभावाचे वेगवेगळे पैलू कसे दिसू लागतात; यांचे प्रत्ययकारी चित्रण म्हणजे ही कादंबरी.

*कुणीच 'आपलं' न राहिलेल्या, सर्वस्व गमावून बसलेल्या माणसांची ही कथा मानवी स्वभाव व मानवी अस्तित्व यांबद्दल भाष्य करते, नवी दृष्टी देते.*



# साहित्य वार्ता

### O सासवडला रंगणार साहित्य संमेलन

आचार्य अत्रे यांच्या जन्मगावी सासवड येथे ८७वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन डिसेंबरच्या अखेरीस रंगणार आहे. सासवडला प्रथमच हा मान मिळत आहे. कोटीच्या कोटी उड्डाणे न घेता लोकसहभागातून संमेलन यशस्वी करण्याचा दावा संयोजकांनी केला.

अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या बैठकीत सासवडच्या यजमानपदावर शिक्कामोर्तब करण्यात आले. 'संमेलनासाठी सासवड आणि पिंपरी-चिंचवड या ठिकाणाहून प्रस्ताव दाखल झाले होते. तेथील भेटीनंतर सासवडला पसंती देण्यात आली,' असे महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य यांनी सांगितले. नियोजित संमेलनाचे संयोजक असलेल्या आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते म्हणाले, 'आचार्य अत्रे यांच्या जन्मशताब्दीपासून, म्हणजेच १९९८ पासून संमेलन सासवडला भरावे, यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो. पुरंदर हा दुकाळी तालुका आहे. संमेलनाच्या निमित्ताने होणारी कोटीच्या कोटींची उड्डाणे, त्यावर केली जाणारी टीका, याचेही आम्हाला भान आहे.'

### O मराठीच्या १२ बोलीभाषा

महाराष्ट्रात मराठीव्यतिरिक्त ३८ भाषा बोलल्या जातात, असे बडोदे येथील 'भाषा संशोधन आणि प्रकाशन केंद्रा'ने केलेल्या सर्व्हेमध्ये आढळले आहे. हा सर्व्हे ऑगस्टमध्ये प्रसिद्ध होणार आहे.

मराठीच्या १२ बोली आणि आदिवासी व अन्य जाती जमातींमध्ये बोलल्या जाणाऱ्या ३८ भाषा महाराष्ट्रात वापरल्या जातात. हिंदी भाषक पट्टा, पश्चिम बंगाल, तमिळनाडू आणि आंध्र प्रदेश या राज्यांत बोलल्या जाणाऱ्या भाषांची संख्या अधिक आहे, असे नागरिक भाषा सर्व्हेचे अध्यक्ष गणेश देवी यांनी म्हटले आहे. हिंदी भाषक पट्ट्यात हिंदीव्यतिरिक्त ३०, पश्चिम बंगालमध्ये बंगालीव्यतिरिक्त २६ आणि

आंध्र प्रदेशात तेलुगूव्यतिरिक्त १८ भाषा बोलल्या जातात.

देशात सर्वाधिक ९० भाषा अरुणाचल प्रदेशात बोलल्या जातात. त्या पाठोपाठ आसाम आणि ओरिसाचा क्रमांक लागतो. राज्यात १८व्या आणि १९व्या शतकात परकीय हस्तक्षेपाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे महाराष्ट्रात अधिक भाषा टिकल्या, असे देवी यांनी स्पष्ट केले.

देशाच्या काही भागात तेथील स्थानिक भाषांची जागा हिंदीने घेतली आहे. तसे महाराष्ट्रात झाले नाही. उलट येथील अन्य भाषा जिवंत राहण्यासाठी मराठीकडूनच मदत केली जाते, असे ते म्हणाले. '१९७० पासून ग्रामीण आणि दलित लेखकांनी मराठी साहित्यात योगदान देण्यास सुरुवात केली. तेव्हापासून मराठीची वाढहोण्यास सुरुवात झाली. पारधी आणि कैकाडीसारख्या भाषांनाही स्वतंत्र ओळख मिळाली. त्यामुळे भाषांना सांस्कृतिक आत्मविश्वास मिळाला,' असे देवी यांनी म्हटले.

महाराष्ट्रातील नागरीकरणामुळे येथे बोलल्या जाणाऱ्या मराठीची शैली आणि लय यांच्यातही वेगाने फरक पडला. स्थलांतरामुळे मराठी शुद्धलेखनही लवचिक झाले, असे निरीक्षण देवी यांनी नोंदविले.

## O 'सेल्फमेड मॅन' डीव्हीडीचे प्रकाशन

डी. एस. कुलकर्णी यांच्या व्याख्यानाच्या 'तुम्ही (बि) घडाना' या डीव्हीडीच्या प्रकाशनाच्या वेळी 'डीएसके सेल्फ मेड मॅन' पुरस्कार दै. पुण्यनगरीचे संस्थापक मुरलीधर शिंगोटे यांना बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. बाबासाहेब पुरंदरे म्हणाले, ''आयुष्यात कितीही प्रतिकूल परिस्थिती आली तरी माणसाने कष्ट करीत राहिले पाहिजे. चंगळवादी वृत्ती न बाळगता बेचैन जगले पाहिजे. मी पुस्तकांची पेटी डोक्यावर घेऊन पुस्तके विकली आहेत, पण कधी कुणाकडे देणगी मागितली नाही.''

डी. एस. कुलकर्णी यांनी फोन पुसण्याच्या 'टेलिस्मेल'च्या व्यवसायापासून आरंभ करून डीएसके ग्रुपचा केलेला विस्तार विशद केला. त्यांनी सांगितले, ''आचार्य अत्रे, ना. ग. गोरे, कॉम्रेड डांगे, यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणांचे माझ्या मनावर खोलवर संस्कार झाले. आपली गरिबी आपण आपल्याच मानसिकतेतून निर्माण करीत असतो. तेव्हा कोणतेही काम करण्यात कमीपणा वाटू न देता ते करण्याची मानसकिता आवश्यक आहे. आपल्या विचारांमध्ये स्पष्टता असावी. मोठे व्हायचे असेल तर आपले पाय जमिनीवर हवेत.'' श्याम भुर्के यांनी प्रास्ताविक केले.

## O कंबोडियात महेंद्रपर्वत नगरीचा शोध

कंबोडियाच्या पर्वतराजीतील घनदाट जंगलातील महेंद्रपर्वत शहराचा शोध लावण्यात आला आहे. या शहरामध्ये अनेक मंदिरे असल्याचेही निष्पन्न झाले आहे.

कंबोडियामधील अंगकोर वट हे जगातील सर्वांत मोठे हिंदू मंदिर प्रसिद्ध आहे. हे मंदिर असलेल्या सिआम रीप भागातील भूसुरुंग पेरण्यात आलेल्या जंगलामधून शोधमोहीम राबवित एका फ्रेंच पुरातत्त्वशास्त्रज्ञाच्या नेतृत्वाखालील ऑस्ट्रेलियन पथकाने ही कामगिरी केली.

या मोहिमेंतर्गत रडारसारखे लिडार हे अत्याधुनिक यंत्र हेलिकॉप्टरला लावण्यात आले होते. संशोधन पथकाचे संचालक डॅमियन इव्हान्स यांनी सांगितले की, लिडारच्या पडद्यावर पूर्ण शहराचे चित्र दिसताच आम्ही सर्वजण रोमांचित झालो. आमच्यासाठी हा एक अविस्मरणीय क्षण होता.

अंगकोर वटच्या पश्चिमेला केवळ २५ मैल अंतरावर असून इसवीसन पूर्व ८०२ मधील अंगकोर राजवटीचे पहिले शहर असल्याचा दावा केला गेला आहे. असामान्य योद्धा म्हणून इतिहासात प्रसिद्ध असलेल्या जयवर्मन द्वितीय या राजाची येथे राजधानी होती. येथे १२०० वर्षांपूर्वीच्या मूर्ती, मंदिरे तसेच घरांचे अवशेषही आढळले. कालवे, रस्ते, नद्या, गुहा, घुमट यांच्या खाणाखुणाही आढळल्या आहेत.

## O घारापुरी बेटावर महारठी कनकराय राजाची नाणी

मुंबईजवळील घारापुरी बेटावर आढळलेल्या महारठी कनकराय राजाच्या नाण्यांमुळे मराठी भाषा किमान इ.स.पूर्व २०० वर्षे अस्तित्वात होती, याचा खणखणीत पुरावा मिळाला असून त्यामुळे मराठीली अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास इतिहास संशोधक रवींद्र लाड यांनी व्यक्त केला आहे.

प्राचीन नाण्यांचा विशेष अभ्यास असणाऱ्या रवींद्र लाड यांनी ब्राह्मी लिपीच्या वाचनातून अनेक राजघराण्यांच्या चलनाचा परिचय करून दिला. घारापुरी बेटावर त्यांना अनेक नाणी आढळली. त्यातील पाच नाण्यांवर स्पष्टपणे 'बोधी महावीर कनक' अशी मराठी अक्षरे त्यांना आढळली.

बोधी कनकराय सातवाहन घराण्यातील पहिला राजा सातकर्णीचा सासरा होता. सातकर्णी राजा अल्पायुषी ठरल्यानंतर त्याची राणी नागनिका हिने वेदश्री व हनुश्री या राजकुमारांसमवेत सातवाहन घराणे सांभाळले. त्या वेळी कनकराय राजानेच मुलीच्या राजघराण्याचे रक्षण केले. या नाण्यांवरून इ.स.पूर्व २००च्या सुमारास सातवाहन काळात कोकण किनारपट्टीवरील सोपारा, कल्याण, घारापुरी,

चेऊल, चिंचणी, डहाणू आदी बंदरांमधून व्यापारउदीम सुरू होता, हे स्पष्ट होते. शिशाच्या या नाण्यावर एका बाजूस रक्षापात्र अर्थात मंगलकलश, नाग आणि स्वस्तिक चिन्ह असून दुसऱ्या बाजूस चैत्य आणि उज्जेन चिन्ह कोरले आहे. सध्या इसवीसनाच्या पहिल्या शतकात होऊन गेलेला सातवाहन राजा हालच्या काळात रचलेला गाथा सप्तशती हा मराठी भाषेतला आद्यग्रंथ मानला जातो. अर्थात त्याआधी किमान चारशे वर्षे प्राकृत स्वरूपात मराठी भाषा अस्तित्वात असावी, असा अंदाज होता. कनकरायच्या कारकिर्दीतील नाण्यांमुळे त्याला ठोस पुष्टी मिळेल.

## O **कन्याकोशाची महाराष्ट्र 'वारी'**

विविध क्षेत्रांतील पावणेतीनशे कर्तृत्ववान मराठी स्त्रियांची गाथा सांगणारा 'बोलका महाराष्ट्र कन्याकोश' सध्या राज्याच्या कानाकोपऱ्यात फिरत असून, ग्रामीण भागातील मुलींना स्फूर्ती देण्याचे आणि त्यांच्यात आत्मविश्वास जागविण्याचे काम करीत आहे.

तब्बल २२ तासांच्या या ध्वनिफितीचे प्रयोग सध्या राज्यातील अनेक शाळांमध्ये सुरू आहेत. जिजामाता ते अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, कमलाबाई होस्पेट अशा विविध क्षेत्रातील महिलांच्या अल्पचरित्रांचा यात समावेश आहे. अभिनेत्री, समाजसेविका, गुप्तहेर, पोलिस अधिकारी, लेखिका, डॉक्टर, क्रीडापटू इत्यादी महिलांचा यात समावेश आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये जाऊन तेथील मुलींना हा कन्याकोश ऐकवण्याबरोबरच त्यांना बोलते करणे आणि कन्याकोशाशी संबंधित स्पर्धा घेणे असे उपक्रम सुरू आहेत.

## O **शाहू महाराज चरित्रग्रंथ - पाच परकीय भाषांमध्ये अनुवाद**

द्रष्टे राजे आणि कर्तेसुधारक म्हणून राजर्षी शाहूमहाराजांची असलेली ओळख आता सातासमुद्रापार पोहोचणार आहे. 'राजर्षी शाहू-छत्रपती जीवन व कार्य' हा चरित्रग्रंथ इंग्रजी, जर्मन, जपानी, फ्रेंच व रशियन या पाच परकीय भाषांमध्ये आणि कन्नड, गुजराती, सिंधी, उर्दू व तेलुगू वगैरे १४ प्रादेशिक भाषांमध्ये प्रकाशित करण्याचा प्रयत्न चालू आहे.

शाहू चरित्रकार व अभ्यासक डॉ. जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या 'राजर्षी शाहू छत्रपती-जीवनी व कार्य' या ९०० पानी ग्रंथाची मराठी आवृत्ती २००१ साली पहिली तर दुसरी आवृत्ती २००७ मध्ये बाजारात आली होती. २०१०साली धारवाड येथे कन्नड आवृत्तीचे तर २०१२मध्ये कोकणी आवृत्तीचे प्रकाशन झाले. हिंदी, इंग्रजी, सिंधी, गुजराती व उर्दू या प्रादेशिक भाषांतील अनुवाद तयार असून

शासनाच्या अनुदानातून त्यांचे प्रकाशन होणार आहे.

प्रत्येक भाषेसाठी सुमारे सव्वापाच लाख रुपये अनुदान मिळणार आहे. त्यापैकी निम्मे प्राप्त झालेले आहे. तर उर्वरित मिळावयाचे आहे.

'राजर्षी शाहू-छत्रपती जीवन व कार्य', हा २०० पानांचा ग्रंथ इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, जपानी व रशियन या परकीय भाषांमध्ये प्रकाशित होणार आहे. यापैकी जर्मन भाषेतील ग्रंथाच्या अनुवादाचे काम स्वित्झर्लंड येथे पन्नास वर्षे वास्तव्य असणारे सुधीर पेडणेकर यांनी तर रशियन अनुवादाचे काम डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

फ्रेंच व जपानी भाषेतील अनुवादाच्या कामालाही हात घातला गेला आहे.

## O थोरिअमपासून ऊर्जानिर्मिती शक्य

वीज निर्मितीसाठी ऊर्जा स्त्रोतांमधील थोरिअम वापरल्यास शेकडो वर्षे ऊर्जा निर्मिती करता येईल तसेच थोरिअमचा वापर केल्यास युरेनिअमवर अवलंबून रहावे लागणार नाही असे मत ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी व्यक्त केले.

हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसेनानी पानकुंवर फिरोदिया यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'वेध-विकासाच्या नव्या दिशांचे' या विषयावर डॉ. काकोडकर यांचे व्याख्यान झाले. अरुण फिरोदिया, डॉ. जयश्री फिरोदिया आणि डॉ. शांता कोटेचा वगैरे या वेळी उपस्थित होते.

काकोडकर म्हणाले, ''चांगल्या जीवनस्तरासाठी वीज आवश्यक असल्यामुळे ऊर्जेला महत्त्वाचे स्थान आहे. जीवनस्तर उंचावण्यासाठी ऊर्जानिर्मितीत दसपटीने वाढहोणे गरजेचे आहे. क्षय ऊर्जा स्त्रोत संपण्याच्या मार्गावर असताना अणुऊर्जेसाठी वापरले जाणारे थोरिअम वीजनिर्मितीसाठी वापरले पाहिजे. ते अधिक वर्ष टिकेल. अक्षय ऊर्जा स्त्रोतांमध्ये सौर ऊर्जा हा उत्तम पर्याय आहे. भविष्यात केवळ हे दोन पर्यायच उपलब्ध असतील. त्या दृष्टीने ऊर्जेचे व्यवस्थापन करावे लागेल. सौर ऊर्जेचा वापर ग्रामीण भागात शेतीसाठी तसेच वीज म्हणून करता येईल.''

''अणुशक्ती संदर्भात लोकांच्या मनात गैरसमज असतात. पण अणुभट्टीमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण अतिशय कमी आहे. या ठिकाणी किरणोत्सर्गाचे प्रमाण जर मर्यादेखाली असेल तर कोणताही अपाय होत नाही, तसेच पर्यावरणाचाही ऱ्हास होत नाही. ग्रामीण विद्युतीकरण धोरणात बदल करणे गरजेचे आहे. सौर, पवन आणि इतर ऊर्जांचा समन्वय साधून वीज निर्माण करायला हवी. तसेच सध्या अन्न प्रक्रिया उद्योगाचे प्रमाण वाढत आहे. त्याचे तंत्रज्ञान ग्रामीण भागात पोचवून उपजीविकेचे साधन उपलब्ध करता येईल. यातून ग्रामीण भागाचा विकास आणि

संशोधनाचा दर्जा उंचावणे ही दोन्ही उद्दिष्टे साध्य होतील,'' असे मत त्यांनी व्यक्त केले.

## O ‘भानामती म्हणजे मानसिक विकृती’

भानामती हे मानसिक विकृतीचे लक्षण असून, त्यामुळे खुनाच्या घटनाही समोर आल्या आहेत. ही बाब चिंताजनक असल्याचे मत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी व्यक्त केले.

डॉ. दाभोलकर आणि माधव बागवे लिखित ‘मती भानामती’ या पुस्तकाचे प्रकाशन अंनिसचे अविनाश पाटील यांच्या हस्ते झाले. राजहंस प्रकाशनने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. ‘भानामती हा बिघडलेल्या मतीचा परिणाम आहे. त्यामुळे अनेकांचा नाहक बळी घेण्यात आल्याचे आढळून आले आहे. अंनिसच्या माध्यमातून भानामतीची सुमारे अडीचशे प्रकरणे सोडविण्यात आली आहेत’ असेही डॉ. दाभोलकर यांनी स्पष्ट केले.

अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ प्रभावी करण्याच्या उद्देशाने ‘महाराष्ट्र ज्ञान महामंडळा’तर्फे (एमकेसीएल) सॉफ्टवेअरची निर्मिती करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. दाभोलकर यांनी दिली.

साधना प्रकाशनाच्या ‘भारतीय विवेकवादाची वाटचाल : महाराष्ट्र अंनिसचे योगदान’ या सुमन ओक लिखित पुस्तकाचे प्रकाशन प्रा. सुनीलकुमार लवटे यांच्या हस्ते झाले.

''चार्वाक यांच्यापासून विवेकवादाची परंपरा असताना भारताने विवेकवाद पाश्चात्यांकडून घेतला, असे म्हणणाऱ्यांनी इतिहास तपासून पाहावा. आगरकर, फुले यांनी दिलेला विचार बाजूला ठेवून सरकार महाराष्ट्राचे तीर्थटन विकास प्राधिकरण करू लागले आहे. महाराष्ट्र वैज्ञानिक करायचा की धार्मिक करायचा याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. माशेलकर, भटकरांसारखे मराठी लोक जगाला मार्गदर्शन करत असताना राज्यातच धार्मिकतेचे प्राबल्य असावे हे आश्चर्यकारक आहे.''

## O ‘निवडणूक नाट्य’ चार पॅनेलच्या ‘रंगीत तालमीं’ना वेग

‘अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदे’च्या पुणे शाखेच्या पंचवार्षिक निवडणुकीची पहिली घंटा वाजली आहे. मध्यवर्ती शाखेच्या मुंबईतील निवडणूक ‘नाटका’च्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक बिनविरोध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नाट्य परिषदेच्या पुणे शाखेच्या निवडणुकीसाठी मध्यवर्ती शाखेने

निवडणूक अधिकारी म्हणून भाऊसाहेब भोईर यांची नियुक्ती केली आहे. त्यांनी या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, १ ते ८ ऑगस्ट या कालावधीत अर्ज भरायचे असून १६ ऑगस्टला पात्र उमेदवारांची अंतिम यादी जाहीर होईल. प्रत्यक्ष मतदान २९ सप्टेंबरला होणार आहे. सुधीर मांडके, मांडके, शांतिलाल सुरतवाला, सुनील महाजन आणि डॉ. सतीश देसाई अशा चार पॅनेलनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे.

### O वन विभागाचे ई-ग्रंथालय

वेबसाईटवर पुस्तकांचे ऑनलाइन वाचन करणाऱ्या ई-वाचकांची वाढती संख्या पाहून वन विभागानेही आता आपल्या ग्रंथालयातील तब्बल दहा हजार दुर्मिळ पुस्तके ई-माध्यमातून उपलब्ध करण्याचे ठरवले आहे. या पुस्तकांची दहा लाखांहून अधिक पाने स्कॅन झाली असून ती वेबसाइटवर अपलोड करण्याचे काम सुरू आहे.

वन विभागाने प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करून अलिकडे वन्यप्राण्यांची गणनादेखील जीपीएस, कॅमेरा ट्रॅपिंग अशा अत्याधुनिक साधनांद्वारे सुरू केली आहे. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून दुर्मिळ पुस्तकांचा खजिना इंटरनेटवर ई-बुक्सच्या रूपात येत्या चार महिन्यात खुला होईल, अशी माहिती मुख्य वनसंरक्षक (संशोधन) अनुराग चौधरी यांनी दिली.

महाराष्ट्रामध्ये पुणे आणि चंद्रपूर या दोन्ही ठिकाणी असलेल्या ग्रंथालयातील प्रत्येकी दहा हजारांहून अधिक पुस्तके आहेत. वनाधिकारी, केंद्र आणि राज्य शासनाच्या परीक्षा देणारे विद्यार्थी, संशोधक ही पुस्तके वाचण्यासाठी ग्रंथालयांमध्ये येत असतात. अलिकडे पर्यावरणाच्या विविध पैलूंवर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहेत. वन विभागाच्या वेबसाइटवरच या ई ग्रंथालयाची लिंक असेल. यातील कॉपीराइट असलेली पुस्तके मात्र केवळ वनाधिकाऱ्यांनाच वाचता येतील, इतर पुस्तके सर्वांसाठी विनामूल्य उपलब्ध असतील.

### O 'ॲक्युरेट गेजिंग'ला राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

हडपसर येथील ॲक्युरेट गेजिंग अँड इन्स्टुमेंट्स या कंपनीला केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे राष्ट्रीय पुरस्कार नवी दिल्ली येथे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक विक्रम साळुंखे आणि व्यवसायप्रमुख एस.एम.दिवेकर यांनी तो स्वीकारला.

'आर्ममॅक्स' या थ्री-कोऑर्डिनेट मेजरिंग मशिनच्या मॉडेलसाठी कंपनीला हा पुरस्कार देण्यात आला आहे. अभियांत्रिकी क्षेत्रातील गुणवत्ता नियंत्रण आणि मापन यासाठी लागणाऱ्या उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या या कंपनीने स्व-तंत्रज्ञानाआधारे

'थ्री-सीएमएम' क्षेत्रातील देशातील एक अग्रेसर कंपनी म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. फोक्सव्हॅगन, बोश, होंडा, भारत फोर्ज, टाटा मोटर्स या खाजगी उद्योगांबरोबरच ऑर्डनन्स फॅक्टरी, इस्रो, भारतीय रेल्वे, हिंदुस्थान एरोनॉटिक्स आणि सरकारी उद्योगांतही कंपनीची उत्पादने कार्यरत आहेत.

### O नाट्यशीर्षकातील 'नमो' शब्दाला सांस्कृतिक खात्याचा आक्षेप

'आ नमो बहू नाडे छे' या नाटकाचे नाव बदलावे, कारण त्यात गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी ज्या 'नमो' या नावाने ओळखले जातात तो शब्द वापरला आहे, असा आदेश सांस्कृतिक खात्याने दिला असल्याचा दावा या नाटकाचे निर्माते संजय गोरडिया यांनी केला आहे. गुजरात सरकारच्या सर्टिफिकेशन अधिकाऱ्यांनी या नावाला आक्षेप घेतला होता.

हे नाटक म्हणजे राजकीय टीका आहे. नंतर आम्ही ते नाव बदलून 'आ नमो नडता नथी' असे केले, यात नमोमुळे काही समस्या निर्माण होत नाही. देशात इतरत्र हे नाटक मूळ नावाने म्हणजे 'आ नमो बहू नाडे छे' या नावाने केले जाणार आहे. या नाटकाचे नाव बदलले असले तरी त्याच्या संहितेत कुठलाही बदल केलेला नाही, त्यामुळे आम्ही नाव बदलण्यास होकार दिला असे त्यांनी सांगितले.

वडोदरा नगरपालिकेनेही या नाटकाच्या नावाला आक्षेप घेतला. हे नाटक १७ ते २१ जून दरम्यान तेथे केले जाणार होते. वडोदरा येथील आयोजकांनी या नाटकाचे मूळ नाव वृत्तपत्रातील जाहिरातीत छापल्यानंतर खरा वाद सुरू झाला. हे नाटक विपुल मेहता यांनी दिग्दर्शित केले असून, त्यात खमण मोरबीवाला, त्याचे दिवंगत वडील नमो ऊर्फ नरोत्तम मोरबीवाला, मुलगा उमंग यांच्याभोवती कथा गुंफलेली आहे.

### O मानवी 'टेलेनॉइड' रोबोट

डोळ्यांची उघडझाप करण्यासारख्या सूक्ष्म हालचाली करू शकणारा आणि मानवी शरीराशी साधर्म्य असणारा रोबोट ओसाका विद्यापीठातील इंटेलिजंट रोबोटिक्स लॅबोरेटरीचे संचालक जपानी रोबोटतज्ज्ञ हिरोशी इशिगुरो यांनी विकसित केला आहे.

न्यूयॉर्कमध्ये झालेल्या ग्लोबल फ्युचर्स २०४५ या आंतरराष्ट्रीय परिषदेत इशिगुरो यांनी या रोबोटचे सादरीकरण केले. मानवी शरीराशी साधर्म्य असलेला हा 'जेमिनॉइड' रिमोट कंट्रोलद्वारा नियंत्रित करता येतो. इशिगुरो यांनी फॅशनेबल वस्त्रे परिधान केलेला महिला रोबोटही विकसित केला आहे. 'शॉपिंग विंडो'मध्ये ठेवण्यासाठी हा महिला रोबोट खूपच लोकप्रिय झाला आहे, असे इशिगुरो यांनी

सांगितले.

### O भारती विद्यापीठाच्या 'शाश्वती' केंद्राचा उपक्रम

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या शाश्वती स्त्री-सर्जनशक्ती विकास केंद्राने १९५० ते २०१० या साठ वर्षातील स्त्री-साहित्यविषयक त्रिखंडात्मक प्रकल्प हाती घेतला आहे. या केंद्राच्या संचालक डॉ. अरुणा ढेरे या खंडांचे संपादन करणार आहेत. यातील 'स्त्री-लिखित मराठी कादंबरी' हा पहिला खंड तयार झाला असून 'स्त्री-लिखित मराठी कथा' हा खंड प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

पहिल्या खंडामध्ये कमल देसाई, ज्योत्स्ना देवधर, आशा बगे, निर्मला देशपांडे, गौरी देशपांडे, तारा वनारसे, रोहिणी कुलकर्णी, अंबिका सरकार, शांता गोखले, सानिया आणि कविता महाजन या अकरा कादंबरीकारांचा समावेश आहे. त्यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य आणि त्यातील पदर उलगडणारे लेख मंगला आठलेकर, डॉ. अश्विनी धोंगडे, सिसिलिया कार्व्हालो, डॉ. नीलिमा गुंडी आणि प्रभा गणोरकर यांनी लिहिले आहेत. तर, 'स्त्री-लिखित मराठी कथा' या खंडामध्ये कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, रोहिणी कुलकर्णी, आशा बगे, गौरी देशपांडे, सानिया, उर्मिला पवार, मेघना पेठे, नीरजा, प्रतिमा जोशी आणि मोनिका गजेंद्रगडकर या कथाकारांच्या  कथा आणि मुलाखतींचाही अंतर्भाव करण्यात आला आहे.

डॉ. अरुणा ढेरे म्हणाल्या, ''स्वातंत्र्योत्तर कालखंडातील लेखिका भोवतालाकडे, कुटुंबाकडे, स्वत:कडे कशा पाहतात, त्यांचा लेखिका म्हणून प्रवास आणि त्यांचे योगदान याचा वेध घेतला आहे. लेखिका म्हणून त्यांचे जग आहे का, भारतीय पातळीवर मराठी लेखिकांचे जग काय आहे, या जगाच्या मर्यादा आणि वैशिष्ट्यांचा गंभीर शोध घेण्याचा प्रयत्न आहे. त्यांच्यासाठी लेखन हे अभिव्यक्तीचे साधन आहे, की जीवनशोधाचे माध्यम, समाजाशी लढण्याचे हत्यार की सामाजिक कोंडीचे सांत्वन या अंगांनी हा शोध घेतला आहे. ''

### O समाजाचे कुणी लागत नाही, या वृत्तीमुळे एकटेपणाची समस्या

'आपण समाजाचे कुणी लागत नाही, या वृत्तीमुळेच एकटेपणा वाढत चालला आहे. मात्र, नव्या गोष्टी शिकून, ध्येय मिळत जाते आणि एकटेपणा कमी होण्यासाठी त्याची मदत होते,' असे मत प्रसिद्ध लेखक डॉ. अच्युत गोडबोले यांनी आनंदयात्रा एकाकी स्वमदत गटातर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात व्यक्त केले.

'आनंदयात्रा' या वार्षिकाचे प्रकाशन यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी

संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेमंत देवस्थळी आणि मोहन बोरगावकर उपस्थित होते.

गोडबोले म्हणाले, 'सध्या एकटेपणा वाढला आहे. आपण समाजाचे काही देणे लागत नाही, या विचारामुळे एकटेपणा वाढला आहे. मात्र, त्यासाठी सतत नवे काहीतरी शिकत जाणे हा उपाय आहे. नवे शिकण्यातून आपल्याला एक ध्येय मिळते आणि त्यातून एकटेपणा कमी होण्यासाठी मदत होते. लोक काय म्हणतील, लोकांना काय वाटेल अशा विचारांनी आपण एकप्रकारचे पारतंत्र्य ओढवून घेत असतो आणि परिणामी एकटेपणामध्ये भर पडत असते.'

### O खजाना हिंदी चित्रपटसृष्टीचा

जुने हिंदी चित्रपट, कलाकार, संगीतकार म्हणजे रसिकांच्या मर्मबंधातील ठेव. विलास करंबेळकर यांनी या सर्वांचा वेध 'तुम्ही याद करते...' या पुस्तकातून घेतला आहे. अत्यंत अभ्यासू पद्धतीने करंबळेकर यांनी हिंदी चित्रपटसृष्टीचा माहितीपूर्ण खजिना वेगळ्या पद्धतीने उलगडला आहे. शंकर जयकिशन, सुमन कल्याणपूर, नूतन, शम्मी कपूर, जॉनी वॉकर अशा कलावंतांविषयी त्यांनी लिहिलेले २७ लेख या पुस्तकात संकलित करण्यात आले आहेत.

### O स्वराज्याची प्रेरणा 'जिजाऊ'

छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्याची स्थापना करण्यात जिजाऊंची प्रेरणा महत्त्वाची होती. अरविंद प्रकाशनतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या 'जिजाऊ' या कादंबरीतून जिजाऊंच्या जीवनाचा पट मांडण्याचा प्रयत्न मंदा खापरे यांनी केला आहे. शिवाजी महाराज स्वराज्याचा पराक्रम गाजवत असताना जिजाऊंच्या मनातील भावना आणि एका राजाला घडवण्याची मानसिक ताकद याचा मागोवा त्यांनी जिजाऊ आठवणी सांगत आहेत अशा पद्धतीने या कादंबरीतून घेतला आहे.

### O आता आम्हीही घडवू 'सायंटिस्ट'

अवघड वाटणारे विज्ञान, गणित हे विषय मुलांना रंजक पद्धतीने कसे शिकवायचे... पाणी, अन्नपदार्थ याचे 'रिसायकलिंग' कसे करायचे... अंतराळवीर कसे व्हायचे... नवे शोध कसे लावायचे... या गोष्टी अन् वैज्ञानिक ज्ञान आता विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्यातील 'सायंटिस्ट' आम्ही घडवू, अशा भावना अमेरिकेत प्रशिक्षण मिळालेल्या शिक्षिकांनी व्यक्त केल्या.

यू. एस. स्पेस ॲण्ड रॉकेट सेंटर आणि हनीवेल होमटाऊन सोल्युशनतर्फे अमेरिकेतील अलाबामा राज्यातील हंटइव्हीले शहरात जून महिन्यात प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. यात भारतातील चार शिक्षिकांचा समावेश होता. त्यातील

दिल्ली पब्लिक स्कूलच्या सविता शर्मा, विद्या व्हॅली स्कूलच्या मोनिका मिश्रा आणि विबक्युर इंटरनॅशनल स्कूलच्या रश्मी गुप्ता या तीन शिक्षिका पुण्यातील होत्या. ऑनलाइन परीक्षा घेऊन संबंधित संस्थेने या शिक्षिकांची निवड केली होती. त्यांचा सर्व खर्चही संस्थेने केला. २७ देशांतील २१० शिक्षक यंदा यात सहभागी झाले होते.

### O विठ्ठल मणियार यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

विठ्ठल मणियार यांनी लिहिलेल्या 'विठ्ठलनामा' आणि 'विठ्ठलनामाचा गजर' या पुस्तकांचे प्रकाशन वनाधिपती विनायक पाटील, आमदार हेमंत टकले, विश्वास बँकेचे अध्यक्ष विश्वास ठाकूर, अमेय प्रकाशनचे उल्हास लाटकर, लीला मणियार, बंकटलाल मणियार, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे कार्यवाह लोकेश शेवडे, मकरंद हिंगणे, विनायक रानडे, जयप्रकाश जातेगावकर आदींच्या उपस्थितीत झाले. 'सुख ही दुहेरी कल्पना आहे. सुख कशात मानायचे, हा व्यक्तिगत प्रश्न आहे. आपला व्यवसाय आनंदाने करत, सामाजिक बांधिलकी जपत मित्र मिळवले पाहिजेत,' असे विठ्ठल मणियार म्हणाले.

### O 'साईस्मरण' त्रैमासिकाचे प्रकाशन

कौस्तुभ सातपुते यांच्या कल्पनेतून साकारलेले 'साईस्मरण' हे त्रैमासिक नुकतेच शिर्डीमध्ये प्रकाशित झाले. 'या त्रैमासिकातून सर्व संतांची मानव कल्याणकारी शिकवण, संतांचे कार्य, संतांचा समाजाबद्दलचा दृष्टिकोन आणि त्याला अनुसरून अध्यात्माची वाटचाल याविषयी मार्गदर्शन करणे हा हेतू आहे,' असे सातपुते म्हणाले. संपादक वि. ग. विसपुते, चं. गो. भालेराव, विजय हेर्लेकर, गजानन सांगलीकर आणि साई मंदिर ट्रस्टचे जनसंपर्क अधिकारी मोहन यादव उपस्थित होते.

### O केजरीवाल यांचे पुस्तक मराठीत

मॅगसेसे पुरस्कार विजेते अरविंद केजरीवाल यांनी लिहिलेले 'स्वराज' हे पुस्तक सत्यव्रत प्रकाशनातर्फे मराठीमध्ये येत आहे. भ्रष्टाचार विरोधी आंदोलनातील नेते म्हणून परिचित असलेल्या केजरीवाल यांनी पुस्तकात भारतातील भ्रष्टाचार त्याची कारणे, तो कसा नष्ट करता येईल, सामान्य माणूस आणि राजकारण अशा विविध प्रश्नांचा मागोवा घेतला आहे. सरकारी सेवत नोकरी करताना आलेले अनुभव आणि भारतभर फिरून लोकांशी साधलेला संवाद यामुळे पुस्तक संग्राह्य झाले आहे.

## O भा. द. खेर स्मृतिदिन

'साहित्य समन्वय संघ' आणि 'योगदा' या संस्थांनी साहित्यिक आणि पत्रकार भा. द. खेर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी खेर यांनी 'श्रीकृष्णनीती' या विषयावर मार्गदर्शन केले; तसेच भा. द. खेर यांनी संत ज्ञानेश्वर यांच्या आयुष्यावर लिहिलेल्या 'संजीवन' या कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन झाले. साहित्य समन्वय संघाचे कार्याध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, कार्यवाह मंदा नाईक, स्वाती सामक, दीपक करंदीकर, डॉ. मधुसूदन घाणेकर या वेळी उपस्थित होते. अंजली महागावकर यांनी सूत्रसंचालन केले.

## O 'चंद्रकांत खोत : व्यक्ती आणि साहित्य'

मराठी साहित्यात बाजूला राहिलेल्या चंद्रकांत खोत यांच्या साहित्याचा परामर्श 'चंद्रकांत खोत : व्यक्ती आणि साहित्य' या ग्रंथात घेण्यात आला आहे. प्रा. कृष्णा भवारी यांनी खोतांच्या बंडखोर साहित्याचा अभ्यासूपणे मागोवा घेतला आहे. त्यांच्या कादंबऱ्या, त्यातील व्यक्तिरेखा, त्यांची भाषा, कविता, संपादन कार्य या सगळ्या बाजू टिपण्याचा प्रयत्न केला आहे. 'चेतक बुक्स'ने हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.

## O 'ज्योत्स्ना : अमृतवर्षिणी' लघुपटाचे प्रकाशन

'स्वरवंदना प्रतिष्ठान'च्या वतीने आयोजित समारंभात नाट्यसंमेलनाध्यक्ष डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते 'ज्योत्स्ना : अमृतवर्षिणी' या लघुपटाचे प्रकाशन झाले.

लघुपटातून 'आंधळ्याची शाळा' 'आशीर्वाद', 'भूमिकन्या सीता' अशा विविध नाटकांतील अभिनय... 'आला खुशीत समींदर', 'क्षण आला भाग्याचा' अशी वगैरे गीते... आणि विजया मेहता, डॉ. श्रीराम लागू, श्रीकांत मोघे, सई परांजपे, रामदास कामत, आशालता, कीर्ती शिलेदार, अमोल पालेकर अशा कलावंतांसह ज्योत्स्नाबाईंच्या आठवणी उलगडण्यात आल्या. या वेळी लघुपटाचे दिग्दर्शक सुधीर मोघे, प्रतिष्ठानच्या कार्यकारी विश्वस्त वंदना खांडेकर, प्रकाश भेंडे उपस्थित होते.

''ज्योत्स्नाबाईंमुळे एकेकाळी गाजलेले 'कुलवधू' हे नाटक त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने पुन्हा रंगभूमीवर येत आहे. यासाठी 'महाराष्ट्र कल्चरल सेंटर' ने पुढाकार घेतला आहे. या नाटकाचा पहिला प्रयोग ऑगस्टमध्ये होणार आहे. याशिवाय, शताब्दी सोहळ्यात ज्योत्स्नाबाईंच्या गीतांच्या स्पर्धा, छायाचित्रांची

दिनदर्शिका, संगीत मैफली घेण्यात येतील. त्यासाठी काही संस्था मदतीसाठी पुढे आल्या आहेत,'' असे खाडेकर यांनी सांगितले.

गोवा सरकारने संगीत अभिनेत्रीसाठी ज्योत्स्नाबाईंच्या नावाचा एक लाख रुपयांचा पुरस्कार देण्याचे जाहीर केले आहे, असेही त्या म्हणाल्या.

## O चीनचा १०० पिक्सलचा कॅमेरा

मोबाईल आणि इतर स्मार्ट डिव्हाइसमधील कॅमेऱ्यांच्या 'पिक्सेल क्षमतेची' वीस अंकी संख्यादेखील अफाट वाटण्याच्या काळात चिनी तंत्रज्ञांनी १०० मेगापिक्सेलचा कॅमेरा विकसित करून तंत्रज्ञानविश्वाला चक्रावून सोडले आहे.

अतिशय संवेदनशील अशा या कॅमेऱ्याचा वापर शहर नियोजन, आपत्ती व्यवस्थापन व तंत्राधिष्ठित वाहतूक प्रणालीसाठी करता येईल, अत्याधुनिक वाहतूक व्यवस्थेत वाहतूक प्रणालीचा 'स्मार्ट' वापर करता येतो. या कॅमेऱ्यात अत्याधुनिक प्रकाशीय व नियंत्रण यंत्रणा आणि डाटा रेकॉर्डिंग प्रणाली आहे. राष्ट्रीय दूरसंवेदन प्रणालीचा भाग म्हणून या कॅमेऱ्याचा चाचणी स्तरावर वापर यशस्वी ठरला आहे. २००१ ते २००५ या दहाव्या पंचवार्षिक योजनेत ८१ मेगापिक्सेलचा आणखी एक कॅमेरा विकसित करण्यात आला आहे. एक मेगापिक्सेल म्हणजे दहा लाख रंगबिंदू असतात व ही संकल्पना केवळ रंगबिंदू दर्शवते असे नाही, तर कुठल्याही डिजिटल कॅमेऱ्यातील प्रतिमा संवेदक घटकांची संख्याही दर्शवते.

आयओई-३ कॅनबन हा कॅमेरा चायनीज ॲकॅडमी ऑफ सायन्सेसच्या इन्स्टिट्यूट ऑफ ऑप्टिक ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स या संस्थेने तयार केला असून, तो चीनचा सर्वात जास्त मेगापिक्सेल कॅमेरा आहे. या कॅमेऱ्याच्या मदतीने १०२४० बाय १०२४० मेगापिक्सेल इतक्या रंगबिंदू क्षमतेची छायाचित्रे काढता येतात. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो लहान व वजनाला हलका आहे. त्याची रुंदी १९.३ सेंमी आहे. हा कॅमेरा उणे २० अंश सेल्सियस ते ५५ अंश सेल्सियस या तापमान मर्यादेत वापरता येतो.

## O स्तब्धतेचा आवाज म्हणजे झेन

''स्तब्धतेतील आवाज ऐकणे आणि आवाजातील शांतता समजून घेणे म्हणजे... झेन ! झेनमधून एखादा कलाकार आपल्या सृजनशीलतेचा ठाव घेत असतो,'' असे मत ज्येष्ठ नाटककार डॉ. सतीश आळेकर यांनी व्यक्त केले.

डॉ. राजीव शारंगपाणी यांनी लिहिलेल्या 'झेन स्पिरिट, झेन ट्विस्ट ॲण्ड झेन फन' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभामध्ये डॉ. आळेकर म्हणाले, ''भारतीय कला शिकण्यासाठी परदेशी अभ्यासक भारतात आले आणि त्यातून झेनसारख्या

संकल्पनांची आपल्याला ओळख झाली. कलाकारांना आपले शरीरशास्त्र समजून घेण्यासाठी आणि आत्मभान येण्यासाठी झेन आवश्यक आहे. ही दृष्टी डॉ. शारंगपाणी यांनी दिली. 'झेन स्पिरिट, झेन ट्विस्ट अ‍ॅण्ड झेन फन' हे पुस्तक आवडले, तर का आवडले हे शब्दात सांगता येत नाही. 'झेन'ची खरी गंमत या निरुत्तर करणाऱ्या स्तब्धतेतच आहे, ती या पुस्तकातून अनुभवायला मिळते.''

डॉ. एदल म्हणले, ''मन हे नियंत्रणाखाली असत नाही. ते त्याच्या पद्धतीने धावतच असते. मृत्यूसारख्या अनेक स्वाभाविक आणि टाळता न येणाऱ्या गोष्टींमधूनही माणूस पळवाट काढत असतो. सुखाच्या आणि आनंदाच्या मागे धावताना सुख कशात आहे, ते त्याला कळतच नाही. आनंद मिळवताना नक्की कुठे थांबायचं हेही कळत नाही. त्यातून झेनसारख्या गोष्टींचा उदय झाला. कुणीची नक्कल न करता, स्वत्व जपणे हे आनंदाचे खरे गमक आहे.''

## O **श्रीनिवास पाटील – सिक्किमचे राज्यपाल**

सातारा जिल्ह्यात गेलेले बालपण, एसपी कॉलेजच्या आठवणी, अभंग-लावण्यांची रेलचेल.. कोपरखळ्या अन् धमाल किस्से.. हशा आणि टाळ्यांची दाद... ह्या सर्वांमुळे.. सिक्कीमचे नवनिर्वाचित राज्यपाल श्रीनिवास पाटील यांना शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम रंगला. महापौर वैशाली बनकर यांनी पुणेरी पगडी देऊन पाटील यांचा सत्कार केला. 'म्हाडा'चे अध्यक्ष अंकुश काकडे, वात्रटिकाकर रामदास फुटाणे, विठ्ठल मणियार, भाजपचे शहराध्यक्ष अनिल शिरोळे, ग्राहक पेठेचे अध्यक्ष सूर्यकांत पाठक, 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुणे आवृत्तीचे संपादक पराग करंदीकर, ज्येष्ठ पत्रकार अनंत दीक्षित वगैरे कला-साहित्य, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

सत्काराच्या कार्यक्रमानंतर निवेदक सुधीर गाडगीळ यांनी घेतलेल्या या मुलाखतीदरम्यान पाटील यांनी 'बुगडी माझी सांगडली गं' या लावणीपासून अभंगापर्यंत अनेक रचना गाऊन थक्क केले. तसेच, जुने पुणे, एसपी कॉलेज हॉस्टेल, प्राध्यापक, नाटकांतून केलेल्या भूमिका, नृत्य स्पर्धा अशा आठवणी सागून रसिकांना हास्यकल्लोळात बुडवले.

## O **यक्षकथेचे रसग्रहण**

कुबेरानं यक्षाला बागेतून फुलं तोडून आणायला सांगितलं.

नव्यानेच लग्न झालेल्या यक्षानं सांगितलेल्या कामाचा कंटाळा करून आदल्या दिवशीचीच शिळी फुलं आणली. त्यातला भुंगा कुबेराला चावल्याने त्याने यक्षाला एक वर्ष अलकानगरीतून दूर जायला सांगितले. त्याने यक्षाला पाठवले ते

थेट नागपूरला रामटेकवर. म्हणजेच फक्त भौगोलिक नाही, तर ऋतूमध्येही बदल असलेल्या ठिकाणी पाठवले. त्या यक्षाने आपल्या पत्नीचे मेघाकडे केलेले वर्णन आणि त्याला तिच्यापर्यंत पोहोचण्याचा सांगितलेला रस्ता म्हणजे 'मेघदूत'!

व्यंकटेश माडगूळकर प्रतिष्ठान पुरस्कृत मैत्र संकुलतर्फे महाकवी कालिदासाच्या 'मेघदूत'या काव्यावरील 'आषाढस्य प्रथम दिवसे' या कार्यक्रमात डॉ. सुचेता परांजपे यांनी काव्यातील सौंदर्यस्थळे उलगडून दाखवली.

पाऊस पडून गेल्यामुळे मेघ सुकला, तर यक्ष त्याला नद्यांमधला 'जीवनरस' शोषून घ्यायला सांगतो. अलकानगरीपर्यंतच्या प्रवासात तो एकटाच नाही, हे सांगताना त्याच्या साथीला मंद वारा, बलाकमाला, चातक पक्षी असतील, याचीही तो खात्री देतो. हत्तीचं पिल्लू, स्थलांतरित पक्षी यांच्यापासून डोंगर-नद्यांपर्यंत कालिदासानं केलेलं वर्णन भौगोलिकदृष्ट्या योग्य तर आहेच; पण कल्पनाविलासाच्या दृष्टीनंही समृद्ध आहे, याची अनेक विहंगम दृश्ये कालिदासाने आपल्या वर्णनातून दाखवली आहेत. कुबेराच्या अलकानगरीच्या वर्णनात 'यंत्रधारा गृहत्वम्' म्हणजेच 'शॉवर'चं वर्णनही केलं असल्याचा उल्लेख करत परांजपे म्हणाल्या, 'भूगोल, कल्पनाविलास आणि तत्कालीन नगररचना, सामाजिक व्यवस्था यांचे दर्शनही मेघदूतामुळे होते.'

## O कवितेला अनेक पैलू

कविता ही कोड्यात टाकणारी गोष्ट असून, तिचे अनेक पैलू आहेत. व्यक्तिगत कविता समाजाशी जुळते, त्या वेळी कवी व रसिकांची मने जुळतात, असे मत कवी संदीप खरे यांनी व्यक्त केले.

'अक्षर मानव' आणि 'इमेज मीडिया' यांच्यातर्फे आयोजिलेल्या 'गप्पा' या कार्यक्रमात खरे यांनी जीवनातील विविध पैलूंना स्पर्श केला. सागर गोखले यांनी प्रकट मुलाखत घेतली. खरे म्हणाले, ''कविता हा स्वतंत्र कप्पा असल्याने त्यात नेहमी नैसर्गिकपणा व ताजेपण असायला हवा. कविता करणारा हा संवेदनशील व अंत:करणातून रसिकांशी जोडलेला हवा.''

## O स्मार्टफोन अन् कॅमेऱ्याचा मिलाफ

सॅमसंग गॅलेक्सी स्मार्टफोन मालिकेने बाजारात धमाका उडविल्यानंतर कंपनीने गॅलेक्सी एस फोर मालिकेमध्ये मिनी आणि झूम असे दोन स्मार्टफोन बाजारपेठेत आणले. यातील एसफोर झूममध्ये स्मार्टफोन आणि स्मार्ट कॅमेऱ्याच्या मिलाफ साधण्यात आला आहे. १६ मेगापिक्सेलसह तब्बल १० एक्स ऑप्टिकल झूम हे या स्मार्टफोन कॅमेऱ्याचे वैशिष्ट्य आहे.

सॅमसंग मोबाईलचे संचालक मनू शर्मा म्हणाले की, सॅमसंगची गॅलेक्सी मालिका या दोन्ही स्मार्टफोन्समुळे आता परिपूर्ण झाली आहे. संवाद हा काही आत केवळ शब्दांपुरता मर्यादित राहिलेला नाही तर तो दृश्यसंवाद झाला आहे. म्हणूनच डिजिटल कॅमेऱ्याची स्मार्ट फीचर्स या गॅलेक्सी एसफोर झूममध्ये एकत्र करण्यात आली आहेत. या स्मार्टफोनला मागच्या बाजूस डिजिटल मेऱ्याप्रमाणे मोठ्या आकाराची लेन्स आहे. कॅमेऱ्यासाठी झूम रिंग नावाचे एक फीचर देण्यात आले असून त्या फीचर मार्फत संपूर्ण कॅमेरा त्यातील बारीकसारीक सेटिंग्जसह वापरता येतो. शिवाय टिपलेला फोटो लगेचच एमएमएसद्वारे शेअर करण्याची सोयही यात आहे. हा स्मार्टफोन आणि त्यातील कॅमेरा अँड्रॉइडच्या जेली बीन या अद्ययावत ऑपरेटिंग सिस्टिमवर काम करतो. याची भारतीय आजारपेठेतील किंमत २९,९०० रुपये आहे.

सॅमसंगने बाजारपेठेत आणलेले दुसरे मॉडेल गॅलेक्सी एसफोर मिनी याला ४.२७ इंचाचा क्यूएचडी स्क्रीन आहे. ते वजनानेही हलके आहे. १.७ गिगाहर्टझ् वेगाच्या ड्युएल कोअर प्रोसेसरमुळे हा स्मार्टफोन अतिशय वेगात काम करतो. याला मागच्या बाजूस ८ मेगापिक्सेल तर समोरच्या बाजूस १.९ मेगापिक्सेल एचडी कॅमेरा देण्यात आला आहे. याची किंमत २७,९०० रुपये आहे. सॅमसंगने बाजारात आणलेल्या स्मार्टफोन्सची संख्या एकूण १४च्या घरात पोहोचली असून रु. ५,२४० ते रु. ४०३०० पर्यंत किंमती आहेत.

## O गुगल माहिती केंद्र

सध्या एडवर्ड स्नोडेन, प्रिझम यासह गुगल, फेसबुक, याहू आदीसंबंधित विविध माहितीवर सरकारांची नजर जगभरातील टेहळणी करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

गुगलकडे विविध युझर्सची माहिती मागविणारे हजारो प्रस्ताव दररोज येतात.

जुलै ते डिसेंबर २०१२ डिसेंबर २०१२ या कालावधीत गुगलकडे एकूण २१ हजार ३८९ रिक्वेस्ट आल्या. त्यात ३३ हजार ६३४ युझर्सची माहिती मागविण्यात आली होती. ८ हजार ३४८ रिक्वेस्टसह अमेरिका या यादीत टॉपवर असून नंतर भारत (२,४३१), फ्रान्स (१,६९३), जर्मनी (१,५५०), ब्रिटन (१,४५८) यांचा क्रम लागतो. पोलिस तपासात किंवा कोर्टाच्या कामकाजात मदत व्हावी म्हणून युझर्सची माहिती गुगलकडून मागवली जाते. सर्वप्रथम अशी रिक्वेस्ट मिळाल्यावर गुगल ती कायद्याला धरून आहे का आणि कंपनीच्या धोरणानुसार आहे का याची चाचपणी करते. कायद्याच्या तरतुदींचे पालन करणारी म्हणजेच, मागणी लेखी स्वरूपात करण्यात आलेली आहे का, वरिष्ठ अधिकाऱ्यांची त्यावर

स्वाक्षरी आहे का आणि योग्य कायद्याच्या आधारे ही माहिती मागविण्यात आली आहे का, हे तपासले जाते, असे गुगलचे चीफ लीगल ऑफिसर डेव्हिड ड्रमंड म्हणाले. या चाळणीतून संबंधित माहितीचा आवाका तपासला जातो. तो खूपच विस्तृत असल्यास गुगल ती विनंती फेटाळते किंवा नेमकी काय माहिती पाहिजे, याची विचारणा करते. एखाद्या कार्यालयातील सर्व युझर्सचे गेल्या पाच महिन्यांतील इ-मेलचे डिटेल्स मागविले असतील, तर गुगल त्याऐवजी नेमक्या कोणत्या कर्मचाऱ्यांची माहिती पाहिजे याची विचारणा करते आणि तेवढीच माहिती पुरविते. त्यानंतर कायदेशीररीत्या शक्य असेल गुगल संबंधित युझरला 'तुमची माहिती मागविण्यात आली आहे,' असे कळविते. त्यानंतर सर्वात महत्त्वाचा टप्पा येतो तो, गुगलच्या स्टँडर्डचा. अमेरिकन कायद्यात आवश्यक असलेल्या नियमावलीपेक्षा गुगलने कडक स्टँडर्ड तयार केले आहे. इलेक्ट्रॉनिक कम्युनिकेशन प्रायव्हसी ॲक्टनुसार पोलिसांना केवळ गेल्या सहा महिन्यातील ई-मेल आणि इतर माहिती मागविण्यासाठी वॉरंट घेणे बंधनकारक आहे. एवढ्या सगळ्या प्रक्रियेतून गेल्यानंतर गुगल एखाद्या युझरची माहिती पुरविते.

## O भारतीय स्वातंत्र्यलढा ब्रिटिश अभ्यासक्रमात

ब्रिटनमधील विद्यार्थ्यांना आता शालेय अभ्यासक्रमामध्ये भारतीय स्वातंत्र्यलढ्याचेही धडे गिरवावे लागणार आहेत. ५ ते १६ वर्षे वयोगटासाठी जाहीर करण्यात आलेल्या नव्या अभ्यासक्रमाला ब्रिटनच्या संसदेने मान्यता दिली असून सप्टेंबर, २०१४ पासून तो शाळांमध्ये लागू करण्यात येणार आहे.

नव्या अभ्यासक्रमामध्ये मागील शतकामध्ये ब्रिटन व युरोपसमोर उभ्या राहिलेल्या सर्व आव्हानांची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात येणार आहे. यामध्ये महिलांना मताधिकार, आर्थिक मंदी, हुकुमशहांचा उदयास्त व भारतीय स्वातंत्र्यलढा इत्यादी घटनांचा समावेश करण्यात आला आहे. भारतातील मुघल राजवट (१५२६ ते १८५७) व चीनमधील क्विंग राजवट (१६४४ ते १९११) यांचा समावेश आहे. ''हा अभ्यासक्रम ब्रिटनच्या शिक्षणक्षेत्रातील नवा अध्याय आहे. कम्प्युटर कोडिंगपासून ते अभिजात साहित्यकृतींपर्यंत सर्व बाबींचा समावेश करण्यात आल्यामुळे हा अभ्यासक्रम नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल.'' असे ब्रिटनचे पंतप्रधान म्हणाले.

## O ॲपलच्या दोन तृतीयांश ॲप 'नावालाच'

'सॉफ्टवेअर जायंट' ॲपल कंपनीने यंदा 'ॲप स्टोअर'चा पाचवा वाढदिवस साजरा केला. ट्रॅकिंग सर्व्हिस 'ॲडइव्हन'ने ॲपविषयी सादर केलेल्या अहवालामुळे

वेगळ्याच चर्चेला तोंड फुटले आहे. 'ॲडइव्हन'ने 'ॲपल'च्या एकूण ॲपपैकी दोन-तृतीयांश ॲप या 'झुंबी ॲप' ॲप आहेत. झुंबी म्हणजे यूझरकडून क्वचितच वापरली जाणारी ॲप.

'ॲपल'चे सीईओ टिम कूक यांनी ॲपच्या संदर्भात म्हटले आहे, 'ॲपमुळे जगामध्ये मूलभूत बदल झाले आहेत. ॲपवर लोकांचे नितांत प्रेम आहे. अविश्वसनीय अशा ॲप खरेदी करण्यामध्ये त्यांना मजा येते. 'ॲपल'च्या ९० टक्के ॲप महिन्यांतून एकदा तरी डाउनलोड केल्या जातात. आतापर्यंत ग्राहकांनी ५० अब्ज ॲप्स डाउनलोड केल्या आहेत.'

'ॲडइव्हन'चे मत मात्र वेगळे आहे. 'ॲडइव्हन'च्या म्हणण्यानुसार कंपनीच्या ८,८८,८५६ ॲपपैकी ५,७९,००१ ॲप या 'झुंबी' आहेत. 'मोस्ट डाउनलोडेड ॲप'च्या लिस्टमध्ये 'ॲपल' कंपनी हे ॲप्स कधीही दाखवत नाही. विशेष म्हणजे 'ॲपल'चे 'ॲप'विषयी असणारे प्रेम पैशांचे आकडे पाहिले, की लक्षात येते. त्यानंतरच 'झुंबी' ॲपच्या समस्येची व्याप्ती लक्षात येते. 'ॲपल' कंपनीने 'ॲप स्टोअर'साठी दहा अब्ज डॉलर्सचा खर्च केला आहे. इतर सर्व कंपन्यांच्या तुलनेत 'ॲपल'चा 'ॲप स्टोअर'वरील खर्च तीन पट अधिक भरेल.

२००८मध्ये ॲप स्टोअर सुरू झाले. त्या वेळी ती क्रांतिकारी घटनाच होती. अशा प्रकारच्या 'ॲप स्टोअर'मुळे मायक्रोसॉफ्ट, ब्लॅकबेरी यांसारख्या कंपन्यांना प्रेरणा मिळाली. मात्र 'ॲडइव्हन'च्या अहवालामुळे ग्राहक ठरावीक ॲपना प्रतिसाद देतात आणि खरेदी करूनही लाखो ॲप 'झुंबी' अवस्थेत ठेवतात हे प्रकाशझोतात आले आहे.

### O अंध व्यक्तींना 'कानाने' दिसणार जग!

आता अंध व्यक्तीही कानाच्या साह्याने जग पाहू शकणार आहेत. आवाजाच्या साह्याने त्या विशिष्ट गोष्टीची प्रतिमा मनात निर्माण करणारे 'व्हाइस' हे उपकरण केवळ स्पर्शाच्या साह्याने एखाद्या व्यक्तीची किंवा गोष्टीची प्रतिमा मनात तयार करून त्या गोष्टीला मनात मूर्त रूप देऊ शकतील.

इंग्लंडमधील 'युनिव्हर्सिटी ऑफ बाथ'चे डॉ. मायकेल प्रॉलॉक्स यांना 'व्हाइस' या घेतलेल्या उपकरणाच्या आधारे या टेस्टमध्ये अंध व्यक्ती योग्य प्रतिसाद देत असल्याचे आढळले. कोणत्याही प्राथमिक प्रशिक्षणाशिवाय अंध व्यक्तींच्या एका गटाला हे शक्य झाले, अशी माहितीही देण्यात आली आहे. पूर्ण प्रशिक्षण घेऊन हे उपकरण वापरल्यास नेत्र पटलांमागे असणाऱ्या सूक्ष्म पेशींना उत्तेजना मिळून या गोष्टीची प्रतिमा निर्माण होते, असे मायकेल यांनी म्हटले आहे.

### O ज्येष्ठ गायिका मुबारक बेगम पुणेकर श्रोत्यांवर खूष

'पुणे के लोग गाना समजते है, यहाँ की ऑडियन्स बहुत ही समझदार है, ये

एक इमान की बात बोलने में क्या हर्ज है...' अशी भावना ज्येष्ठ गायिका मुबारक बेगम यांनी व्यक्त केली. विस्मृतीत गेलेल्या व हलाखीत जगणाऱ्या मुबारक बेगम यांच्यावर पुणेकरांनी प्रेमाबरोबर आर्थिक मदतीचाही वर्षाव केला.

महम्मद रफी आर्टस फाउंडेशनतर्फे बेगम यांना मदतनिधी देण्यासाठी बालगंधर्व रंगमंदिर येथे 'अंदाज-ए-रफी' या संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते.

पोलिस आयुक्त गुलाबराव पोळ, अतिरिक्त पोलिस आयुक्त चंद्रशेखर दैठणकर यांच्या हस्ते बेगम यांना मदतीचा धनादेश सुपूर्त करण्यात आला. या वेळी सुरेश कोते, डॉ. मिलिंद भोई, अॅड. प्रताप परदेशी, प्रताप निकम, संयोजक इक्बाल दरबार उपस्थित होते.

बेगम यांनी गोड आवाजात 'कभी तनहाईयोंमें भी हमारी याद आयेगी', 'मुझको अपने गले लगा लो, ऐ मेरे हमराही' ही गाणी सादर केली. मूळच्या राजस्थानमधील असलेल्या मुबारक बेगम यांनी पुणेकर नागरिकांशीही आत्मीयतेने संवाद साधला.

बिपिन चौबळ यांनी मुबारक बेगम यांच्या जीवनावर बनविलेल्या लघुपटाचे सादरीकरण झाले.

### O **पश्चिम घाटाला जागतिक वारसा**

''पश्चिम घाटाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांत समावेश होणे म्हणजे केवळ नाटक आहे. कंत्राटदारांना पैसे देऊन कास पठाराला कुंपणे घालणे याला निसर्गसंवर्धन म्हणता येणार नाही. तीच स्थिती पश्चिम घाटाची होऊ शकते,'' असे परखड मत ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी व्यक्त केले.

'वनराई' या संस्थेच्या २७ व्या वर्धापनदिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष मोहन धारिया यांनी लिहिलेल्या 'वेध विकासाचा' या पुस्तकाचे आणि 'वनराई' या नियतकालिकाच्या पश्चिम घाट संवर्धन विशेषांकाचे गाडगीळ यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

महापौर वैशाली बनकर, खासदार वंदना चव्हाण, सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील, 'सिम्बायोसिस'चे संस्थापक शां. ब. मुजुमदार, उत्कर्ष प्रकाशनाचे सु. वा. जोशी, शिक्षणतज्ज्ञ राम ताकवले या वेळी उपस्थित होते.

माधव गाडगीळ म्हणाले, ''पश्चिम घाटाला जागतिक वारसा मिळण्याबद्दल देशातर्फे युनेस्कोला पाठवलेल्या प्रस्तावाची आखणी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी केली होती. वनाधिकार कायद्यानुसार ही आखणी करताना पश्चिम घाटात राहणाऱ्या आदिवासी व वननिवासी नागरिकांना विश्वासात घेणे आवश्यक होते. पण संयुक्त

राष्ट्रांच्याच ‘इंडिजिनस पीपल्स फोरम’ आणि ‘इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचर’ या समित्यांनी भारताच्या प्रस्तावाला युनेस्कोने मान्यता देऊ नये असे मत व्यक्त केले होते. यावर ‘देश खूप मोठा असल्याने नागरिकांना प्रस्तावाबाबत कसे विचारता येईल,’ अशी भूमिका भारताच्या प्रतिनिधींनी घेतली. ही आपली चूक होती. या भागांतील नागरिकांचे मत घेतलेच नसल्याने मिळालेल्या जागतिक वारशालाही काही अर्थ नाही.’’

### O परदेशी विद्यापीठांच्या कार्यपद्धतींचा अभाव

जागतिकीकरणाच्या काळात हल्ली ‘एक्सपोजर’ला खूप महत्त्व आहे. अलीकडे अनेक विद्यार्थी केवळ ‘एक्सपोजर’साठी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतात. आपल्या क्षेत्रात जगभरात काय चालले आहे. याचे भान येण्यासाठी आणि त्याद्वारे आपल्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल करण्यासाठी अमेरिका किंवा ब्रिटनमधील विद्यापीठे आणि संस्था भारतातील शैक्षणिक संस्थांशी सामंजस्य करार करीत आहेत. ‘फॅक्टरी एक्स्चेंज’ म्हणजेच शिक्षक देवाण-घेवाण कार्यक्रमांना महत्त्वाचे स्थान आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न कॉलेजांतील काही प्राचार्यांनी अमेरिकेतील युनव्हर्सिटी ऑफ फ्लोरिडा आणि बॉलस्टेट विद्यापीठ, तसेच ब्रिटनमधील किंग्ज कॉलेज आणि ईस्ट अँग्लिया या संस्थांचा ४ ते १९ जूनदरम्यान एक अभ्यास दौरा केला. पुणे विद्यापीठाच्या कॉमर्स विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. सुधाकर जाधवर, प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष आणि शिरूरमधील सी. टी. बोरा कॉलेजचे प्राचार्य डॉ. नंदकुमार निकम, बीजेएस कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, मिटसॉम कॉलेजचे प्राचार्य डॉ. रवी चिटणीस, संगमनेर कॉलजचे उपप्राचार्य डॉ. अरुण गायकवाड आणि ढोले-पाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सागर ढोले-पाटील हे या दौऱ्यात सहभागी झाले होते.

प्रगत देशातील शिक्षण पद्धताची बलस्थाने, तेथील पायाभूत सुविधा, अध्यापनासाठी तंत्रज्ञानाचा वापर, संशोधनातील वेगळेपणा आदी गोष्टींचा अभ्यास करणे आणि भेट दिलेल्या संस्थांबरोबर संयुक्त संशोधन, शॉर्ट-टर्म अभ्यासक्रम किंवा शिक्षक प्रशिक्षणासाठी करार करणे ही या दौऱ्याची मुख्य उद्दिष्टे होती.

‘आम्ही भेट दिलेल्या विद्यापीठांमध्ये संशोधनाला असलेले महत्त्व अचंबित करणारे होते. तेथे पदवी पातळीवरही विद्यार्थी संशोधन करतो. विशेष म्हणजे प्रत्येक विद्यापीठाचे उद्योगांशी सहकार्य आहे. आणि त्यांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी विद्यापीठात संशोधन होते. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगातील समस्येवर काम करता येते. पुण्याच्या आसपास असलेल्या उद्योगांबरोबर असे सहकार्य करणे

शक्य आहे,'' असे निकम यांनी नमूद केले.

''या विद्यापीठांमधील पायाभूत सुविधा उच्च दर्जाच्या आहेत. इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये तर वर्ग आणि प्रयोगशाळा वेगळ्या नाहीतच. शिकलेल्या थिअरीचे तेथेच प्रात्यक्षिक करून पाहता येते आणि संकल्पना पक्की व्हायला त्यामुळे मदत होते,'' असे मत ढोले-पाटील यांनी व्यक्त केले.

'कोणत्याही तासाला विद्यार्थी त्या विषयाची अगोदरच तयारी करून येतो. त्यामुळे तेथे शिक्षकाने शिकवणे यापेक्षाही शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये त्या विषयावर संवाद होऊन तो समजून घेणे ही प्रक्रिया मोठ्या प्रमाणात होते,' असे निरीक्षण सांगळे यांनी मांडले.

## O नियतकालिकांचे व्यासपीठ कथाकारांना दुरावले

'मराठी साहित्यात सगळे काही आलबेल आहे, असे म्हणणे हा पलायनवाद आहे. बदललेल्या आर्थिक समीकरणांमुळे कथाकारांना नियतकालिकांचे व्यासपीठ राहिलेले नाही.' असे मत अंतर्नाद मासिकाचे संपादक भानू काळे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे श्रेष्ठ कथाकार जी. ए. कुलकर्णी यांच्या जयंतीप्रीत्यर्थ 'मराठी कथेपुढची आजची आहाने' या विषयावर बोलताना समृद्ध मराठी साहित्याचा अविभाज्य भाग असलेला कथा हा साहित्यप्रकार कोमेजण्याच्या कारणांचा मागोवा घेत काळे म्हणाले.

'बदलत्या काळात कथेचे अस्तित्व ठळक करण्यासाठी नवे लेखक शोधण्याची आवश्यकता आहे. मराठी साहित्यात नियतकालिकांनीच सिद्धहस्त लेखक घडवले असले, तरी बदललेल्या आर्थिक समीकरणांमुळे कथालेखनाचा प्राण असलेली नियतकालिके चालवणे कठीण झाले आहे. सध्या मराठीत आश्वासक साहित्याची उणीव आहे. पूर्वीच्या काळी साहित्यिकांना असलेला मान सद्य:परिस्थितीत मिळत नाही. तसेच पैसा, प्रसिद्धी आणि पुस्तकांच्या संख्येच्या मागे न लागता लेखकांनी आत्मनिष्ठेने लेखन करण्याची आवश्यकता आहे.'

## O दर्पणकार जांभेकर यांच्यावरील पुस्तकाचे प्रकाशन

ज्येष्ठ पत्रकार यशवंत पाध्ये यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्राच्या आधुनिकतेचे अग्रदूत दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर' या पुस्तकाचे प्रकाशन कवी मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते मुंबई येथे नुकतेच झाले.

ठाणे येथील राजे पब्लिकेशनचे धनंजय राजे, कवी बाळकृष्ण साळुंखे, पत्रकार प्रकाश कुलथे, प्रियांका राजे आदी या वेळी उपस्थित होते.

पाडगावकर म्हणाले, ''सर्वसामान्य मराठी माणसाला दर्पणकारांच्या

युगप्रवर्तक कार्याची माहिती व्हावी, या थोर परंपरेशी त्याचा धागा जोडला जावा, यासाठी पाध्ये यांनी हा प्रयत्न केला आहे. साधी ओघवती भाषा, पत्रकारितेच्या परंपेरची माहिती आणि तिच्याविषयीचा अभिमान हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे.''

### O ज्येष्ठ फ्रेंच दिग्दर्शिका क्लेर डेनिस यांची कार्यशाळा

'जगात भारताची ओळख अध्यात्मिक देश म्हणून असली, तरी येथे कला, संस्कृती यांना खूप महत्त्वाचे स्थान आहे. भारतामध्ये बॉलिवूडचा आणि कलात्मक चित्रपटांचा समांतर प्रवाह आहे. वेगवेगळ्या भाषांमुळे भारतीय संवेदनांमध्ये चित्रपट संस्कृती खोलवर रुजली आहे,' असे मत ज्येष्ठ फ्रेंच चित्रपट दिग्दर्शिका क्लेर डेनिस यांनी व्यक्त केले.

चॉकोलट, व्हाइट मटेरिअल, बास्टड्र्स अशा अनेक चित्रपटांतून जागतिक चित्रपटांमध्ये स्वत:चा वेगळा ठसा उमटवलेल्या क्लेर डेनिस यांनी चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या (एफटीआयआय) विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेतली. त्या म्हणाल्या, 'सध्या चित्रपटांच्या तंत्रामध्ये प्रचंड बदल झाले असले, तरी चित्रभाषा बदललेली नाही. त्यामुळे बदलत्या तंत्राच्या अनुषंगाने चित्रभाषेला महत्त्व देत विद्यार्थ्यांशी संवाद साधत आहे. चित्रपट निर्मितीसाठी मोठी तळमळ असावी लागते. माझा अनुभव या विद्यार्थ्यांशी मी शेअर करीत आहे. या कार्यशाळेमुळे मलाही नव्या गोष्टी शिकण्याची संधी मिळाली.'

जागतिक चित्रपटांमध्ये फ्रेंच चित्रपटांना विशेष महत्त्व असले, तरी सध्या फ्रान्समध्ये चित्रपटांना भारताप्रमाणे पोषक वातावरण नाही. मोठे स्टुडिओज, जास्त बजेट अशा सुविधा फ्रान्समध्ये उपलब्ध नसल्यामुळे फ्रेंच चित्रपटांमधील प्रयोगशीलता कमी होऊ लागली आहे अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

'पथेर पांचाली'सारखे कलात्मक चित्रपट आणि बॉलिवूडचे व्यावसायिक चित्रपट असे दोन्ही प्रवाह भारतात समांतर चालतात या गोष्टीचे डेनिस यांना आश्चर्य वाटले. मोठी सांस्कृतिक परंपरा असलेल्या भारतात बॉलिवूडसारखे व्यावसायिक चित्रपट आणि 'पंथेर पांचाली'सारखे कलात्मक चित्रपटही बनतात ही गोष्ट यांना दुर्मिळ वाटते. टीव्ही पाहताना भारतातील विविध भाषा आणि चित्रपटांचा अनुभव घेता आल्याचे त्यांनी सांगितले.

पदार्थांच्या दरवळणाऱ्या वासातून त्या पदार्थांविषयी उत्सुकता वाटते. तसेच चित्रपटाच्या नावातून चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण झाली पाहिजे असे सांगून त्या म्हणाल्या चित्रपटातील स्थळ, काळ, घटना यांची सुसंगत मांडणी नसल्यास प्रेक्षकांचा गोंधळ उडतो. त्यामुळे दिग्दर्शकाला त्याबाबत निश्चित दृष्टी असणे महत्त्वाचे असते.''

## O आर. कें.च्या ‘कॉमन मॅन’ला पुणेकरांचा सलाम!

प्रसिद्ध व्यावसायिक दत्तात्रय ऊर्फ बाळासाहेब ऊर्फ पाथरकर यांच्या ‘चालता चालता’ या आत्मचरित्र प्रकाशनाचे. आर. के. लक्ष्मण यांच्या हस्ते झाले. प्रसिद्ध संगणकतज्ज्ञ पद्मश्री डॉ. विजय भटकर, अशोक मोरे, हृषीकेश परांजपे, मंदार पडित उपस्थित होते.

आयुष्यभर व्यंगचित्रांच्या दुनियेत रमणाऱ्या ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांनी ९२व्या वर्षी चितारलेला ‘कॉमन मॅन’ पाहण्याची‘अनकॉमन’ संधी रसिकांना पुस्तक प्रकाशनाच्या समारंभात मिळाली. त्यांचा तो दमदार स्ट्रोक पाहून या ‘चिरतरुण’ व्यंगचित्रकाराला पुणेकरांनी सलामच केला.

कुंचल्यातून साकारत जाणाऱ्या दमदार स्टोक मधून ‘कॉमन मॅन’ ड्रॉइंग बोर्डवर येताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. आर. के. लक्ष्मण यांच्या पत्नी कमला लक्ष्मण यांनी ‘समारंभाला उपस्थित राहण्याची संधी देऊन आमचा सन्मान केला आहे,’ अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या. डॉ. भटकर म्हणाले, पाथरकर यांनी जीवनाचा संघर्षमय प्रवास आत्मचरित्रातून मांडला आहे.

## O जीएंच्या घरावर नीलफलक

‘जीएं’च्या जन्मदिनानिमित्त १० जुलै रोजी पुणे ऐतिहासिक वास्तू स्मृती समिती आणि लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टतर्फे नीलफलक लावण्यात आला. याचे अनावरण ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रा. ग. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रा. जाधव म्हणाले, ‘‘जीएं च्या कथा म्हणजे सर्वोच्च शिखरच. अशा कथा लिहिणे खरोखरीच खूप अवघड आहे. माणूस आणि नियतीचा खेळ या कथांतून व्यक्त होतो. त्या वाचताना हा लेखक तत्त्वचिंतकच आहे, असे वाटत राहते. समीक्षकांना तर त्यांच्या कथांवर आणखी खूप काळ अभ्यास, विचार करता येईल, कारण, प्रत्येक वेळी त्यांची कथा नावीन्य घेऊन समोर येत राहते.’’

चित्रकार रवी परांजपे, कवयित्री डॉ. अरुणा ढेरे, संस्थेचे कार्यवाहक वसंत पिंगळे, ‘मसाप’च्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, ‘जीएं’च्या भगिनी नंदा पैठणकर इत्यादी यावेळी उपस्थित होते.

## O पहिले अंधश्रद्धा निर्मूलन साहित्य संमेलन

‘‘समाजातून अंधश्रद्धा नष्ट व्हावी, यासाठी मराठीमध्ये अल्प प्रमाणात साहित्य निर्माण होत आहे. त्या तुलनेत अंधश्रद्धेला शरण जाणाऱ्या साहित्याचे प्रमाण मोठे आहे. अशा परिस्थितीत अंधश्रद्धेच्या विरोधात ठोस भूमिका घेणाऱ्या

साहित्याची निर्मिती होणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन उत्तम कांबळे यांनी आकुर्डी येथे केले.

आकुर्डीतील श्रमशक्ती भवनात आयोजित पहिल्या अंधश्रद्धा निर्मूलन साहित्य संमेलनाचे डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर, प्रदेश कार्याध्यक्ष अविनाश पाटील, शहराध्यक्ष दिनकर साळुंखे, कार्याध्यक्ष शुभांगी घनवट, सचिव संजय बनसोडे उपस्थित होते. कांबळे म्हणाले, ''देवदासी व तत्सम अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या परंपरांना मोडून काढणे आवश्यक आहे. समाजामध्ये विज्ञाननिष्ठ, विवेकशील आणि भूमिका घेणारी चळवळ उभी राहायला हवी. त्यामध्ये साहित्याची भूमिका मोलाची आहे. सुंदर समाजनिर्मितीसाठी दिशादर्शन करण्याचे काम साहित्याच्या माध्यमातून होऊ शकते.''

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''लेखकांनी जीवनाचा शोध घेणारी, विश्लेषण करणारी दृष्टी विकसित केल्यास मराठी भाषेत दर्जेदार लेखन होऊ शकेल. समाजातील रूढी, परंपरा, राजकीय पातळीवर होणारे बदल, धार्मिक दहशत यांच्याविरुद्ध लिहिण्याची हिंमत लेखकांनी वाढविणे गरजेचे आहे. सध्या समाजामध्ये जात-धर्म यांच्या नावाखाली होणाऱ्या हिंसाचाराचे प्रमाण वाढले आहे. विविध माध्यमे, महाराज, बुवा आदींच्या अधीन होणे मनाला खटकणारे आहे. वैज्ञानिक साधनांचा वापर करून समाजात अंधश्रद्धा पसरविण्याचे काम काही वर्गाकडून सुरू आहे. त्याविरुद्ध व्यापक लढा देण्याची गरज आहे.''

संमेलनामध्ये विविध चर्चासत्रे व परिसंवादांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळच्या सत्रात 'संत साहित्य व अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावर संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी, तर 'समाजसुधारक व अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावर डॉ. दाभोलकर यांनी मत मांडले. दुपारच्या सत्रामध्ये 'विज्ञानविषयक ग्रंथातील वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर विज्ञान लेखक निरंजन घाटे यांनी मनोगत व्यक्त केले. 'अंधश्रद्धा निर्मूलन व शाळा/महाविद्यालयांची भूमिका' या विषयावर परिसंवाद झाला. जिल्हा अध्यक्ष डॉ. राजेंद्र कांकरिया यांनी सूत्रसंचालन केले.

''समाजविघातक अंधश्रद्धेला खीळ घालणे हा अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचा मूळ उद्देश आहे. त्यासाठी समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे गरजेचे आहे. जादूटोणा, बुवाबाजी आदींना विज्ञानाच्या आधारे विरोध करता येऊ शकतो.'' असे मत 'लोकविज्ञान'चे संघटक डॉ. अनंत फडके यांनी समारोप प्रसंगी व्यक्त केले.

## O मलालाचे संयुक्त राष्ट्र आमसभेत भाषण

'जगाच्या विविध भागांमध्ये राहणाऱ्या मुलींना शिक्षणाचा अधिकार नाही. मुलींनी त्यांच्या उज्ज्वल भवितव्याचे स्वप्न साकारण्याची धडपड करू नये, असा तालिबानींचा हेतू आहे,' अशा शब्दांत पाकिस्तानची मानवाधिकार कार्यकर्ती मलाला युसूफझाईने आपल्या भावना व्यक्त केल्या. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेमध्ये मलाला हिचे दिनांक २२ जुलै रोजी भाषण झाले. त्यामध्ये अत्यंत आत्मविश्वासाने आणि ठामपणे तिने हे मत मांडले. हा जुम्मा तिच्यासाठी संस्मरणीय ठरला. सोळाव्या वाढदिवशी मलालाचे संयुक्त राष्ट्रांमधील भाषण तिच्यासाठी आयुष्यभराचा ठेवा ठरले.

'माझ्यावर हल्ला करण्यामागे मुलींचा विकास, त्यांची प्रगती रोखणे हाच हेतू होता,' असा आरोपही तिने तालिबानींवर केला. मलाला म्हणाली, 'माझ्यावर झालेला हल्ला दुर्दैवी होता. मात्र, त्यानंतर अनेक गोष्टींमध्ये बदल झाला. पाकिस्तानच्या स्वात खोऱ्यामध्ये अनेक मुली घराबाहेर पडल्या आणि शिक्षण घेऊ लागल्या आहेत. तालिबानींकडून महिलांच्या हक्कांवर गदा आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच मुलींच्या शिक्षणावर बंदी घालण्याचा प्रयत्नही अफगाणिस्तान, पाकिस्तानसह अनेक देशांमध्ये सुरू आहे. हे पूर्णपणे चुकीचे आहे. माझ्यावर हल्ला झाल्यानंतरचा काळ माझ्या आयुष्यातला सर्वांत कठीण काळ होता. मात्र, या हल्ल्यानंतर मी खूप गोष्टी शिकले. प्रगतीच्या आड येणाऱ्या गोष्टींविरोधात लढण्याची आवश्यकता आहे.'

## O गोखले इन्सिटट्यूटमध्ये पुस्तकांचे डिजिटायझेशन

पंधराव्या शतकातील इटालियन तत्त्वज्ञ निकोलस मॅकीवली यांच्या कामगिरीबाबत १६८० मध्ये इंग्रजीमध्ये प्रसिद्ध झालेले पुस्तक गोखले इन्स्टिटट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेने डिजिटाइज्ड करून वेबसाइटवर उपलब्ध केले आहे.

गोखले इन्स्टिटट्यूट या संस्थेचे ग्रंथालय आशिया खंडात सर्वोत्कृष्ट समजले जाते. या ग्रंथालयात आजमितीस दोन लाख ७८ हजार पुस्तके असून, त्यापैकी ५० हजार पुस्तके १९४० पूर्वीची आहेत. त्यामुळे ही ग्रंथसंपदा डिजिटाइज्ड करून संस्थेच्या वेबसाइटद्वारे अभ्यासकांना मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय २०१० मध्ये संस्थेने घेतला.

ग्रंथपाल एन. जी. शेवाळे म्हणाले, ''ऑगस्ट २०११ मध्ये या कामाला सुरवात झाली. पहिल्या टप्प्यात नऊ हजार ग्रंथ स्कॅन करून वेबसाइटवर टाकले. त्यात अतिदुर्मिळ दोन हजार ग्रंथांचा समावेश आहे. त्यासाठी संस्थेला २० लाख

रूपये खर्च आला. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या सात लाख रुपयांच्या निधीमधून आणखी सहा हजार ग्रंथ उपलब्ध होतील. जर्मनी, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, ऑस्ट्रिया या देशांसह संदर्भासाठी सातत्याने विचारणा करण्यात येत आहे. संस्थेच्या dspace. gipe.ac.in या वेबसाइटवर पुस्तकाचा लेखक, शीर्षक प्रकाशन वगैरे माहिती मिळू शकते.''

## O **सुंबरान साहित्य संमेलन**

''केंद्र सरकारने धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करून शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात आरक्षण आणि सवलती द्याव्यात. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने शिफारस करावी,''असं मत माजी मंत्री अण्णा डांगे यांनी पहिल्या 'सुंबरान साहित्य संमेलना'च्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.

आमदार गणपतराव देशमुख यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष माजी आमदार पोपटराव गावडे, परिषदेचे अध्यक्ष आणि संमेलनाचे निमंत्रक डॉ. तुकाराम पाटील, माजी मंत्री आनंदराव देवकाते, राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर, सचिव रत्ना चौधरी उपस्थित होते.

डांगे म्हणाले, ''देशभर धनगर समाज विखुरलेला आहे. पूर्वजांचे साहित्य जपण्यापेक्षा स्वत:ची टिमकी वाजवण्याला अधिक प्राधान्य दिल्याने मेंढरांसारखे जीवन हा समाज जगत आहे. त्यामुळे धनगरांवर आक्रमण होत असून, ते थांबवणे गरजेचे आहे. मूठभर अनुदानासाठी वारसांचे विडंबन होणार नाही, याकडे लक्ष द्यायला हवे.''

आमदार देशमुख म्हणाले, ''धनगर समाज उपेक्षित आहे. त्याला एकत्रित करण्यासाठी साहित्य मोठी भूमिका बजावू शकेल. समाजातील प्रश्न मांडून त्यावर उपाययोजनांसाठी प्रयत्न करायला हवेत. दऱ्या-खोऱ्यात, वाड्या-वस्त्यांवर भटकणाऱ्या या समाजाला स्थैर्य मिळवून देणे साहित्यिकांच्या हातात आहे.''

संमेलनस्थळी सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात आली. 'सुंबरान २०१३'या संकलित पुस्तकाचे प्रकाशन डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. दुसऱ्या सत्रात 'धनगर समाजाची दशा आणि दिशा' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. दुसरे साहित्य संमेलन लातूरमध्ये होणार असल्याची घोषणा या वेळी करण्यात आली.

गणपतराव देशमुख व आण्णा डांगे यांना जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला.

## O **सौर ऊर्जेवर चालणारे हेडफोन**

मोबाइलवर गाणी ऐकताना मधेच बॅटरी संपली असे म्हणण्याचे दिवस आता मागे पडणार आहेत. कारण सौर ऊर्जेवर चालणाऱ्या हेडफोनच्याच माध्यमातून मोबाइलची बॅटरीही चार्ज करता येणार आहे.

ग्लासगोमधील गॅजेट डिझायनर अँड्रयू अँडरसन यांनी सौर ऊर्जेवर चालणाऱ्या हेडफोन्सची निर्मिती करण्यात यश मिळवले आहे. 'ऑनबीट' या ब्रँडनेमअंतर्गत हा हेडफोन ब्रिटनमध्ये नुकताच लाँच करण्यात आला.

'ऑनबीट'मध्ये ०.५५ वॉट क्षमतेचे सोलर सेल बसविण्यात आले आहेत. त्यामुळे त्याचे आपोआप चार्जिंग होत राहाते. ही ऊर्जा वजनाने अतिशय हलक्या 'लिथियम आयन' बॅटरीमध्ये साठवली जाते. पावसाळ्यात सौर ऊर्जेला मर्यादा असल्याने या हेडफोनला वेगळा यूएसबी पोर्टही देण्यात आला आहे. त्यामुळे घरबसल्या किंवा ऑफिसातही थेट कम्प्युटरला जोडून ही चार्ज करता येते. सौर ऊर्जेच्या वापराने मोबाईल वापरामध्ये क्रांती होऊ शकेल. त्या दृष्टीने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

### O नेटकरांना आता 'गुगल प्लस'चा पर्याय

'सर्च इंजिन जायंट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुगलने नुकतीच 'रीडर' सेवा बंद केली. त्यापाठोपाठ 'लॅटिट्यूड' ही 'लोकेशन सर्च' ची मोबाईल ॲप सेवाही आठ ऑगस्टपासून खंडित केली जाणार आहे.

नवीन उत्पादने, सेवा उपलब्ध करून देताना गुगलने जुन्या सेवा बंद करण्याचा सपाटा लावला आहे. कितीही लोकप्रियता किंवा युजर्स असले, तरी त्यांना नवीन सेवेकडे वळवायचे, असे गुगलचे धोरण आहे. 'लॅटिट्यूड' ॲपमुळे युजर्स नेमके कोणत्या ठिकाणी आहेत, याची माहिती इतर वापरकर्त्यांना स्मार्टफोनच्या जीपीएसच्या माध्यमातून कळते. ही सेवा बंद करताना गुगलने सध्याच्या अँड्रॉइड युजर्सना 'गुगल प्लस' ॲपचा वापर 'लोकेशन शेअरिंग'साठी करण्याचे आवाहन केले आहे. 'गुगल प्लस' हे व्हर्जन आयफोनसाठीही उपयुक्त आहे.

गुगलने नवीन उत्पादने सादर करताना आधीच्या काही सेवा बंद केल्या आहेत. 'गुगल बझ'ला पर्याय म्हणून 'गुगल प्लस' आणले. 'गुगल टॉक'ला 'गुगल हँगआऊट' आणि 'गुगल व्हिडिओ'ला 'यू ट्यूब'चा पर्याय उपलब्ध करून दिला.

'आयगुगल' हे गुगलचे होम पेजदेखील कमी प्रतिसादामुळे याच वर्षी बंद करण्यात आले.

### O महिला शायरांची संख्या

गझलसम्राट सुरेश भट यांनी मराठीत रुजविलेल्या गझलचा वेलू आता

गगनावरी निघाला आहे. यात महिला गझलकारांचाही मोलाचा वाटा आहे. मराठीत गझल लिहिणाऱ्या महिला शायरांची संख्या आता ५० च्या घरात गेली आहे.

उर्दूत लोकप्रिय असलेला गझल हा प्रकार सुरेश भट यांनी मराठीत लोकप्रिय केला. त्यांनी अनेकांना गझलचे तंत्र आणि मंत्रही शिकवले. गझल करणाऱ्यांची संख्या आता मोठ्या प्रमाणात असून महिलांनी त्यात आपले स्थान पक्के केले आहे.

प्रेमभावना हा गझलचा गाभा. त्यामुळे महिला प्रेमाची भावना मनमोकळेपणे व्यक्त करू शकतील की नाही, याबद्दल काहीजण साशंक होते. पण प्रेमाबरोबरच सामाजिक, तात्त्विक विषयही महिलांनी मांडले आहेत. पहिल्या काही गझलकारांमधील संगीता जोशी म्हणाल्या, ''मी १९५९ मध्ये पहिली गझल लिहिली. त्यावेळी मी एकटीच होते. नंतर एक दोन करत संख्या वाढत गेली. 'निदान जाहले मुली की गर्भपात जाहले, कळ्या फुलायच्या आधीच कुस्करून टाकले.' किंवा 'माणसाच्या जीवनाला मोल नाही, नित्य घाई फक्त पैसे मोजण्याची...' असे चांगले शेर महिला लिहीत आहेत.'' गझलकार प्रभा सोनावणे म्हणाल्या, ''कवी हा संवेदनशील असतोच; पण कवयित्री जरा जास्त संवेदनशील असतात. त्यामुळे त्यांना गझलमध्ये व्यक्त होणे आवडत असावे.''

महिलांनी हाताळलेल्या विविध विषयांबद्दल गझलचे अभ्यासक भीमराव पांचाळे म्हणाले, ''प्रेम हा गझलचा स्थायी भाव, मूळ गाभा आहे. पण महिलांनी शेतकऱ्याच्या दु:खापासून राजकारणापर्यंत सगळे विषय अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केले आहेत. समाजात एकंदरच गझलबद्दलची ओढवाढत चालली आहे.''

## ○ महिलांशी 'वन-वे' चॅटिंगला कारावास

'भारतीय दंड संहितेचे पूर्वीचे कलम ३५४ हे महिलेच्या विनयभंगप्रकरणी नोंदविले जात होते. यंदा त्यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. कोणत्याही महिलेशी सलगी करणे, तरुणीचा पाठलाग केला, इतकेच नव्हे, तर ई-मेल, फेसबुक, जी-टॉक आणि ट्विटरसारख्या सोशल नेटवर्कद्वारे 'चॅटिंग'च्या माध्यमांतून 'सलगी' साधण्याचा प्रयत्न केल्यास तो गुन्हा ठरू शकतो.

संबंधित महिलेच्या इच्छेविरुद्ध एसएमएस पाठवून वैयक्तिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केल्यास तोही दंडनीय अपराध ठरू शकतो. या गुन्ह्यांसाठी तीन ते पाच वर्षांपर्यंतच्या शिक्षेसह दंडाची तरतूद करण्यात आली आहे. या सुधारणांमुळे वाह्यात चॅटिंगला आळा बसून मलिांची ई-सुरक्षा राखली जाईल.

## ○ संत संकल्पनेचा उदय महाराष्ट्रात

'संत ही एक संकल्पना असून, ती महाराष्ट्रात उदयास आली,' असे मत संत

साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले. 'समाजाचे भरण, पोषण आणि रक्षणासाठी कर्म केले पाहिजे,' असेही ते म्हणाले.

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशनच्या वतीने संस्थापक डॉ. चित्रा नाईक यांच्या जयंतीनिमित्त मोरे यांचे 'लोकशिक्षक संत' या विषयावर व्याख्यान झाले. संस्थेचे सदस्य सचिव डॉ. बी. डी. पवार, प्रवीण महाजन, डॉ. अरुणा गिरी, मर्झबान जाल यावेळी उपस्थित होते. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ जे. पी. नाईक आणि डॉ. चित्रा नाईक यांच्या संस्थेच्या आवारातील समाधीला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

'स्वत: आणि इतरांचा उद्धार ही संतांची शिकवण असून, त्यांच्या शिकवणीपासून प्रत्येकाने प्रेरणा घेतली पाहिजे. आपल्या कर्मातून समाजात ओळख प्रस्थापित केली पाहिजे,' ओही ते म्हणाले.

## O टिळक समाधीस्थळाला 'स्वराज्य भूमी' नाव द्या.

लोकमान्य टिळकांच्या मुंबईतील गिरगाव चौपाटीवरील समाधीस्थळाच्या परिसराला 'स्वराज्य भूमी' हे नाव देण्यात यावे, अशी मागणी स्वराज्य भूमी स्मारक समितीतर्फे करण्यात आली. या मागणीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी एक ऑगस्टला गिरगाव चौपाटीवर लोकमान्यांना सामूहिक अभिवादन करण्यात आले.

समितीचे अध्यक्ष प्रकाश सिलम आणि वेदाचार्य मोरेश्वर घैसास गुरुजी म्हणाले, ''लोकमान्यांच्या निधनानंतर १९३३ मध्ये लोकवर्गणीतून गिरगाव चौपाटीवर लोकमान्यांचे स्मारक उभारण्यात आले. दिल्लीतील महात्मा गांधींच्या 'राजघाट' आणि कराडमधील यशवंतराव चव्हाण यांच्या 'प्रीतिसंगम' या नावाप्रमाणेच लोकमान्यांच्या समाधीला 'स्वराज्य भूमी' हे नाव देण्यात यावे, अशी आमची मागणी आहे.''

## O 'काटेरी कुंपणाची' कथा पडद्यावर

मागासवर्गीय जमातींमधून पुढे येऊन घेतलेले शिक्षण, जाचक कायदा बंद करण्यासाठी उभारलेली चळवळ ते सोलापूरचे महापौर हा भीमराव जाधव यांचा प्रवास 'कथा काटेरी कुंपणाची' या लघुपटातून उलगडण्यात आला.

प्रा. विलास पाटील यांनी भीमराव जाधव यांच्या जीवनावर लघुपट तयार केला असून, 'आशय सांस्कृतिक'तर्फे आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे, चित्रकार रविमुकुल यांच्या हस्ते या लघुपटाच्या 'डीव्हीडी'चे प्रकाशन झाले. काही आदिवासी जमातींना गुन्हेगार ठरवून कायमचे तारेच्या कुंपणात ठेवण्याचा कायदा ब्रिटिश काळात अस्तित्वात होता. अशाच

जमातींमध्ये जन्मलेल्या भीमराव जाधव यांनी शिक्षण घेऊन सामाजिक कार्याला सुरुवात केली. ब्रिटीश गेल्यानंतरही हा जाचक कायदा चालूच होता. या कायद्याविरोधात त्यांनी चळवळ उभारून तो बंद करण्यास सरकारला भाग पाडले. हे लघुपटात मांडण्यात आले आहे.





**६ वी आवृत्ती**

# चला! उठा!
# कामाला लागा!

मूळ लेखक-**स्वाती व शैलेश लोढा**
अनुवाद - **अंजनी नरवणे**

**किंमत : १६०/-रु. पोस्टेज : २५/-रु.**

यशस्वी होण्यासाठी,
प्रथम काय करू नये, ते शिका.
मग काय करावं, ते शिका.
हे पुस्तक तुम्हांला तुम्ही खरे कसे आहात, ते उलगडून दाखवतं.
खरा यशस्वी माणूस आणि यशस्वी असल्याचं ढोंग करणारा माणूस,
ह्यांच्यातला सूक्ष्म फरक हे पुस्तक तुम्हांला सांगतं.
हे पुस्तक तुम्हांला स्वत:चा शोध घ्यायला मदत करतं.
हे पुस्तक तुम्हांला 'सर्वांत उत्तम' बनवत नाही,
पण ते तुम्हांला 'कोणापेक्षाही कमी नाही' असं बनवतं.
लोक टीका करतात, तक्रार करतात आणि स्वत:ची कीव करतात.
लोक कृत्रिमपणे वागतात, मत्सर करतात, उद्धटपणानं वागतात.
लोक बढाया मारतात, त्यांची प्रगती खुंटते
आणि सर्वांत कमाल म्हणजे, हे सर्व ते कबूल करत नाहीत.हे पुस्तक प्रत्येकाला स्वत:मधील उणिवा स्वीकारून,
स्वत:मधे बदल घडवून आणायला प्रेरणा देतं.

## आगामी




# पॉपी

मूळ लेखक **ग्रेगॉर सेमन**
अनुवाद **डॉ. प्रमोद जोगळेकर**

**किंमत : ३५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

अफगाणिस्तानात ‘पॉपी’चे – अफूचे उत्पादन सर्वांत जास्त केले जाते.

अफूचा वापर मुख्यत: नशा करण्यासाठी होतो.

ऑस्ट्रेलियन पत्रकार ग्रेगॉर सेमन यांनी अफू या एकाच विषयाचा पाठपुरावा करून प्रत्यक्ष अफगाणिस्तानात आलेले अनुभव या पुस्तकात कथन केले आहेत.

जगभरात फोफावणाऱ्या दहशतवादामागे अफूचा पैसा वापरला जातो, अफूच्या

व्यवहारातून मिळणारा नफा कोणाला होतो आणि त्याची किंमत कोणाला मोजावी लागते, या प्रश्नांचा शोध घेताना सेमन यांना अफूच्या व्यवहाराशी निगडित शेतकरी, डॉक्टर, तस्कर, व्यसनी माणसं, राजकारणी, पोलीस अशी विविध माणसं भेटतात. इतकंच नाही, तर इंग्रजी पॉप गाणी आवडणारा तालिबानी कमांडरही भेटतो!

हा प्रवास एक वेगळेच जग आपल्या समोर उभे करतो, आपल्या कल्पनेपलीकडचे; पण वास्तववादी!

आगामी




# सेंड देम टू हेल

लेखक : **सेबॅस्टियन विल्यम्स**
अनुवाद : **अभिजित पेंढारकर**

**किंमत : ३००/-रु.**

**पोस्टेज :३०/-रु.**

'सेंड देम टू हेल' हे बँकॉकच्या कुप्रसिद्ध तुरुंग व्यवस्थेत गेली दोन दशके ज्या प्रकारचे आयुष्य परदेशी कैद्यांच्या वाट्याला आले आहे, त्याची थरकाप उडविणारी वस्तुनिष्ठ कहाणी सांगणारे इतिवृत्त आहे.

....

खून, मानवी हक्कांची विटंबना, अमली पदार्थ, ब्लॅकमेलिंग, खंडणी, क्रूर हिंसाचार, वैद्यकीय गैरप्रकार आणि मृत्युदंड देण्याचे असमर्थनीय प्रकार या बँगवँग आणि क्लोंग प्रेम तुरुंगातील नित्याच्या गोष्टी आहेत.

...

थायलंडमधील कायदेव्यवस्था ज्यावर आधारित आहे, ती कल्पनेच्याही पलीकडची अमानवी दु:स्वप्ने एका पाश्चिमात्य कैद्याच्या वाट्याला आली. त्याच्याच नजरेतून सेबॅस्टियन विल्यम्स यांनी हे धक्कादायक वास्तव या पुस्तकातून सर्वांसमोर मांडले आहे.




आगामी

**टी बुक क्लब २३ मधील तिसरे पुस्तक**

# पायरेट लॅटिट्यूडस

मूळ लेखक **मायकेल क्रायटन**
अनुवाद **प्रमोद जोगळेकर**

**ज**मैकातील ब्रिटिश वसाहतीची राजधानी १६६५मध्ये पोर्ट रॉयल या बंदरावर होती. गलिच्छ रस्ते, कुंटणखाने आणि रासवट खलाश्यांसाठीच्या खानावळी असलेल्या या ठिकाणाहून भरभक्कम अशा स्पॅनिश ठाण्यांवर कोणी हल्ला करू शकेल, हे कल्पनेच्याही पलीकडचं होतं. पण चार्ल्स हंटर या नावाजलेल्या प्रायव्हटीरने नेमकं हेच करायचं ठरवलं. त्याला जमैकाचा गव्हर्नर सर जेम्स अलमॉन्टचा पाठिंबा होता. चार्ल्स हंटर मातानकेरॉसवर धाड घालायला निघतो. सगळ्या संकटांवर मात करत हंटर खजिन्याचं जहाज लुटून परत पोर्ट रॉयलमध्ये येतो. आपलं भव्य स्वागत होईल, अशी त्याची अपेक्षा असते, पण....

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी आवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे**

| |
|---|
| पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, कानपूर रोड, टिळकवाडी, बेळगाव -५९०००६. टेलिफोन क्र.(०८३१)-४२००६७६ |
| शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६ |
| शॉप नं.- जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद-४३१००६. |

अधिक माहितीसाठी
**www.wordpowerbookshop@gmail.com**
येथे संपर्क साधा.

आगामी




# गेटिंग थिंग्ज डन

लेखक : **डेव्हिड ॲलन**
अनुवाद : **प्रशांत तळणीकर**

**किंमत : २८०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

संपर्क आणि जबाबदाऱ्या वाढलेल्या आजच्या जगात आपल्यासमोरील परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी गतकालातील जुन्या सवयींचा उपयोग होत नाही. मग अशा वेळी काय करावे, कार्यतत्परता कशी साधावी आणि उत्पादकता व सर्जनशीलता कशी वाढवावी यांसाठी या पुस्तकात विविध क्लृप्त्या दिल्या आहेत. यातली सर्वांत कळीची आणि आजच्या काळातली अत्यावश्यक गोष्ट म्हणजे तणावमुक्ती!

या पुस्तकातले गृहीतक अगदी साधे आहे – उत्पादकता आणि ताणापासून मुक्त राहण्याची क्षमता, यांच्यामध्ये थेट संबंध असतो.

आपले मन मोकळे असेल आणि विचार सुसंघटित असतील, तरच आपण तणावमुक्त उत्पादकता साध्य करू शकतो आणि आपल्या सर्जनशील क्षमतांचा मुक्तपणे अविष्कार करू देऊ शकतो.

या पुस्तकातल्या साध्यासोप्या पद्धती वापरून पाहा, आणि आपल्या कामात तसेच वैयक्तिक जीवनातही नीटनेटकेपणा आणा; कार्यक्षमता आणि सर्जनशीलता वाढवा!

**१७ वी आवृत्ती**




# ही वाट एकटीची

## व.पु. काळे

**किंमत : १३०/-रु. पोस्टेज : २५/-रु.**

वपु काळे यांची अगदी पहिली आणि विलक्षण गाजलेली, महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभलेली कादंबरी... जीवनविषयक एक कठोर तत्त्वज्ञान परखडपणानं 'बाबी' या नायिकेच्या माध्यमातून मांडणारी ही कादंबरी म्हणजे एक अविस्मरणीय अनुभव आहे... तुम्ही तो घ्यायलाच हवा...



# शंकर पाटील यांचे साहित्य

**कथा**

| | |
|---|---|
| वावरी शेंग | ८० |
| इल्लम | ९० |
| जुगलबंदी | १०० |
| ताजमहालमध्ये सरपंच | १०० |
| बंधारा | १०० |
| आभाळ | १०० |
| घालमेल | १०० |
| पाऊलवाटा | १०० |
| खुशखरेदी | १०० |
| धिंड | ११० |
| भेटीगाठी | ११० |
| वळीव | १२० |
| फक्कड गोष्टी | १२० |
| श्रीगणेशा | १३० |
| पाटलांची चंची | १३० |
| गारवेल | १३० |
| खुळ्याची चावडी | १४० |

**कादंबरी**

| | |
|---|---|
| टारफुला | २५० |

**नाटक**

| | |
|---|---|
| लवंगी मिरची कोल्हापूरची | ६० |
| कथा अकलेच्या कांद्याची | ७० |

**अनुवादित कादंबरी**

| | |
|---|---|
| शापित वास्तू : नॅथनिल हॉथॉर्न | २८० |

नवे कोरे




# अँन्ड देअरबाय हँग्ज अ टेल

मूळ लेखक **जेफ्री आर्चर**
अनुवाद- **डॉ. देवदत्त केतकर**

**किंमत : २००/-रु. पोस्टेज :२५/-रु.**

जेफ्री आर्चर यांना त्यांच्या जगभराच्या भ्रमंतीतून सुचलेल्या १५ गोष्टींचा हा सहावा लघुकथासंग्रह.

'अ गुड आय' ही गोष्ट जर्मनीत घडते. एक अमूल्य तैलचित्र एका कुटुंबात दोनशे वर्षं असतं. पण एके दिवशी...

'मेंबर्स ओन्ली' या खाडीतल्या बेटावरच्या एका तरुणाला नाताळच्या पोतडीत गोल्फ बॉल मिळतो, आणि त्याचं आयुष्यच बदलून जातं.

इटलीत, 'नो रूम अॅट द इन'अशा स्थितीत हॉटेलात खोली घ्यायला गेलेला एक तरुण थेट तिथल्या रिसेप्शनिस्टच्या बिछान्यात पोचतो. इंग्लंडमध्ये तयार होणारे 'हाय हील्स' बुटांचे जोड सहजासहजी का जळून जाऊ शकत नाहीत, हे एक स्त्री तिच्या नवऱ्याला सांगते.

काही गोष्टींनी तुम्हाला हसू येईल... काहींनी डोळ्यांत पाणी येईल... पण त्या तुम्हाला खिळवून ठेवतील, हे नक्की.

**'द चेकलिस्ट मॅनिफेस्टो'**
या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद




# यशप्राप्तीचा जाहीरनामा!

लेखक : **अतुल गवांदे**
अनुवाद : **सुनिती काणे**

चेकलिस्ट म्हणजे काय?

चेकलिस्ट म्हणजे कुठलेही काम नीटपणे पार पाडण्यासाठी ते सुरू करण्यापूर्वी खातरजमा करायच्या गोष्टींची तपशीलवार यादी!

कल्पना अगदी अळणी आणि सुमार वाटतेय का?

परंतु प्रत्येक व्यवसायात ती किती मोलाची ठरते,

ते पाहण्यासाठी डॉक्टरांच्या, वैमानिकांच्या, बिल्डर्सच्या, आर्थिक गुंतवणूकदारांच्या, हॉटेल मॅनेजर्सच्या, स्टेज आर्टिस्टच्या जगात फेरफटका मारू या आणि घेऊ या अनेक थरारक अनुभव!




## O कवी नरेंद्र बोडके स्मृतिपुरस्कार

गोमंतकीय कवी पत्रकार नरेंद्र बोडके स्मृतिपुरस्कार यंदा पत्रकार सद्‌गुरु पाटील आणि प्रा. नीता तोरणे यांना यशवंत त्रैमासिकाच्या सहाव्या वर्धापनदिनी प्रदान करण्यात आले. त्याचवेळी कवी लोटलीकर, दया मित्रगोत्री, राजमेहर, सोनिया शहा, भास्कर पावस्कर, दयाराम पडलोस्कर, ज्ञानेश्वर आजगावकर, हृदयनाथ तांबोस्कर यांना यशवंत पुरस्कार देण्यात आले. गोमंतक साहित्य सेवक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात प्रा. श्रीकृष्ण अडसूळ यांनी कृषिविषयक साहित्य गोव्यात अधिक निर्माण व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. आर्थिक पाठबळ नसतानाही अवधूत कुडतरकर यांनी यशवंत हे त्रैमासिक गेली ६ वर्षे नेटाने चालवले आहे याबद्दल त्यांनी कौतुक केले. शंभुभाऊ बांदेकर यांनी कुडतरकर यांचा गौरव केला. यशवंत मध्ये प्रसिद्ध झालेल्या २७४ कवितांचा आणि शंभर लेखांचा संग्रह पुस्तक रूपाने काढण्याचा संकल्प अवधूत कुडतरकर यांनी जाहीर केला.

## C निळू फुले पुरस्कार

राष्ट्र सेवा दलाच्या निळू फुले अकादमीतर्फे आयोजित समारंभात अभिनेत्री लीला गांधी यांच्या हस्ते नाटक, तमाशा या माध्यमातून लोकांना खळखळून हसविणारे तर कधी रडवणारे लोककलावंत वसंत अवसरीकर यांना ‘निळू फुले स्मृती पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

गांधी म्हणाल्या, ‘‘कथा अकलेच्या कांद्याची या नाटकात आणि काही चित्रपटांत मी निळूभाऊंसोबत काम केले. हसरा स्वभाव, कमालीची नम्रता, शब्दांवर हुकूमत असलेला हा कलावंत होता. असा कलावंत पुन्हा होणे नाही.’’

यावेळी अभिनेते श्रीराम रानडे, प्रमोद पवार, डॉ. सतीश देसाई, शाहीर दादा पासलकर, दिग्दर्शक मेघराजराजे भोसले, सिंधू काटे, दीपक रेगे उपस्थित होते. सुरेश देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

## C वंदना घांगुर्डे यांना यंदाचा बालगंधर्व पुरस्कार जाहीर

मराठी रंगभूमीवरील ज्येष्ठ गायिका आणि अभिनेत्री वंदना घांगुर्डे यांना यंदाचा बालगंधर्व पुरस्कार २६ जून रोजी ज्येष्ट अभिनेते रमेश देव यांच्या उपस्थितीत प्रदान केला गेला. प्रतिवर्षी पुणे महापालिकेतर्फे हा पुरस्कार दिला जातो. वंदना घांगुर्डे यांनी मराठी रंगभूमीची सेवा करतानाच शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रातही ठसा उमटवला आहे. याच कार्यक्रमात संगीत व गद्य मराठी रंगभूमीच्या सेवेबद्दल यंदा ज्येष्ठ कलाकार रजनी भट, सतारवादक प्रमोद रोटे, संवाद लेखक प्रवीण तरडे, नृत्यांगना योगिता काजळे आणि पुरुषोत्तम करंडक विजेता क्षितिज दाते यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## C वनराई मासिकाला 'आइस अॅवॉर्ड'

'शैलजा नायर फाऊंडेशन'च्या वतीने देण्यात येणारा 'आइस अॅर्वार्ड - २०१३' हा पुरस्कार 'वनराई' मासिकाच्या वार्षिक विशेषांकाला सलग तिसऱ्या वर्षी मिळाला. ज्येष्ठ उद्योजक प्रताप नायर आणि राजीव चौहान यांच्या हस्ते वनराईचे संपादक अमित वाडेकर यांनी मुंबई येथे हा पुरस्कार स्वीकारला.

डॉ. मोहन धारिया यांनी स्थापन केलेल्या 'वनराई' संस्थेच्या 'खेड्याकडे परत चला' या वनराई विशेषांकाला 'एस ऑफ हार्ट' नावाने 'आइस अॅवॉर्ड - २०१३' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच अंकाला 'महाराष्ट्र साहित्य परिषदे'चा उत्कृष्ट दिवाळी अंकाचा पुरस्कारही मिळाला आहे. मुख्य प्रवाहातील व्यावसायिक मासिकांव्यतिरिक्त इतर मासिक अंकातील कल्पकतेला प्रोत्साहन देण्यासाठी 'आइस अॅवॉर्ड' हा पुरस्कार देण्यात येतो.

## C वसंतराव नाईक कृषी पुरस्कार

हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी कृषी पुरस्कार दिले जातात.

यंदाच्या सामाईक पुरस्कारासाठी जालन्याच्या कृषी विज्ञान केंद्राची निवड करण्यात आली आहे.

वार्तांकनचे संपादक आदिनाथ चव्हाण, शिरपूर पॅटर्नचे प्रणेते सुरेश खानापूरकर, डॉ. नितीन मार्कंडेय यांच्यासह ११ पुरस्कारार्थींना १ जुलै रोजी कृषी दिनी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार आणि मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. कृषिमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील हे देखील उपस्थित होते.

### C डॉ. जयंत नारळीकर यांना पी. डी. पाटील पुरस्कार

कराडच्या पी.डी.पाटील गौरव प्रतिष्ठानचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांना देण्यात आला.

डॉ. गुजर म्हणाले, ज्येष्ठ नेते पी.डी.पाटील गौरव प्रतिष्ठान २०११ पासून त्यांच्या नावाने महाराष्ट्र भूषण पुरस्कार महाराष्ट्राची प्रतिष्ठा जागतिक पातळीवर नेणाऱ्या व्यक्तींना हा देत आहे. यापूर्वी ख्यातनाम ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, समाजसेविका नसीमा हुरजूक यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. नारळीकर यांनी 'आयुका' या संस्थेला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवून दिली. वयाच्या २७ व्या वर्षी पद्मभूषण व नंतर पद्मविभूषण पुरस्काराने डॉ. नारळीकर यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### C नरुभाऊ लिमये पुरस्कार प्रदान

'चांगले काम करणाऱ्या सहकारी संस्थांच्या पाठीशी राज्य सरकार नक्कीच उभे राहील, परंतु या संस्थांनी शिस्त पाळली पाहिजे,' अशी भूमिका मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी स्पष्ट केली.

महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाच्या वतीने सहकार-राजकारण क्षेत्रातील ज्येष्ठ नेते अप्पासाहेब राजळे आणि 'लोकमत'चे मुख्य संपादक विजय कुवळेकर यांना नरुभाऊ लिमये स्मृती आर्यभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, जलसंपदा मंत्री शशिकांत शिंदे, खासदार वंदना चव्हाण आदी उपस्थित होते.

'नियंत्रित अर्थव्यवस्थेतील बंधने दूर केल्यानंतर सहकारी संस्थांना खाजगी संस्थांशी स्पर्धा करावी लागली. आता बदलत्या काळात सहकारी संस्थांनी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. राज्य सहकारी बँकेचे कामकाज परवान्याशिवाय सुरू होते. अखेर रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार कार्यवाही करून तिला परवाना मिळाला. तसेच सहकारी साखर कारखान्यांना इन्कमटॅक्स लावू नये, यासाठीही प्रयत्न सुरू आहेत' असे त्यांनी नमूद केले.

### C वर्ध्याच्या इंद्रजित कदमला कान्समध्ये दोन कांस्यपदके

जाहिरात क्षेत्रासाठी अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या कान्स आंतरराष्ट्रीय जाहिरात उत्सवात इंद्रजित कदम या वैदर्भीय युवकाने 'ग्राफिक डिझाइन' व 'इलस्ट्रेशन ग्राफ्ट' या दोन गटांत दोन कांस्यपदकेही मिळवली आहेत.

आंतरराष्ट्रीय पातळीवर कान्स (फ्रान्स) येथे दरवर्षी जाहिरात महोत्सव होतो.

या वर्षीच्या महोत्सवात त्याने प्रथमच प्रवेशिका पाठविली होती. सध्याच्या युगात ६५ वी कला ठरलेल्या जाहिरात क्षेत्रात युवकांना खूप वाव आहे. ही वाट पत्करल्यास उज्ज्वल भविष्य लाभू शकते. त्याचे वडील राजेंद्र कदम हे अमरावती येथे प्राध्यापक असून, आई आशा कदम देऊरवाड्याच्या सरपंच आहेत. त्याने मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून फाइन आर्टची पदवी घेतली आणि जाहिरातक्षेत्रात पाऊल टाकले. पाच-सहा वर्षे काही कंपन्यांमध्ये काम केले. त्यानंतर मुंबईच्या बीबीडीओ कंपनीत त्याला संधी मिळाली.

### C ‘बडोदा सन जीवनगौरव’

बँक ऑफ बडोदाचा ‘बडोदा सन जीवनगौरव’ पुरस्कार ‘सकाळ माध्यम समूहा’चे संपादक संचालक उत्तम कांबळे यांना बँकेच्या १०६ व्या स्थापनदिनी २० जुलैला मुंबईतील एनसीपीए सभागृहात देण्यात आला.

पाच वेळा जग्गजेती ठरलेली मुष्टियोद्धा मेरी कोम (क्रीडा), ख्यातनाम रेडिओ निवेदक अमीन सयानी (कला), ज्येष्ठ अंतराळ संशोधक व भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) प्रकल्पप्रमुख श्रीमती एन. क्लारमथी (विज्ञान), अहमदाबाद येथील डॉ. विक्रम पटेल (वैद्यक) हेदेखील पुरस्काराचे मानकरी आहेत.

वैद्यक, विज्ञान, कला, चित्रपट, साहित्य, समाजसेवा, क्रीडा आदी क्षेत्रांत सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना बँकेतर्फे दर वर्षी हा पुरस्कार दिला जातो. बँक ऑफ बडोदाचे अध्यक्ष एस. एस. मुंदडा म्हणाले, ‘‘प्रत्येकी पाच लाख रुपये रोख व सन्मानपत्र, असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराची रक्कम गौरवार्थींनी निवड केलेल्या स्वयंसेवी संस्थेला दिली जावी, अशी अंगभूत अट आहे.’’ त्यानुसार मायको एम्प्लॉईज फोरमच्या मानव सेवा केंद्राला पुरस्काराची रक्कम देण्याची घोषणा श्री. कांबळे यांनी केली. मानव सेवा केंद्राने चिखलवाडी (ता. त्र्यंबकेश्वर) हे आदिवासी गाव दत्तक घेतले आहे.

लहान मुलांच्या जीवनात पुस्तकांना पर्यायी असे काहीच नसते.

*- मीतेच हेडबर्ग*




# आईबद्दल लिहिताना...



‘अपूर्व, अलौकिक, एकमेव...’ हे माझे व्यक्तिचित्रणांचे पुस्तक प्रकाशित झाले. ते अल्पावधीतच वाचकांपर्यंत पोचले आणि उत्साही वाचकांच्या प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली. त्यातल्या बऱ्यांच जणांचा एक सूर होता... “तुम्ही तुमचे आजी-आजोबा, वडील, इतर सग्यासोयऱ्यांबद्दल इतक्या मोकळेपणानं लिहिलं आहे, पण आईबद्दल मात्र काहीच कसं लिहिलं नाही?”

आता ही म्हटली तर तक्रार, आग्रह किंवा नाराजीसुद्धा बघायला गेलं तर बरोबरच! पण आईबद्दल लिहिणं म्हणजे... मराठी साहित्यक्षेत्रात, विविध साहित्यप्रकारात दीर्घकाळ बहुरंगी, लालित्यपूर्ण लेखन सातत्याने करत आलेली, अनेक मान-सन्मान पुरस्कारांनी अलंकृत, गोमंतक मराठी साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सन्मानपूर्वक विराजमान होण्याचा मान लाभलेली सिद्धहस्त लेखिका श्रीमती माधवी देसाई! मुळातच तिचे व्यक्तिमत्त्व एवढ्याशा परिघात बंदिस्त होण्यासारखे नव्हते. बेळगावात जन्मलेल्या लहानग्या ‘आबी’पासून प्रथितयश साहित्यिकापर्यंतचा तिचा दीर्घ प्रवास. या प्रवासातली अवघड वळणे, खडतर अडचणींचे डोंगर, निसरड्या दऱ्या, भुलभुलैय्यात चक्रावून टाकणाऱ्या दलदली मोठ्या शर्थीने पार करत गोमंतकाच्या पवित्र भूमीत आपले घरकुल नव्याने उभारणारी ‘गोमंत सौदामिनी’ तिथल्या झाडा-पेडांवर, ओढे-बहाळांवर माया करणारी. साळेळीसारख्या आडवाटेच्या गावातल्या खाणमाफियांविरुद्धच्या संग्रामात तिथल्या कष्टकरी महिलांच्या सहाय्याला धावून जाणारी, सामाजिक न्यायासाठी सतत लढणारी जागरूक नागरिक, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक अशी तिची अनेक रूपे मला नेहमीच चक्रावून टाकत आली आहेत. जशी तिच्या प्रत्येक साहित्यकृतीची विस्तृत, विविधांगी समीक्षा करता येईल तसेच

आईच्या साहित्यिक, सामाजिक, कौटुंबिक व व्यक्तिगत पैलूंबद्दल अनेक प्रकारे लिहिता येईल. पण म्हणून तिच्याबद्दल लिहिणे, तेही मी, प्रत्यक्ष तिच्या मुलीने किती कठीण आहे हे मला नेहमीच जाणवत आले आहे. या यक्ष प्रश्नाशी अनेकदा टक्कर देऊन त्याचे उत्तर एवढेच मिळते की आईच्या इतक्या आठवणी आमच्यापाशी आहेत की मी, मीरा आणि गीतांजली मिळून एक 'सागा'च लिहिण्याचा संकल्प सोडावा लागेल. तरीही आईच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचे कंगोरे पूर्णपणे उलगडणे शक्य होणार नाही.

आईचे गोव्यात परतून येणे, महालक्ष्मीच्या सान्निध्यातले आमचे जुने घर उघडणे, तिथे एकाकी वास्तव्य करून विपुल साहित्यनिर्मिती करणे हे वाटते तितके सोपे मुळीच नव्हते. अस्तित्वाचे सगळे आधार कोसळलेल्या परिस्थितीत ती गोव्यात आली. आईने घराचे दार त्या भल्यामोठ्या लोखंडी पोर्तुगीज किल्लीने उघडले तेव्हा इतकी वर्षे अंधाराच्या बुरख्यात तोंड लपवून बसलेले घर दचकत शहारले, थरथरत जागे झाले. त्या दुर्लक्षित वास्तूत आईने दिवली पेटवून घराच्या अंतरंगात जणू आशेचा किरण प्रज्वलित केला. या घराचे विरूप बघतबघता आई आपले दुःख विसरत गेली. नव्हे, या घराने तिला ते विसरायला लावले. भूतकाळाची पावले मागे पळत गेली तसे घर बदलले, ते साजरे झाले. तिच्या नातींच्या नावानुसार लावलेल्या बागेतल्या जाई, सायली, प्राजक्ताची निगा राखण्यात, देव्हाऱ्यातल्या महालक्ष्मीबरोबर घरापाठच्या पुरातन 'पेडा'ची श्रद्धापूर्वक पूजाअर्चा करण्यात आईचा जीव रमला. घर आणि बागेची निगा हे तिच्या लेखी लिखाणाइतकेच महत्त्वाचे बनून गेले. तिने मोठ्या कौतुकाने लावलेल्या केळींना घड आले की तिची भूक झोप उडून जाई. कारण त्या वासाने चवताळलेली माकडांची झुंड मागच्या गाळीतून कडकडीत दुपारी घराच्या कौलारू छपरावर झेपावत उतरायची तेव्हा आपल्या एवढ्या मोठ्या माधवीताई 'जळ्ळया मेल्या माकडांना' हाकलायला काठी घेऊन पळत बाहेर यायच्या. कारण ते सगळे नारळ, केळी तिच्या नातवंडांच्या पोटात पडायला हवेत ना! एकदा तर तिने केळ्यांचे इतके घड नीट पॅक करून गावातल्या बातिशअंकलबरोबर मुंबईला घरपोच पाठवले होते की सकाळ-दुपार-संध्याकाळ केळ्यांचे काप, हलवा, शिकरण, भजी असे पदार्थ करून आम्ही पार बेजार होऊन गेलो.

आईची सगळी नातवंडे चांगली शिकली. सगळ्यात आधी जाई, मग पावलावर पाऊल टाकून सायली शिक्षणासाठी परदेशी गेल्या, त्यांचे करिअर, घरप्रपंच अगदी मजेत चाललं आहे. चैतन्य लंडनला कॉव्हेन्ट्री युनिव्हर्सिटीत पोस्ट ग्रॅज्युएशन करतोय तर सगळ्यात धाकटं शेंडेफळ प्राजक्ताची प्लेसमेंट टोकियोला

झाल्यामुळे ती सध्या जपानी भाषेच्या अभ्यासात गुंतून गेली आहे याचे आईला अपरंपार कौतुक होते. मग त्या प्रत्येकाच्या नावाने महालक्ष्मीला रोज एक फूल वाहणे, तिला साकडे घालणे, त्यांचं सगळं बरं... कर, त्यांना चांगली बुद्धी दे, त्यांच्या तब्येतीची काळजी घे अशा विनवण्या करणे यात माधवीताई तन्मय होऊन जात. आता त्यात भर पडली आहे तिच्या पणत्या - साची आणि केया यांची! मुलींच्या बाबतीत अतिशय दक्ष, कडक असणारी आई नातवंडांच्या-पणतवंडांच्या बाबतीत मात्र अतिशय विरघळलेली आजी-पणजी कशी व्हायची, ते मला आता कुठं उमजायला लागलंय!

पण आईचा गोव्यातला परिवार एवढ्यापुरताच मर्यादित राहिला नाही. महालक्ष्मीच्या दारात फुलं विकणाऱ्या लहान-लहान मुली हा तिच्या चिंतनाचा, काळजीचा विषय होता. यातलीच शरद आईच्या हाताशी म्हणून घरकामाला आली आणि घरचीच होऊन गेली. आदरणीय अप्पा ढवळीकरांच्या घरातल्या मृगया-मृणाली, देऊस्कर गुरुजींचा वेदशाळेत अध्ययन करणारा भालचंद्र, काटकरांचा शरण, केरकरांची समृद्धी, सगळी बुर्गी-बाळा माधवीताईंच्या घरात कधीही येऊन टपकत तर कधी डायसची लितियाना बॅगेत चार कपडे भरून 'चतुर्थी'ला किंवा रामनवमीला जत्रेसाठी रहायलाच आलेली असे. 'स्नेहमंदिर' मधले सीनियर सिटिझन्स आणि 'मातृमंदिर'मधली अनाथ मुलेही तिच्या त्या विस्तृत परिवारात समावलेली भाग होती. स्वत:च्या आयुष्यातले अनेक 'नको-नकार-नाही' पचवलेली ही बाई त्यांच्या पाठीशी नेहमीच ठाम उभी राहिली.

बांदोड्यासारख्या आडगावात वेळेप्रसंगाला एखादे बिस्किटांचे पॅकेटही मिळण्याची मारामार. पण आईच्या घरात येणारे सगळे सोयरे, तिच्या लिखाणावर लुब्ध असणारे देश-परदेशातले वाचक, विविध भाषिक साहित्यिक, राजकारणी, नॅशनल रेयॉन स्कूलमधले तिचे जुने विद्यार्थी, पत्रकार, राजकारणी सर्वांचा या घरात उत्तम पाहुणचार होत आला. ती सगळीजण गोव्यात माधवीताईंच्या पत्त्यावर अचूक येऊन थडकायची, त्या घरच्या खास गोमंतकीय आदरातिथ्यानं भरलेली पोटं अन् सुखावलेली मनं घेऊन परतल्यावर मुद्दाम फोन करून सांगायची, ''जाऊन आलो बरं! काय मस्तंय् तुमचं घर... आणि माधवीताईंचा पाहुणचार... अजून जिभेवर चव आहे हो!!'' यातल्या खोचक इशाऱ्याकडे दुर्लक्ष करायची मी पुढे पुढे सवयच करून घेतली.

आई गोव्यात आली, ती इथे रुजली, ती गोव्याचीच झाली. गोमंतकीय स्त्रीची भाषा, सुगरणपणाचा अभिमान, जीवनशैलीचा तोल, कुटुंबसंस्कृतीला भक्कम आधार देण्याचे कसब, कुळदेवतेवरची नितांत श्रद्धा आणि समाजात वावरतानाही

वैयक्तिक-कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे भान हे गुण-विशेष तिने पूर्णत: आत्मसात केले. गोमंतकीय ग्रामीण संस्कृतीशी ती एकरूप झाली. गोव्याची पवित्र भूमी, स्वच्छ आकाश, सळसळणारा समुद्र आणि हिरव्यागर्द वनराजीतून सतत जाणवणारी चैतन्यमय ऊर्जा त्या परमतत्त्वाची साक्ष देत असते. मग अशा वातावरणात आईच्या साहित्यनिर्मितीला नवे धुमारे सुटले नाहीत तरच नवल! गोव्यात येण्यापूर्वी 'चकवा', 'सायली'(कविता) 'मंजिरी', 'नियती' (कादंबऱ्या) आणि 'कठपुतळी' (कथासंग्रह) एवढेच लिखाण तिच्या खाती जमा होते; पण गोव्यात स्थिरावल्यावर 'कांचनगंगा', 'प्रार्थना', 'सीमारेषा', 'कथा एका परिवर्तनाची' अशा कादंबऱ्या, कथासंग्रह, ललितलेख, 'विश्वरंग' सारखी चरितकहाणी, 'गोमंत सौदामिनी' कर्तृत्वशाली गोमंतकीय महिलांचे चरितपट अशा विविध साहित्यकृतींचे लेखन तिने केले. या सर्वांवर सुवर्णकळस म्हणून समकालीन चित्रकला, संगीत, अभिनय, साहित्य, चित्रपट निर्मिती, शिक्षण, कायदा, सुरक्षा, उद्योग अशा विविध क्षेत्रातल्या गोमंतकीय स्त्रीच्या मानदंडात्मक कार्याचा आलेख मांडणारा 'सूर्यफुलांचा प्रदेश' हा ग्रंथ तिने अतिशय परिश्रमपूर्वक संशोधन करून पूर्ण केला. या गौरवग्रंथाची तिने केलेली आखणी, त्या कर्तृत्वशालिनींची निवड करताना वापरलेले निकष, त्यांची माहिती मिळवण्यासाठी माहितीच्या कायद्याचा केलेला वापर, मग त्या महिलांच्या मुलाखती घेण्यासाठी केलेली पायपीट, त्यासाठी केलेले वेळेचे नियोजन, एवढ्या मोठ्या कामासाठी केलेली जमाखर्चाची तजवीज आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करून ठरलेल्या वेळेपूर्वी पूर्ण केलेले पुस्तक पाहून मन स्तिमित होते. २००९च्या महिलादिनाचे औचित्य साधून या पुस्तकाचे प्रकाशन थाटामाटात करण्यात आले तेव्हा व्यासपीठावर आईबरोबर होत्या ज्येष्ठ रंगकर्मी सुलभा देशपांडे, निर्मात्या-दिग्दर्शिका मधुरा जसराज, या कार्यासाठी भक्कम आर्थिक पाठबळ देणाऱ्या नीलाताई धेंपे, त्यांच्या सूनबाई पल्लवी धेपे आणि सुपुत्र श्रीनिवास धेंपे! आणि समोर खचाखच भरलेल्या प्रेक्षागृहात होत्या सरोजिनी सार्दिन, हर्षदा केरकर, सत्यवती पार्सेकर, छाया गवस, फातिमा अनिल अशा पन्नासहून अधिक कर्तृत्ववान गोमंतकन्या आणि त्यांचे कौतुक करायला अगदी आपल्या घरचेच कार्य असल्यासारख्या नटूनथटून आलेल्या अगणित महिला! हा अभूतपूर्व सोहळा ज्यांना बघायला मिळाला ते खरे भाग्यवान! एकाकी अवस्थेत गोव्यात आलेली आई गोमंतकीय मातीशी, तिथल्या मुलामाणसांशी किती एकरूप झाली आहे ते त्या दिवशी क्षणोक्षणी प्रत्ययाला येत होते. तिथे औपचारिकपणाचा लवलेशही नव्हता. तिथल्या प्रत्येक महिलेला ती नावाने ओळखत होती, तिच्या परिवारातल्या माणसांशी विशेषत: मुलांशी तिचे मैत्र जुळले होते. प्रेम, स्नेह व आपुलकीच्या

धाग्यांनी तिने जोडलेला तो भलामोठा परिवार बघून मन चकित होत होते, आनंदाने भरून आश्वस्त होत होते.

मुंबईसारख्या करोडोंच्या गर्दीने गजबजलेल्या महानगरात जगणाऱ्यांपैकी मी एक व्यक्ती! त्यातल्या अनेकांकडे अनेकपटीने संपत्ती, समृद्धी आहे, पण त्यांच्याकडे जे नाही ते माझ्याकडे आहे. मला गाव आहे, त्या गावात माझी पूर्वजांची वास्तू आहे आणि त्या वास्तूवर जिवापाड प्रेम करणारी, त्या एका दुव्याने या देशी-परदेशी पांगलेल्या कुटुंबाला बांधून ठेवणारी आई आम्हाला लाभली आहे ही आम्हा बहिणींसाठी अभिमानाची बाब आहे. या भूमीने आईला स्थैर्य दिले, साहित्यनिर्मितीला वाव दिला, साहित्य चळवळीसाठी कार्यक्षेत्र मिळवून दिले, वाचकांचा अपार स्नेह, अनेक मान-सन्मान, पुरस्कार आणि साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ते ही निवडणुकीच्या धुराळ्यांशिवाय, बिनविरोध होण्याच्या सन्मानही आमच्या गोव्यानेच तिला दिला. 'आतले' आणि 'बाहेरचे' हा भेदाभेद पार मोडीत काढून गोमंतकाने हा मान एका ज्येष्ठ लेखिकेला दिला यातच सगळे भरून पावले आहे. आई जर महाराष्ट्रात राहिली असती तर हे सगळे असे झाले असते का या प्रश्नाचे उत्तर मी कितीही वस्तुनिष्ठपणे शोधले तरी होकारार्थी मिळत नाही. गोव्यात राहून मराठीची अस्मिता जागृत ठेवण्याचे कार्य ज्या लेखिकेने केले त्या सिद्धहस्त लेखिकेच्या एकाही पुस्तकाला महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभला नाही. मराठी साहित्यात अतिशय प्रतिष्ठेचा मानला जाणारा दमाणी पुरस्कार, कोमसापने 'विभावरीच्या लेकी' म्हणून केलेला सन्मान, शंकरराव मोहिते पाटील पुरस्कार असे काही मोजके पुरस्कार महाराष्ट्राने तिला दिले. कोणताही खरा साहित्यिक पैशासाठी, कीर्तीसाठी लिहित नाही, तो लिहितो त्या कौतुकाच्या थापेसाठी! त्या कौतुकाच्या थापेची, प्रेम-आदराची पूर्ती गोमंतकाने भरभरून केली. आईचे आपल्या या कर्मभूमीवरचे निरतिशय प्रेम तिच्या साहित्यातून सतत जाणवत राहते. विशेषत: 'गोमंत सौदामिनी', 'सूर्यफुलांचा प्रदेश' आणि 'स्वयंसिद्धा आम्ही' यातून गोव्याच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातल्या राजकीय-सामाजिक पार्श्वभूमीवर गोमंतकीय महिलांच्या कर्तृत्वाचे उज्ज्वल चित्रण करून तिने गोव्याच्या पर्यटनविषयक जाहिरातींद्वारा प्रसारमाध्यमातून तसेच साहित्यातून सतत भावीण-देवदासी म्हणून केल्या जाणाऱ्या 'सवंग' चित्रणाला सडेतोड उत्तर दिले आणि गोमंतकाचे ऋण फेडण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला.

खूप अभावाचे होते तिचे आयुष्य, पण त्यावर सतत मात करून ती अत्यंत सुंदर आणि समृद्ध आयुष्य जगली. आपली ऊर्जा तिने सकारात्मकतेने तिच्यादृष्ट्या योग्य सामाजिक कार्यासाठी वापरली. पण आतून सतत धडका देणारी ती ऊर्जाच

एका बेसावध क्षणी तिला पांगळी करून गेली. तो धक्का आईच्या सहनशक्ती पलिकडचा होता. स्वत:ची सामाजिक प्रतिमा अशी हिरावून गेल्याचे दु:ख तिला जास्त हादरवत गेले. एकाकीपणाच्या अंधारात ती बुडत गेली. आम्ही सगळ्या तिच्या सतत बरोबरच होतो, नाती दूरदेशाहून धावत-पळत आबीला भेटायला आल्या, पणतवंडांच्या चळवळींचे 'बुलेटिन' तिला रोजच मिळत असे. साचीनं तर तिला एकदा, ''रॉयॉ, मी पटंग उडवित होटे...'' असं गाणं म्हणून तिला हसवून हसवून बेजार करून टाकले. त्यांचे फोन आले की ती खूश होऊन जायची. आणि हेही खरं आहे की ज्या महालक्ष्मीनं तिची दृष्टी हिरावून घेतली, त्या महामायेनं तिला कुशीत घेण्यापूर्वी तिची सगळी स्वप्नं पुरी केली. कित्येक वर्षे गोव्यात थबकले तिचा लाडका नातू चैतन्य पदव्युत्तर शिक्षणासाठी परदेशी गेला. सायली-नीलनं अमेरिकेत अगदी गोव्याच्या घरासारखं मोठं कौलारू घर घेतलं. साची-केयाची काळजी घ्यायला त्यांचे आजी-आजोबा एँटवर्पला जाऊन दाखल झाले. सगळे कुटुंबीय आपापल्या परीने स्थिरावत गेले. जे जे तिला अभिप्रेत होते ते ते सगळे घडत गेले. संघर्ष आणि बदल हा आजच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. त्यातून मार्ग काढत पुढे चालत रहायचं आहे हे जाणण्याइतकी सगळी शहाणी झाली आहेत.

ती गेली ते कळल्यावर सैरभैर झालेल्या मन:स्थितीत मी पहिला फोन केला तो मनीषला! मनीष मेहता, तिचा नॅशनल रेयॉनमधला लाडका विद्यार्थी. शाळेत दंगेखोर म्हणून प्रसिद्ध असलेल्या मनीषला धाक होता तो त्याच्या अंगाला कधी चार बोटंही न लावलेल्या काटकर बाईंचा! अशा अनेक विद्यार्थ्यांना तिनं शिकवून, सुजाण, संवेदनशील नागरिक म्हणून घडवलं. मनीषची प्रतिक्रिया फेसबुकवर अशी उमटली :

'This was the teacher I was blessed and privileged to be with. She taught me a language in a way that cannot be replicated in this generation. She made me (a pure Gujju!) to speak Marathi as my second language. I can and do pass off as a Maharashtrain in Govt. offices, thanks to her! She taught us with love and affection rarely seen nowadays in this generation of tuition oriented teacher. A smile which broke hearts and bleesed troubled souls. May her soul teach the people up there the language, as only she could teach! I miss her and always will...'

Manish Mehta

आणि लगेच पनवेलहून ओक्साबोक्शी रडणारी मनकुमारी, शारजाहून अमूल नवरे, ऑस्ट्रेलियाहून भरत कौशिक, कल्याणहून उत्तम जोगदंड, विवेक,

श्रीकांत... नाशिकहून सुनील घुमडे... शेकडो नावे... आज तिने नॅशनल रेयॉन सोडून तीसहून अधिक वर्षे लोटून गेली तरी तिला आदरांजली देणाऱ्यात सगळ्यात मोठी संख्या आहे ती तिच्या विद्यार्थ्यांची! केवळ विद्यार्थी म्हणून नव्हे तर भारताचे सुबुद्ध, प्रामाणिक नागरिक म्हणून घडवण्याची तिची तळमळ, त्या काटकरबाईंच्या आठवणी त्यांनी मनात जपून ठेवल्या आहेत.

आईच्या शेवटच्या महायात्रेत सामील होण्यासाठी गोवा, बेळगावमधली अनेक धुरीण व्यक्तिमत्त्वे धावत आली. शारदीय ग्रंथप्रसारक मंडळीतल्या तिच्या सख्या, मानसकन्या... त्या सगळ्यांशी ती बांधली गेली होती. प्रत्येकजण तिच्या आठवणी काढत होता, श्रद्धांजलीचे चार शब्द बोलून मूक होत होता. मूक वेदनेचा सागरच तिच्या आजूबाजूला उसळला होता. सगळा आसमंत त्यात बुडला होता. नातवंडांचे फोन सुरू होते, तीही धक्क्याने कोसळून गेली होती. वाटलं, माधवीताई, कशा मुक्त व्हाल तुम्ही या सगळ्या बंधनातून?की मुक्ती मिळणारच नाही? आमच्या भोवती, आपल्या घराभोवती, महालक्ष्मीच्या परिसरात भिरभिरत तडफडत राहील आत्मा?

काय करू कसं करू म्हणजे या सर्व चर-अचराच्या पलिकडे जात त्या सत्-चित्स्वरूपाशी एक व्हाल? जन्म-मृत्यूच्या सदैव चालणाऱ्या वेदनामय चक्रातून सुटून जात, माथ्यावरच्या आकाशात एक तेज:पुंज तारका होऊन चमकत, जग प्रकाशमान करत राहाल? राहाल नां?

काही समजेनासं होत गेलं. तिच्या अस्थी सावडायला आम्ही तिघी गेलो तेव्हा बघितलं तर तिच्या कृश कुडीचे कोणतेही अवशेष शिल्लक राहिले नव्हते. फक्त राखच राख मागे उरली होती. ते बघून आम्हाला रडू आवरेना. एवढी कर्तबगार आपली आई, पण मागे काहीच कसं राहिलं नाही? पण रडू जसं कोसळत बाहेर आलं तसं मन आतून शांत होत गेलं. ती खरोखरच अज्ञाताच्या पुलावरून पुढच्या प्रवासाला निघून गेली होती. या लाग्याबांध्यांच्या पाशातून मोकळी होऊन त्या सत्‌चित् स्वरूपाशी एकरूप झाली होती. मुली नातवंडांच्या हाका तिला आता त्या गूढप्रदेशात ऐकू येणार नव्हत्या. पण तसं निघून जातानाही ‘ताठ कण्यानं जगा’ हा संदेश ती आमच्यासाठी ठेवून गेली होती. आयुष्याच्या पुढच्या वाटचालीत तसं जगत राहणं हीच आमची तिघींची तिला खरी श्रद्धांजली ठरेल.

- यशोधरा काटकर
१२ / अे, रेशम अपार्टमेंटस्
सात बंगला, वर्सोवा, अंधेरी (प) मुंबई ६१
मो : ९८२११४८८१० / ९१६७७६८२१०

## आगामी




# व्याधिमुक्त

मूळ लेखिका : **गीता आनंद**
अनुवाद : **डॉ.सुभाष दांडेकर**

पॉम्पे व्याधी ही एक जनुकीय दोषामुळे होणारी व्याधी असून या रुग्णांमध्ये विशिष्ट वीकराच्या अभावामुळे रुग्णाचे सर्व स्नायू दुर्बल होत जातात. इतके अशक्त की, त्या बालकाला हसणे, बोलणे, गिळणे, श्वास घेणे अशक्य होते. श्वसन यंत्राच्या मदतीने श्वसन चालू ठेवावे लागते. दोन-तीन वर्षांत बाळ मृत्युमुखी पडते. ही व्याधी झालेल्या आपल्या दीड वर्षांच्या मुलीला व सहा महिन्यांच्या मुलाला वाचवण्यासाठी जिवाचे रान करून जॉन क्रौली शंभर दशलक्ष डॉलर्स जमवून संशोधनाला मदत करतो आणि अखेरीस आपली मुले आणि या व्याधीने ग्रस्त असलेल्या जगभरातल्या बालकांना जीवनदायी औषध मिळवून देतो.

जॉन व त्याची पत्नी एलीन यांचे परस्परांवरील व मुलांवरील प्रेम आणि दुर्दम्य आशा यांची ही सत्यकथा कल्पनेपेक्षाही वास्तवावर आधारित आहे. हे पुस्तक वाचणे, हा एक वेगळाच अनुभव आहे. पुस्तक वाचताना दुःखाने आणि आनंदाने डोळ्यांत अश्रू आले नाहीत, रोमांचित झाला नाहीत, असे होणे अशक्यच आहे!




# शब्दवेध

नवनवीन कल्पना, संवेदना, स्पष्ट करणाऱ्या नवनवीन शब्दांचा आश्चर्यकारक धांडोळा.




लेखक

**प्रा. डॉ. चंद्रकांत सहस्त्रबुद्धे**

पृष्ठे **१७२**।१६०रु. पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

इंग्लिश भाषेत दर वर्षी हजारो शब्दांची भर पडत आहे. इतर भाषांमधून, इतर देशांतून शब्द घेण्याची तिची क्षमता विलक्षण आहे. जुन्या शब्दांना नवे अर्थ, नवे संदर्भ, नवे रूप देण्याची तिची लवचिकता स्तिमित करणारी आहे. इंग्लिश पुस्तके जन्मभर वाचणाऱ्या वाचकांनाही आजची इंग्लिश वृत्तपत्रे आणि ब्लॉग्ज वाचताना अपरिचित, अनाकलनीय, गोंधळात टाकणारे अनेक शब्द भेटतात आणि त्यांचा नेमका अर्थ-संदर्भ लावण्यासाठी मेंदूला ताण द्यावा लागतो. त्यामुळे अशा शब्दांचा शोध घेणारे अनेक जागरूक अभ्यासकही जगभर कार्यरत असतात आणि त्यांचे स्तंभही पुरवण्यांतून वा नियतकालिकांतून वर्षानुवर्षे प्रसिद्ध होत असतात. त्या शब्दांच्या वेगवेगळ्या अर्थच्छटा सूक्ष्मपणे प्रकट करणाऱ्या लेखक-पत्रकारांचा आणि अभ्यासकांचा व्यासंग इंग्लिश भाषेला नवी झळाळी देत असतो.

'शब्दवेध' या छोटेखानी पुस्तकात डॉ. चंद्रकांत सहस्रबुद्धे यांनी विज्ञानावर स्तंभलेखन लिहिण्याच्या निमित्ताने अशा काही शब्दांकडे आणि त्यांच्या अर्थ-संदर्भाकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे.

१९७० ते २००४ या काळात ते नाशिकच्या हंसराज प्रागजी महाविद्यालयात पदार्थविज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, संगणकविज्ञान या विषयांचे अध्यापन करीत होते. १९९२ पासून नाशिकच्या दैनिकांमध्ये त्यांनी विज्ञान-तंत्रज्ञानावर विविध लेखमाला चालवल्या. त्यातूनच त्यांची मानवी मेंदू, रक्तशास्त्र, विषविज्ञान, नॅनोतंत्र वगैरे विषयांवरील तीस पुस्तके प्रसिद्ध झाली. त्यांच्या या अध्यापनातूनच 'शब्दवेध' या पुस्तकाचीही निर्मिती झाली. हे तसे शब्दांची व्युत्पत्ती वा अर्थ लावणारे व्याकरणविषयक पुस्तक नाही. उलट विज्ञानविषयक काही निरीक्षणे नोंदवणारे लेखन आहे हे खरे; पण त्या निमित्ताने काही वैशिष्ट्यपूर्ण शब्दांची आणि शब्दप्रयोगांची खासियतही त्यांनी प्रकट केली आहे.

विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन संकल्पना, नवे संशोधन, नवे आकलन स्पष्ट करणाऱ्या नव्या शब्दांचा वापर आणि जुन्या शब्दांचे अर्थान्तर याकडेही ते लक्ष वेधतात. त्यामुळे वाचकांना ज्ञानाबरोबर बौद्धिक रंजनाचाही प्रत्यय येतो. आपल्याला नवे काहीतरी कळते; आणि आपल्या जिज्ञासेला नवे खाद्य मिळते. इंग्लिशचे बऱ्यापैकी ज्ञान असणाऱ्या व्यक्तीलाही बुचकळ्यात पाडणारे अनेक शब्द या पुस्तकात सापडतील आणि आपल्याला खरोखरच इंग्लिश येते का असा प्रश्नही कदाचित् पडेल.

इरिडयम फ्लेअर, हायपर ॲक्युसिस, नुलार्बर, सॉसव्हीलन्स, रिॲक्टन्स, फल्गुराईट, जिलेटॉलॉजी, रॅफ्लेशिया, ट्रॉग्लोबाइट, स्कोव्हील स्केल, वेलक्रो, एंटोमोफॅगस, टेरॉई, वर्नलायझेशन हे शब्द उच्चारले तर त्यातील किती शब्दांचा

अर्थ आपल्याला छातीठोकपणे सांगता येईल? या पुस्तकामुळे आपला इंग्लिश व्यासंगाचा भ्रम दूर होईल हे नक्की! या शब्दांच्या निमित्ताने डॉ. सहस्रबुद्धे अनेक ज्ञानशाखांचा स्वैर फेरफटका करण्याची संधी वाचकांना देतात.

या पुस्तकातील पहिल्याच लेखाद्वारे त्याची चुणूक बघायला मिळते.

पौगंडावस्थेतील मुले– टीन एजर्स-बारा ते वीस वर्षे या वयोगटातील मुले ही पालक जे सांगतात त्याच्या नेमकी उलट वागतात. बंडखोर असतात. अमुक करू नको, तमुक करू नको, असे खरे तर त्याच्या हिताच्या दृष्टीनेच पालक सांगतात, पण ते धुडकावून लावून ही मुले व्यसनांच्या आहारी जातात, उनाड मित्रांबरोबर वेळ घालवतात, वाहने बेदरकारपणे चालवतात, मद्य-गर्द सेवन करतात... वगैरे वगैरे. ही प्रवृत्ती सर्व देशात, सर्व थरात आढळते. या वर्तनासाठी रिॲक्टन्स हा शब्द वापरतात. सांगितल्याच्या विरुद्ध वागणे असा त्याचा अर्थ. विशिष्ट वयात ही प्रवृत्ती सरसहा आढळते. ही एक मानसशास्त्रीय भावना असून, तिचा संबंध आपल्या फ्रंटल मेंदूच्या वाढीशी आणि विकासाशी असतो, हे जॅक ब्रेमन याला संशोधनातून जाणवले आणि त्याने रिॲक्टन्स असे नाव दिले. याद्वारे मी स्वत: माझे निर्णय घेऊ शकतो, ते घेण्यास मी समर्थ आहे हे टीन एजर्सना पटवून द्यायचे असते. त्यावर तान्या चार्टरॅड या संशोधिकेने एक सर्वेक्षण केले. तुम्हाला योग्य सल्ला देणारी व्यक्ती कोण या प्रश्नाला उत्तर देताना ज्या व्यक्तीचा फारसा संबंध आलेला नाही अशा व्यक्तीचे नाव देणाऱ्यांचे प्रमाण जास्त दिसले. प्रत्यक्ष सल्ला देणाऱ्याचे नाव टाळलेले वा शेवटी टाकलेले आढळून आले. मज्जासंस्था आणि मेंदू यांच्या अभ्यासातून या निरीक्षणाला पुरेसा पुरावा मिळाला. धूम्रपान, मद्यसेवन, गर्द वगैरे मादक द्रव्ये घेणे, बेशिस्त वागणे, कॉलेजचे तास बुडवणे, चकाट्या पिटणे– वगैरे गोष्टी घातक आहेत हे कळत असूनही टीनएजर्स तसेच वागून आक्रस्ताळेपणा करतात, आक्रमक व हिंसक होतात. प्रस्थापित नियम, कायदे, संकेत मोडण्यात पुरुषार्थ मानतात; समाजविघातक कृत्यात सामील होतात, अतिरेकी होतात...

अशा अनेक गोष्टींचा उल्लेख डॉ. सहस्रबुद्धे 'रिॲक्टन्स'च्या आशयाच्या संदर्भात करतात. केवळ शब्दाचा अर्थ सांगून ते थांबत नाहीत. अनेक लोककथांमध्ये तरुण कथानायकाला किंवा नायिकेला 'त्या महालातील अमुक नंबरचे दालन उघडू नकोस' असे म्हटलेले असते; नेमके तेच उघडण्याची उत्सुकता जास्त दिसते. रिॲक्टन्स शब्द नवा असला तरी ती प्रवृत्ती आदिम आहे हेही ध्यानात आणून देतात.

हायपर ॲक्युसिस म्हणजे कानाची संवेदनशीलता नेहमीच्या आवाजालाही खूप वाढणे. ही एक व्याधीच मानली जाते. या व्याधीमुळे साधे आवाजही कानठळ्या बसवणारे वाटतात. स्वत:चा आवाजही त्रासदायक वाटतो. ही व्याधी का

होते यावर अजून संशोधन चालू आहे. कानात उच्च कपंनसंस्थेला घंटानादासारखा आवाज सतत ऐकू येणे ही एक व्याधी वेगळी असून तिला टिनिटस असे नाव देण्यात आले आहे. बोलणे आणि ऐकणे शक्य नसल्याने ही व्याधी असणाऱ्या व्यक्तीला नोकरीही नीट करता येत नाही. सतत वॉकमन वा म्युझिक मोबाईल कानाला प्लग्ज लावून उच्चस्वराचे संगीत ऐकण्याची सध्याची क्रेझ या व्याधींची तीव्रता वाढवते. मेंदूतील ध्वनिकेंद्र आणि ध्वनिजाणिवा निर्माण करणाऱ्या भागात काहीतरी बिघाड झाल्याने अशा व्यक्तीच्या जीवनात आणि वर्तनात अनक मानसशास्त्रीय समस्या उद्‌भवतात.

रस्त्याच्या दुभाजकाच्या वा कडेच्या निर्देशासाठी फ्लुरोसंटचे वा प्रकाश पडला असता चमचमणारे आयताकृती तक्ते बसवतात. त्यामुळे वाहनचालकाला 'पिलकर इलनेस' होऊ शकतो. या चमचमण्याने गरगरणे, मळमळ, डोकेदुखी, वगैरे त्रास सुरू होतात. त्यामुळे त्या व्यक्तींना चक्कर येऊ शकते. फेफरे येऊ शकते. या व्याधीला फोटोसेन्सिटिव्ह एपिलेप्सी असे नाव देण्यात आले आहे.

डिजिटल कॅमेऱ्यात आणि मोबाईलमध्ये व्हिडिओ चिप्स वापरल्या जातात. क्लोज्ड सर्किट टीव्ही तर प्रत्येक कार्यालयात, मॉलमध्ये, चित्रपटगृहात, चौकाचौकात बसवण्यात येतात. अनेक गुन्ह्यांचा तपास लावण्यास त्यामुळे मदत होते. निरीक्षकांचेही निरीक्षण करता येते. या क्रियेला सॉसव्हीलन्स असे नाव देण्यात आले आहे. 'खालच्या दिशेने पाहणे' या अर्थाच्या फ्रेंच शब्दावरून हा शब्द टोरांटो विद्यापीठातील स्टीव्ह मान या संगणक अभियंत्याने वापरला. तो आता सर्वदूर प्रचलित झाला आहे. निरीक्षकांचे निरीक्षण या प्रकाराने भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची घोटाळ्यांची प्रकरणे चव्हाट्यावर आणून सत्ताधीशांची आसने डळमळीत करण्यात माध्यमे सध्या आघाडीवर आहेत. सॉसव्हीलन्स या शब्दाने या नव्या वास्तवाला एक व्यापक चौकट मिळाली आहे.

इंग्रजीत कॅपिटल अक्षरे आणि स्मॉल अक्षरे वापरण्याची पद्धत आहे. ई-मेल ॲड्रेसमध्ये सर्व अक्षरे स्मॉल लिहिली जावीत; दोन शब्दात अंतर न ठेवता सलग लिहावे असा आरंभी संकेत होता. पण आता दोन शब्द जोडून लिहिताना दोन्ही शब्दांची पहिली अक्षरे कॅपिटलच ठेवायची अशीही कधी कधी गरज वाटते. उदाहरणार्थ, MyFiles, YouTube असे दोन शब्द जोडून लिहिण्याच्या प्रकाराला स्वतंत्र शब्द आता वापरला जातो हे तुम्हाला माहीत आहे का? अपर केस आणि लोअर केस यांच्याच जोडीने आता कॅमलकेस हा शब्द प्रचारात आला आहे. कॅमलकेस हा प्रकार १९५० पासून सुरू झाला. सिनेमा स्कोप, व्हिस्टा व्हिजन वगैरे उदाहरणे देता येतील.

रॅफ्लेशिया हा शब्द उच्चारल्यावर तुमच्या मनात काय प्रतिमा उभी राहील?

एखाद्या देशाचे नाव? एखाद्या व्याधीचे नाव? नाही. हे एका फुलाचे नाव आहे.

रॅफ्लेशिया हे एक जगातले सर्वात मोठे फूल आहे. ते रक्तरंगात न्हायलेले परजीवी म्हणजे बांडगुळासारखे दुसऱ्या झाडावर वाढणारे फूल आहे. त्याला मेलेल्या प्राण्याचा वास येतो. हे फूल ज्या झाडावर वाढते त्या झाडाला पाने, मुळे, खोड– काहीही नसते. याला पाने नसल्याने प्रकाश संश्लेषण (फोटो सिंथेसिस) होत नाही. ते आरंभी किरकोळ धाग्यांच्या जाळ्यासारखे असते. पाच वर्षाचे झाले म्हणजे कोबीच्या गड्ड्यासारखा आकार त्याला प्राप्त होतो. त्याचा व्यास एक मीटर असतो. स्टॅमफोर्ड रॅफेल या संशोधकाला हे फूल सापडले; त्यामुळे त्याला रॅफ्लेशिया हे नाव देण्यात आले. मलेशियात हे फूल वाचवण्याची मोहीम राबवली जाते.

ब्राझीलमधील पर्जन्यवनातले एक फूल स्वत:च उष्णता निर्माण करते. त्या उष्णतेने त्याचा वास दूरवर पसरतो. त्याला मेलेल्या घोड्यासारखा वास येतो. त्यामुळे डेड हॉर्स ॲरम म्हणून ते ओळखले जाते. थर्मोजेनिक – उष्णता निर्माण करणारे फूल म्हणून मराठीत त्याला उष्णपुष्प असे म्हणता येईल. ही उष्णफुले उष्ण कटिबंधात येतात. परागीभवनासाठी ती उष्णता निर्माण करतात असे रॉजर सेमूर या ऑस्ट्रेलियन संशोधकाने प्रथम लक्षात आणून दिले.

आकाशातून कडकडणारी वीज कधी कधी खाली पडते; वाटेत येणाऱ्या प्रत्येक पदार्थात ती घुसते आणि पुढे जात राहते. वीज पुढे गेली की मागचा भाग लगेच थंड होतो. या प्रक्रियेतून जमिनीत एक काचेरी नळ्यांची नाजूक रचना तयार होते. या प्रकाराला फल्गुराईट असे म्हणतात. फल्गुर हा मूळ लॅटिन शब्द वीज कडाडणे हा त्याचा अर्थ. विजेचा लोळ जमिनीत घुसत असताना मागचे वितळलेले पदार्थ थिजत जातात. हे फल्गुराइट फार दुर्मीळ असतात. काही ठिकाणी तेथील दगडाच्या पृष्ठभागाचे काचसदृश पदार्थात रूपांतर होते. ही काच पारदर्शक असते.

...असे अनेक शब्द आणि त्यांचे स्वरूप या 'शब्दवेध' मध्ये आपल्याला बघायला मिळते. त्यामुळे आपली जिज्ञासा चाळवते. नवीन गोष्टी कळतात. नवीन संकल्पना स्पष्ट होतात. नवीन रंगरूपाचे ज्ञान होते. सामान्य ज्ञान वाढते. ही पृथ्वी, हे जग, हा निसर्ग, वनस्पती, प्राणीसृष्टी, मानवी स्वभाववृत्ती यांचा हा विलक्षण व्यामिश्र पट थक्क करतो.

**- शंकर सारडा**
ई-१० पाटील लिजन्सी, १५ एरंडवणे,
पुणे- ४११००४
मो. ९८२३२६१०२३

■■

१० वी आवृत्ती




# पर्व

मूळ लेखक :
**डॉ. एस.एल.भैरप्पा**
अनुवाद - **उमा कुलकर्णी**

**किंमत : ४००/-रु.**

**पोस्टेज : ३०/-रु.**

व्यासरचित महाभारतातील आभाळाएवढ्या उंचीची पात्रे; परंतु सगळ्यांचे पाय मातीचे. अवघी जीवनमूल्ये कसोटीला लावणारे समरप्रसंग. संघर्ष. प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व वेगळे.

प्रत्येकाच्या प्रेरणा वेगळ्या. प्रत्येकाचे प्राक्तनही वेगळे. त्याचबरोबर अनेक चमत्कार; दैवी शाप; दैवी वर. मानवी पातळीपेक्षा वेगळ्या पातळीवर जाणारे कथानक. कर्नाटकमधील अग्रगण्य कादंबरीकार तत्त्वचिंतक डॉ. एस.एल. भैरप्पा यांनी या चमत्कारांच्या,शापांच्या आणि वरदानांच्या भरभक्कम पडद्याआड लपलेल्या माणसांचा शोध घेतला.

आधुनिक मानववंशशास्त्रीय, समाजशास्त्रीय, संकल्पनांच्या प्रकाशझोतात महाभारतातल्या व्यक्तिरेखांच्या वर्तनाची संगती लावली. त्यामुळेच पर्व ही महाभारताची एक विलक्षण प्रत्ययकारी अनुभूती देणारी कलाकृती ठरली. तशीच खळबळजनकही.

त्या महाकादंबरीचा हा रसपूर्ण मराठी अनुवाद. सहजसुंदर.




# चिकन सूप फॉर दि सोल : इंडियन मदर्स

## भारतीय मातांचे विश्वात्मक वात्सल्य आणि मूल्यभान प्रकट करणाऱ्या प्रेरणादायक सत्यकथा




मूळ लेखक **जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन । रक्षा भारदिया**
अनुवाद **डॉ. वृषाली पटवर्धन**

पृष्ठे **२७२।** २७० रु. पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

मार्क व्हिक्टर आणि जॅक कॅनफिल्ड हे अमेरिकेतील लेखक -पत्रकार उत्तम कथाकथनकार म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या कथा ऐकून श्रोते भारावून जात. सामान्य व्यक्ती एखाद्या प्रसंगी काही असामान्य कर्तृत्व करून जातात, त्याच्या कहाण्या ते सांगत असत. कधी गमतीशीर प्रसंग असत. ते ऐकून चेहऱ्यावर स्मितरेखा पसरून जाई. काही कहाण्या प्रेरणा देत. आपणही काही छान करू शकतो याचे दाखले मिळत. या सगळ्या कथा-कहाण्यांची भाषा सोपी, गप्पा मारतो तेव्हा असते तशी आर्जवी, आणि हृदयस्पर्शी, श्रोत्यांना भावेलच अशी असे.

या कहाण्यांचे पुस्तक काढा असा लोकांचा आग्रह वाढत राहिला.

शेवटी त्यांनी शंभरेक कथा लिहून काढल्या आणि पुस्तक काढायचे ठरवले. नाव काय द्यायचे हा प्रश्न. चर्चा झाल्या, वाद झाले. मग त्यांनी ठरवलं, नाव निश्चित करण्यासाठी रोज एक तास ध्यान करून स्वत:शी विचार करायचा. नेमाने त्यांनी मेडिटेशन केलं. एकदा ध्यान करीत असताना जॅकच्या डोळ्यासमोर त्याची आजी आली. लहान नातवंडं आजारी पडली की ती त्यांना चिकन सूप करून प्यायला लावायची. आजार कोणताही असो. पण तो चकिन सूप घेतल्याने बरा व्हायचा. आपल्याकडच्या आज्या गवती चहा आणि तसेच इतर काढे देतात तसाच हा प्रकार. चिकन सूप मुळे शारीरिक आजार बरे होत होते. तर आपल्या कथांमुळे आंतरिक, आत्म्याचे म्हणजे 'सोल'चे आजार बरे होतील असे जॅकने मार्कला पटवले. मग त्यांनी आपल्या पुस्तकाला 'चिकन सूप फॉर द सोल' हे नाव द्यायचे ठरवले.

अठ्ठावीस जून १९९३ रोजी हे पुस्तक प्रकाशित झाले. सहा महिन्यात ते अमेरिकेतले सर्वाधिक लोकप्रिय पुस्तक बनले. वर्तमानपत्रात किंवा दूरचित्रवाणीवर काहीही प्रसिद्धी केली गेली नव्हती. पण सांगोवागी पुस्तकाचा प्रसार झाला. अनेक लोक दुकानात परत येऊन पाच-पाच, सहा-सहा प्रती घेऊन आपल्या मित्रांना, नातेवाईकांना भेट देऊ लागले.

वर्षभरातच हे पुस्तक अमेरिकेतील तडाखेबंद खपाच्या म्हणजे बेस्टसेलरच्या यादीत समाविष्ट झाले. वर्तमानपत्रांच्या आणि टी.व्हीवरच्या चर्चेत आले. याच मालिकेत आणखी नवीन पुस्तके आली, त्यांच्या आवृत्त्या निघाल्या. १९९५ मध्ये सर्वाधिक खपाचे पारितोषिक मिळाले. त्यानंतर पारितोषिकांची मालिकाच सुरू झाली. आयुष्याला चांगली दिशा आणि गती देणारी पुस्तकं आणि त्यापाठोपाठ 'चिकन सूप' या ब्रॅण्डची इतर उत्पादनं निघायला लागली. नंतरच्या दहा वर्षांत कंपनीची उलाढाल २०० कोटी डॉलर्स म्हणजे सुमारे दहा हजार कोटी रुपयांवर गेली. अमेरिका आणि कॅनडातील १७५ रेडिओ केंद्रांवर कार्यक्रम होऊ लागले.

आत्तापर्यंत या पुस्तकांच्या ११२ कोटी प्रती खपल्या आहेत. चाळीस भाषांमध्ये भाषांतरं झाली आहेत. भारतातही हिंदी, मराठी आणि इतर प्रमुख भाषांत

ही पुस्तकं आली आहेत.

मेहता प्रकाशनाने या मालिकेतील बत्तीस पुस्तकं आजवर प्रकाशित केली आहेत. उषा महाजन, प्रज्ञा ओक, सुनिती काणे, शामला घारपुरे, अवंती महाजन, शीला कारखानीस, सुषमा जोशी या सिद्धहस्त लेखिकांची भाषांतरे वाचकप्रिय झाली आहेत.

या मालिकेतील 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन मदर्स' हे सर्वांत ताजं पुस्तक आहे.

बहुसंख्य विवाहित स्त्रियांना आई असण्याचा अनुभव असतो. आपल्या उदरी अंकुर फुलतो आहे इथपासून अनुभवाचं गाठोडं बांधायला लागतं. नऊ महिने नऊ दिवस उरीपोटी सांभाळलेला अंकुर, प्रसववेदना देत देत या जगात प्रवेश करतो. घरातल्या प्रत्येकाला आनंद देत आपल्या नजरेसमोर आपलं अपत्य मोठं होतं. कुठलंही संकट न येता ते अपत्य स्वतंत्र व्यक्तिमत्त्वात उमलत राहील, ही आपली अपेक्षा असते. आपण ते गृहीत धरलेलं असतं. प्रत्यक्षात मात्र काय होतं? छोटी-मोठी आजारपणं येतात. अनपेक्षित संकटं येतात. शारीरिक, कौटुंबिक आणि आर्थिक एक ना अनेक गंडांतरं येतात. ती झेलावी लागतात आईलाच. प्रत्येक आईला आपल्या अशा अनुभवांविषयी बोलायला आवडतं. कहाण्या मोठ्या रंजक असतात. काही चटका लावून जातात. काही मनात घर करून जातात. अशा ९६ कहाण्या या २६० पानी पुस्तकात संकलित केल्या आहेत. या सर्व माता भारतीय आहेत. म्हणजे या कथा आपल्या जवळपासच कुठेतरी घडलेल्या आहेत.

त्या आपल्याच घरी आपल्या समोरच घडताहेत असं वाटावं अशा भाषाशैलीत वृषाली पटवर्धन यांनी लिहिल्या आहेत.

चिकन सूप मालिकेच्या पद्धतीनुसार यातील प्रत्येक कहाणी त्या त्या आईने किंवा तिच्या जवळच्या सुहृदाने लिहिली आहे. प्रथम पुरुषी एकवचनी केलेलं हे कथाकथन आहे. या मूळ इंग्रजी लेखनावर संपादकीय संस्कार श्रीमती रक्षा भारदिया यांनी केले आणि मग पुस्तकाची संहिता वेगवेगळ्या भाषांतून झाली.

या लिखाणाच्या धाटणीचं खास वैशिष्ट्य सांगायला हवं. प्रत्येक कहाणी दोन चार पानांपेक्षा मोठी नाही. भाषा इतकी सोपी की सातवी-आठवी पास झालेला वाचकही त्या कहाणीशी चटकन तन्मय होऊन जातो. आपल्या सवडीनुसार. पुस्तक घ्यायचं आणि कोणतेही पान उघडून वाचू लागायचं. वेळ नसला तर तिथेच थांबायचं. पुन्हा जमेल तेव्हा दुसरं पान उलगडायचं.

या कथा वाचताना डोळ्यांच्या कडा ओलावतील, नाहीतर ओठावर स्मित रेखा उमटेल. एखाद्या आईच्या विलक्षण धाडसाचं वाचून ''शाब्बास गे'' असा अस्फुट उद्‌गार बाहेर पडेल. संकटांच्या मालिकेला तोंड देऊन आपल्या अपत्याला

कसं वाढविलं हे वाचून कोणाला प्रेरणा मिळेल. या सगळ्या माता तुमच्या आमच्यासारख्या सामान्य आहेत हे पुन्हा अधोरेखित करावेसे वाटते. अमजद अली खान, पत्रकार सत्त्या सरण आणि अभिनेत्री रविना टंडन वगळता उरलेल्या ९३ कथानायिका या सामान्य घरातल्या आहेत. बोजड उपमा, अलंकार आणि काव्य याचा थोडा देखील वापर न करता त्या कथा सांगितलेल्या आहेत. त्यामुळे त्यातील प्रत्येक कहाणी मनाला चटकन भिडते.

वानगी म्हणून दोन कहाण्यांचा सारांश सांगते.

अनिता जेसवाल यांनी सांगितलेली 'जेथे जाते तेथे ती माझी सांगाती' ही कथा घ्या.

अनिता जेसवालचे पती जम्मू-काश्मीरमध्ये एका अतिरेक्याच्या ठाण्यावर सेवारत होते. १९९० सालची ही गोष्ट असावी. नवऱ्याच्या ठाण्याजवळ लष्करी वाहनावर हल्ला झाला, आणि त्यात आपले जवान वाचले नाहीत अशी बातमी आली. चार दिवस काहीच कळले नाही. कश्मीर खोऱ्यात भयंकर बर्फ पडला होता. टेलिफोन यंत्रणा कोलमडून पडली होती. अनिता आपल्या पाच वर्षांच्या मुलाला, आपल्या हृदयाशी घट्ट धरून विमनस्क पडली होती; प्रचंड मानसिक ताण होता. डोळ्यातील आसू कोरडे झाले होते. अनिताची आई देवाघरी जाऊन खूप वर्षे उलटली होती. पण ती आपल्या आसपासच आहे अशी तिची भावना सतत असायची. या दिवशी सुद्धा आपल्या खोलीत आपली आई आहे असा भास तिला झाला. तिनं हाताच्या ओंजळीत अनिताचा चेहरा घेतला, ''काळजी करू नको, मी तुझ्या यजमानांना बघितलंय. सफरचंदाच्या बागेत माझ्याकडे बघून ते हसले.'' अनिता एकदम स्तब्ध झाली. काय करावे तिला सुचेना. सकाळी एका जवानाने दरवाजा ठोठावला. ''साहेब सुखरूप आहेत. त्यांनी आपल्या सर्वांसाठी सफरचंदांच्या दोन पेट्या पाठवल्या आहेत.'' अनिताचा विश्वास बसणार नाही अशी घटना असली तरी अनिताच्या दृष्टीने मात्र ही तिच्या आईच्या मातृत्वाची चिरंतन पाखर होती.

दुसरी गोष्ट आहे 'स्त्री-शक्ती' शीर्षकाची.

दिव्या नायक हिंगे यांनी लिहिलेली.

रामया व स्मिता या कॉलेजमधल्या मैत्रिणी. रामया हुशार होती. तापट होती. अन्यायाच्या विरुद्ध उभी राहणारी होती. रुढी -परंपरा तिला मान्य नव्हत्या. कहाणीची सुरुवात होते ती स्मिताच्या फोनने. तेव्हा ती नवऱ्याशी भांडून घर सोडून सात वर्षांच्या मुलासह बाहेर पडली होती. डिसेंबरच्या थंडीत तिला सात वर्षांच्या मुलांसह आसरा शोधायचा होता. दिव्याने लिहिलेल्या एका लेखात उल्लेख असलेल्या एका सेवाभावी संस्थेचा आणि शाळेचा पत्ता तिला हवा होता. दिव्या

तिला दुसऱ्या दिवशी त्या संस्थेत घेऊन गेली. मुलाला शाळेत प्रवेश दिला आणि रामयालाही छोटी नोकरी तिथे मिळाली. रामयाने मुस्लीम युवकाशी प्रेम विवाह केला होता. नंतर मात्र सारखी भांडणं व्हायची. घरातून बाहेर पडायच्या आदल्या दिवशी रात्री त्याने मुलाला भयंकर मारझोड करून तिला ढकलून दिले, त्यामुळे तिने नवरा आणि घर सोडायचा निर्णय घेतला. माहेरी व सासरी कुणीच तिची बाजू घेतली नाही. आपलं वैयक्तिक दु:ख बाजूला ठेवून मुलाला चांगलं वाढवणं एवढंच तिचं ध्येय होतं. तिला कोणाची दया नको होती. आपण आयाच राष्ट्र घडवीत असतो ही तिची भावना. आपल्या मुलाला कणखरपणे घडवत उभं करावं हीच तिची ठाम धारणा होती.

कित्येक वर्षं उलटली. रामया आणि दिव्याचा संपर्क तुटला होता.

एकदा दिव्या बसने जात होती. बस खच्चून भरलेली होती. एका विशीतील मुलीनं आपल्या भावी पतीच्या मुस्कटात ठेवून दिली. तो तिच्याशी गैर वागत होता. तिची होणारी सासू जवळच सीटवर बसली होती. तिने त्या मुलीच्या मुस्कटात त्यापेक्षाही जोरात मारून तिला जाब विचारला, म्हणाली, ''अगं, या माणसाशी तुझं लग्न व्हायचं आहे! आणि तू त्याला थोबाडीत मारतेस!'' मुलगी उठली व म्हणाली, ''तुझ्यासारख्या असंस्कृत, असभ्य बाईच्या मुलाशी मी अजिबात लग्न करणार नाही.'' पण त्या तरुणीने त्या बाईची - माँजीची लगेच माफीही मागितली. बसमध्ये नि:स्तब्ध शांतता पसरली. हे अनपेक्षित नाट्य बघून काय करावे हे कुणालाच सुचत नव्हतं. एवढ्यात दिव्याने पाहिलं, भारदार आवाजाचा एक तरुण त्या माँजींना सांगत होता की, ''तुम्ही या मुलीची क्षमा मागितली पाहिजे. या मुलीच्या जागी तुमचीही मुलगी, बहीण, आई असू शकते. तुमच्या मुलाच्या चुकीवर पांघरूण घालू नका. अहो, आयाच राष्ट्राची उभारणी करीत असतात. तुमच्या मुलाला स्त्रियांचा आदर करायला शिकवा.''

स्टॉप आल्यावर त्या तरुणाने मुलीला रिक्षात बसवून दिले. रिक्षावाल्याच्या हातात भाड्याचे पैसे दिले. दिव्या आणि हा तरुण पुढच्या स्टॉपवर उतरून देवळात एकदमच पोहचले. अनोळखी असल्याने आपसात संभाषण नव्हतेच. त्या तरुणाने पुजाऱ्याला देणगीची पावती करायला सांगितलं तेव्हा दिव्याच्या लक्षात आलं की तो तरुण म्हणजे रामयाचा मुलगा होता. तिचं पहिलं वर्षश्राद्ध त्या दिवशी होतं.

अशा या कथा, काही संदेश देण्याचा किंवा तत्त्वज्ञान सांगण्याचा कोठेही अभिनिवेश नाही पण तरीही काही शिकवून जाणाऱ्या, न सांगता बोध देणाऱ्या.

- सौ. शलाका ठाकूर
३, इंद्रायणी, पत्रकार नगर, पुणे -१६
फोन - २५६५०२२५




**२ री आवृत्ती**

# मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा

मूळ लेखक-**डेल कार्नेगी**
अनुवाद - **शुभदा विद्वांस**

**किंमत : २००/-रु.**
**पोस्टेज : २५/-रु.**

तुम्हाला तुमच्या पसंतीचे काम हवे आहे का? ते तुम्हाला सहज मिळेल.

तुम्हाला जे काम मिळाले आहे ते तुम्ही आवश्य घ्या आणि त्यामध्ये अधिक सुधारणा करा.

तुम्ही कोणत्याही संकटात सापडला असाल तर त्याचा उपयोग संधी म्हणून करा.

डेल कार्नेजी ह्यांच्या अजरामर आणि काळाच्या कसोटीला उतरलेल्या उपदेशांमुळे आज अगणित लोकांनी यशाचे शिखर गाठले आहे. त्यांना व्यावसायिक यश तर मिळालेच पण त्यांचे व्यक्तिगत आयुष्यही समृद्ध झाले. त्यांच्या कालातीत अनेक उत्तम मार्गदर्शनपर पुस्तकांपैकी 'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा' हे पुस्तक तुम्हाला पुढील गोष्टी शिकवते.

लोकांना तुम्ही आवडावे म्हणून करायच्या सहा युक्त्या.

लोक तुमच्याशी सहमत व्हावेत म्हणून करायच्या बारा युक्त्या.

लोकांना राग न येऊ देता त्यांच्यात बदल घडवून आणण्याच्या सहा युक्त्या. आणि आणखीही खूप काही.

'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा' ह्या पुस्तकाचा जास्तीत जास्त लाभ घ्या.




# जीव जिथे गुंतलेला

## शस्त्रक्रियांमधील गुंतागुंतीचे विलक्षण अनुभव




मूळ लेखक : **डॉ. अतुल गवांदे** अनुवाद : **नीला चांदोरकर**

पृष्ठे **२९६**।३००रु. पोस्टेज ३०रु./ सभासदांना सवलतीत

# पहिल्यांदा शस्त्रक्रिया करताना

**सत्य घटनांबद्दल लिहिताना डॉ. अतुल गवांदे आपल्या मनाची अशी काही पकड घेतात की वाटते, वैद्यकशास्त्र विषयाची माहिती मिळवण्यासाठी ते त्याचीच चिरफाड करत आहेत.**

**खरं पाहता, सर्वसामान्यांच्या मनात या शास्त्राविषयी एक प्रकारची उदात्ततेची भावना असते. गवांदे मात्र आपल्यासमोर वास्तव ठेवतात, ते त्याच्या मूळ स्वरूपात. हे वास्तव अत्यंत गुंतागुंतीचे असते, गोंधळात टाकणारे असते आणि कमालीचे मानवी असते.**

**ज्या वेळी हे शास्त्र संदिग्ध स्वरूपाचे असते, उपलब्ध माहिती अगदी मर्यादित असते, जोखमीचे प्रमाण मोठे असते अन् तरीही निर्णय घेणे अपरिहार्य होऊन बसते, तेव्हा गवांदे आपल्यापुढे सगळी परिस्थिती उघडपणे मांडतात, कसलीही लपवा-छपवी करत नाहीत.**

एका रुग्णाला सेंट्रल लाइनची आवश्यकता होती. ''चल, तुला चांगली संधी मिळालीय.'' माझी बॉस – तिला मी 'एस' या नावानेच संबोधणार आहे – मला म्हणाली. ती शल्यविभागाची प्रमुख निवासी डॉक्टर होती आणि तिच्या हाताखालीच माझं प्रशिक्षण चालू होतं. हे काम मी यापूर्वी कधीच केलेलं नव्हतं. ''सगळी जय्यत तयारी कर आणि तू तयार झालास की, मला संदेश पाठव.'' शल्यविभागातलं माझं प्रशिक्षण सुरू होऊन तीन आठवडे पूर्ण होऊन आता चवथा आठवडा सुरू झाला होता. माझ्या गणवेशात म्हणजे एका पांढऱ्या रंगाच्या कोटाच्या खिशांमध्ये मी अनेक चिजा कोंबलेल्या असायच्या. रुग्णांविषयीची माहिती असलेले छापील कागद, सीपीआर (हृदय व श्वसनक्रिया बंद पडल्यावर करण्याचे तातडीचे उपचार) ही प्रक्रिया कशी करायची त्याची सविस्तर माहिती असलेली लॅमिनेट केलेली कार्डं, शस्त्रक्रियांविषयीची दोन छोटी पुस्तकं, स्टेथस्कोप, जखमांवर बांधायच्या पट्ट्यांच्या भेंडोळ्या, जेवणासाठीची कूपने, रुग्णांच्या तपासणीसाठी वापरावयाची एक छोटी बॅटरी, कात्र्या आणि काही चिल्लर नाणीदेखील! ही छान संधी मिळालीय, मी स्वत:शीच म्हटलं. खऱ्या अर्थाने ही प्रक्रिया करण्याची माझी पहिलीच वेळ होती. ज्याच्यावर मी ही शस्त्रक्रिया करणार होतो, तो रुग्ण पन्नाशीतला काहीसा धडधाकट, पण मितभाषी पुरुष होता. गेल्या आठवड्यात त्याच्या पोटावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती आणि त्याची प्रकृती हळूहळू सुधारत होती. पण अजून त्याची शौचक्रिया पूर्ववत झाली नसल्यामुळे

त्याला तोंडाने काही आहार देता येत नव्हता. त्यामुळे त्याला शिरेतूनच अन्नपुरवठा करणं गरजेचं असल्याने एक विशिष्ट प्रकारची नलिका त्याच्या शरीरात आम्ही घालणार होतो; ती सरळ त्याच्या छातीत जाणार होती. ही सर्व पद्धत मी त्याला सोप्या भाषेत  समजावून सांगितली.

मी त्याला म्हटलं, ''तुम्ही पलंगावर आडवे पडलेले असतानाच मी ही नलिका तुमच्या छातीत घालेन. त्यासाठी मला तुमच्या छातीवरची छोटीशी जागा औषधाच्या साहाय्याने बधिर करावी लागणार आहे. त्यानंतर ती नलिका हळूहळू आत सरकवली जाईल.''

काही गोष्टी अर्थातच मी त्याला सांगितल्या नाहीत. उदाहरणार्थ, ही नलिका साडेआठ इंच लांब असणार होती आणि ती त्याच्या हृदयाच्या मुख्य रक्तवाहिनीच्या आत जाणार होती. ही प्रक्रिया बरीच किचकट किंवा अवघड असते, हेदेखील मी त्याला सांगितलं नाहीच.

मी पुढे म्हणालो. ''या प्रक्रियेत काही छोटे धोके आहेत; म्हणजे असं की, थोडा रक्तस्राव होऊ शकतो किंवा तुमचं फुप्फुस काम करेनासं होतं, पण तशी काळजी करायचं कारण नाही. अनुभवी डॉक्टरच हे काम करणार आहेत. शंभरात एखाद्यालासुद्धा काही त्रास होत नाही.''

मी त्याला जे सांगितलं; ते अर्धसत्यच होतं, कारण अर्थातच माझे हात हे अनुभवी हात नव्हते. आत्तापर्यंत ज्या काही दुर्घटना घडलेल्या होत्या, त्या मला माहीत असल्यामुळे माझ्या मनावर त्यांचं दडपण होतंच. एका निवासी शल्यविशारदाने एका बाईवर शस्त्रक्रिया करताना चुकून तिची मुख्य रक्तवाहिनी कापली होती त्यामुळे जो प्रचंड रक्तस्राव झाला होता, त्याचं पर्यवसान तिच्या मृत्यूत झालं होतं. दुसऱ्या एका रुग्णावर एक निवासी डॉक्टर हीच प्रक्रिया करत होता, तेव्हा नलिकेच्या आत घातलेल्या तारेचं टोक त्याच्या हातून निसटलं आणि ती त्याच्या हृदयापर्यंत वाहत गेली. त्याची छाती उघडून ती तार काढावी लागली होती. आणखी एका रुग्णाबाबत तिसराच विचित्र प्रकार घडला होता. त्याचं हृदय बंद पडायची वेळ आली. रुग्णाची लेखी परवानगी घेत असताना, मी त्याला यातली एकही गोष्ट सांगितली नाही.

''ठीक आहे डॉक्टर, तुम्हाला योग्य वाटेल ते करा,'' तो म्हणाला.

यापूर्वी 'एस'ना मी दोन रुग्णांवर ही प्रक्रिया करताना पाहिलेलं होतं; एक तर त्यांनी अगदी परवाच्या दिवशीच केली होती आणि त्यातला प्रत्येक टप्पा मी बारकाईने पाहिला होता, मनात साठवला होता. त्यांनी आपली आयुधं कशी मांडून ठेवली होती, रुग्णाला कसं आडवं केलं होतं, वगैरे, वगैरे. आणखीही काही गोष्टी

मी बारकाईने निरखल्या होत्या. रुग्णाच्या पाठीच्या बाजूला दोन्ही खांद्यांच्या हाडांमध्ये त्यांनी एका टॉवेलची गुंडाळी ठेवली होती, त्यामुळे त्याच्या छातीचा वरचा भाग ताणला गेला होता. जंतुरोधक औषधाने तेथील त्वचा पुसून काढली आणि मग लिडोकेन नावाचं इंजेक्शन देऊन ती जागा बधिर केली. त्यानंतर अंगावर पूर्णपणे निर्जंतुक केलेला गाउन घालून त्यांनी रुग्णाच्या छातीवर मानेच्या हाडाजवळ एक चपटी तीन इंच लांबीची सुई आत खुपसली. ही सुई एका इंजेक्शनच्या सिरींजला जोडलेली होती. त्या रुग्णाने 'हूं का चूं'ही केलं नव्हतं. त्यांनी मला तेव्हा एक मुद्दा आवर्जून सांगितला होता. सुई रुग्णाच्या फुप्फुसात जाऊ नये म्हणून एक काळजी घ्यायची. ती म्हणजे, मानेच्या हाडाच्या बरोबर खाली सुई गेली पाहिजे. हृदयाच्या मुख्य रक्तवाहिनीची उपवाहिनी फुप्फुसाच्या वरच्या टोकाजवळ असते, ही शीर आपण शोधून काढायची असते. पुन्हा एकदा तीच सूचना त्यांनी केली होती. त्यांनी सुई सरळ आत घातली, ती जवळजवळ पूर्णपणे. त्यानंतर सिरींजचा दट्ट्या मागे ओढला. सुई पुरेशी आत गेलीय, असं त्यांच्या लक्षात आलं, कारण नळी आता काळपट रंगाच्या रक्ताने भरली होती. (नळीतल्या रक्ताचा रंग लालभडक असला, तर आपण रोहिणीत सुई घुसवली असा अर्थ होतो. ते चांगलं नाही.)

एकदा सुईचं टोक नीलेत गेलं की, मग तिच्या बाह्य आवरणातलं भोक मोठं करायचं, नळी जोडायची आणि योग्य दिशेने पुढे सरकवत राहायचं. ही नळी हृदयाच्या दिशेनेच आत गेली पाहिजे, वरती मेंदूकडे जाता कामा नये – तसं करत असताना कुठल्याही रक्तवाहिनीला, फुप्फुसाला किंवा दुसऱ्या कुठल्याही अवयवाला इजा होणार नाही याची दक्षता घ्यायची. हे साध्य करण्यासाठी आपण काय करायचं, तर एक मदतनीसाचं काम करणारी तार वापरायची. हे सांगत असतानाच त्यांनी इंजेक्शनची नळी बाहेर काढली, पण सुई आतच ठेवली. थोडं रक्त बाहेर आलं. मग एक-दोन फूट लांबीची तार घेतली. इलेक्ट्रिक गिटारला लावलेल्या तारा असतात, तशी ती तार मला वाटली. ती जवळजवळ संपूर्ण तार त्यांनी सुईच्या भोकातून आत म्हणजे नीलेत – मुख्य रक्तवाहिनीच्या दिशेने घुसवली. ''ही तार जोर लावून आत घुसवायची नाही आणि आपल्या हातातून सुटूही द्यायची नाही.'' एकाएकी हृदयाची स्थिती दाखवणाऱ्या पडद्यावर दोन जलद ठोके दिसले, त्याबरोबर त्यांनी तार एक इंचभर मागे ओढली. तारेचं टोक हृदयाला खेटल्यामुळे क्षणभर तंतुमय हालचाल दिसली होती. 'एस' अगदी शांतपणे म्हणाल्या, ''बरोबर जागी पोहोचलोय आपण असं वाटतंय मला.'' मग त्या रुग्णाला म्हणाल्या, ''फारच छान साथ दिलीस हं तू आम्हाला. आता एक-दोन

मिनिटांचं काम आहे की, मग झालंच.'' मग त्यांनी सुई तारेच्या वरच्या बाजूने बाहेर काढली आणि एक कडक प्लॅस्टिकची गोटी तिथे ठेवली. ह्या गोटीला नीलेच्या तोंडातून घुसवून त्यांनी नीलेचं तोंड मोठं केलं आणि मग ही गोटी त्यांनी काढून घेतली आणि त्या भोकातून त्यांनी स्पॅगेट्टीच्या जाडीची पोकळ पण लवचीक नलिका – सेंट्रल लाइन – तारेच्या वरच्या अंगाने पूर्णपणे आत सरकवली. आता त्यांना तार बाहेर काढता येणार होती. सगळ्यात शेवटी त्यांनी या प्लॅस्टिकच्या नलिकेला जंतुनाशकाने धुतल्यासारखं केलं आणि शेवटी छातीवर शिवून टाकलं. बस्स! काम झालं होतं!

ही प्रक्रिया कशी करायची, ते मी पाहिलं होतं. आता ते निरीक्षण मला प्रत्यक्षात उतरवायचं होतं.

मी सगळं साहित्य जमवायला सुरुवात केली – सेंट्रल लाइनचं पाकीट, हातमोजे, अंगावर घालायचा निर्जंतुक गाउन, डोक्यावर घालायची टोपी, मास्क (तोंडावर लावण्याचा मुखवटा), लिडोकेन, हे सगळं साहित्य गोळा करायलाच मला कितीतरी वेळ लागला. त्यानंतर मी माझ्या रुग्णाच्या खोलीबाहेर काही क्षण नुसताच उभा राहिलो, मनात सगळ्या पायऱ्या वा टप्पे यांची उजळणी करत. पण मला एकही पायरी धडपणे आठवेना. पण नुसता वेळ काढून चालणार नव्हतं. माझ्या हातात नंतर करायच्या कामांची एक लांबलचक यादी होती – मिसेस 'ए'ना घरी पाठवण्याविषयी कागदपत्रं बनवायची होती मिस्टर 'बी'च्या पोटाचा अल्ट्रासाउंड घ्यायचा होता; मिसेस 'सी'च्या त्वचेवरच्या पिना काढायच्या होत्या... हे सगळं काम कमी होतं; म्हणून काय दर पंधरा मिनिटांनी माझ्या पेजरवर संदेश येतच होते – मिस्टर 'एक्स'ना मळमळत होतं त्यामुळे मला बोलावणं आलं होतं, मिसेस 'वाय'चे कुटुंब आले होते आणि त्यांना मला भेटून काही शंकांचं निरसन करून हवं होतं, मिस्टर 'झेड'ना विरेचक द्यायचं होतं. हंऽ मी एक दीर्घ श्वास घेतला. 'काही काळजी करू नका तुम्ही, मी आहे ना' – असा सर्वज्ञ डॉक्टरच्या चेहऱ्यावर जो भाव असतो, तो मी माझ्या चेहऱ्यावर आणला आणि मी रुग्णाच्या छातीत 'सेंट्रल लाइन' घालायला सज्ज झालो.

त्यांच्या पलंगाशेजारच्या छोट्या टेबलावर मी सगळी आयुधं मांडून ठेवली. त्यांच्या अंगावरच्या गाउनच्या मानेपाशी असलेल्या नाड्या सोडून तो बाजूला केला आणि त्यांना गादीवर झोपवलं. आता त्यांची छाती उघडी होती आणि हात दोन्ही बाजूला ठेवलेले होते. पलंगावरचा दिवा लावून मी त्यांच्या पलंगाची पातळी माझ्या उंचीला योग्य अशी केली.

'एस'ना येण्यासाठी संदेश पाठवला. मग मी स्वतः सज्ज होऊ लागलो. अंगावर निर्जंतुक गाउन चढवला, हातमोजे चढवले आणि एका निर्जंतुक ट्रेवर सर्व

वस्तू – सेंट्रल लाइन, मार्गदर्शक तार आणि इतर वस्तू – मांडायला सुरुवात केली. ज्या पद्धतीने मिस्टर 'एस'नी हे काम केलं होतं, अगदी त्याच पद्धताने मी सगळे टप्पे पार पाडले. त्यानंतर मी इंजेक्शनच्या सिरींजमध्ये ५सीसी लिडोकेन भरले, दोन स्पंजच्या कांड्या बेटॅडाइन या निर्जंतुकीकरणाच्या द्रावणात बुडवल्या आणि टाके घालण्यासाठी जो धागा वापरतात त्याचे पाकीट उघडू लागलो. माझ्या दृष्टीने मी पूर्णपणे सज्ज झालो होतो.

मिसेस 'एस' खोलीत आल्या आणि त्यांनी मला प्रश्न केला, ''त्याच्या प्लेटलेट्सची संख्या किती आहे?''

माझ्या पोटात एकदम खड्डाच पडला. हे मी केलंच नव्हतं. ही गोष्ट जाणल्याशिवायच आम्ही प्रक्रियेला सुरुवात केली असती आणि त्याच्या प्लेटलेट्स फार कमी असत्या, तर बिचाऱ्याला जोराचा रक्तस्राव होण्याची शक्यता होती.

त्यांनी संगणकावर पाहिलं. ''ठीक आहे,'' त्या म्हणाल्या.

तरीही माझ्या मनात अपराधीपणाची भावना निर्माण झालीच. मी त्याच्या छातीवर द्रावण चोपडायला सुरुवात केली. ''त्याच्या पाठीखाली टॉवेलची गुंडाळी घातलीस का?'' त्यांनी मला विचारलं अन् मनातल्या मनात मी स्वत:च्या थोबाडीत मारून घेतली. हेदेखील मी विसरलो होतो. रुग्णाने माझ्याकडे रोखून पाहिलं. काही न बोलता 'एस'नी एक टॉवेल उचलला, त्याची गुंडाळी केली आणि स्वत:च तो रुग्णाच्या पाठीखाली सरकवला. द्रावण लावून झाल्यावर मी त्याच्या छातीचा उजवा भाग सोडून बाकी सगळा भाग कापडाने झाकला. कापडाच्या खाली त्याने आपलं शरीर किंचितसं आक्रसलंय, असं मला जाणवलं.

'एस'नी ट्रेमध्ये सगळ्या वस्तू आहेत ना ते तपासलं. मी पुन्हा एकदा सरसावून उभा राहिलो. आणखी काही राहिलं तर नाही ना, असा प्रश्न माझ्या मनात आलाच.

''सेंट्रल लाइन आत घातल्यानंतर तिच्यावर औषध ओतण्यासाठी लागते ती आणखी एक सिरींज कुठाय?'' 'देवा, माझी आणखी एक चूक!' मी मनाशीच म्हटलं. त्या स्वत:च बाहेर गेल्या आणि सिरींज घेऊन आल्या.

रुग्णाच्या छातीवर मी बोटांनी चाचपडायला सुरुवात केली. नक्की कोणत्या जागी सुई आत घालायची – इथे? हा प्रश्न मी त्यांना डोळ्यांनीच विचारला. माझ्या रुग्णाचा आत्मविश्वास मला डळमळीत व्हायला नको होता. त्यांनी मानेनेच 'हो' म्हटलं. मी त्या जागी लिडोकेन लावलं आणि तो भाग बधिर बनवला. ''आता तुम्हाला थोडं टोचल्यासारखं वाटेल आणि मग किंचित आग होईल.'' मी तीन इंच लांबीची सुई हातात घेतली आणि त्याच्या त्वचेत घुसवली. ते करताना मला फारसा आत्मविश्वास वाटत नसल्यामुळे मी सुई अगदी हळूहळू, एका वेळी काही

मिलीमीटर इतकीच आत घुसवत होतो. मनाला धास्ती वाटत होती की, आपण ती चुकीच्या ठिकाणी आत घालणार आणि मग गहजब होणार. बाप रे, केवढी मोठी सुई आहे ही, मी मनाशीच म्हणत होतो. आपण ती कुणाच्यातरी छातीत घुसवतोय हा विचारच मला भयानक वाटत होता. सुई सरळ उभीच खाली जाईल यावर मी माझं सगळं लक्ष एकवटलं, पण त्याऐवजी सुई त्याच्या मानेच्या हाडाला घासत असावी. 'आईऽऽ', तो ओरडला. ''सॉरी,'' मी पटकन म्हटलं. 'एस'नी हाताच्या हालचालीने सुई मानेजवळच्या हाडाखाली (कॉलरबोन) घालायला सांगितली. या वेळी सुई बरोबर खाली घुसली. मी नळीचा दट्ट्या मागे खेचला. नळीत काहीच नव्हतं. आणखी खोल घाल, 'एस'नी खूण केली. तरीपण नळी रिकामीच. मी सुई बाहेर काढली, तिच्या टोकावर असलेले तंतू बाजूला केले. त्यामुळेच सुई आत जात नसावी. आणखी एकदा सुई आत घातली.

''आऽऽ!''

अजूनही सुई पुरेशी खोल जात नव्हती. पुन्हा एकदा मी सुई हाडाच्या खाली घुसवली, पुन्हा एकदा दट्ट्या बाहेर खेचला, पण परिणाम शून्य! लठ्ठंभारतीच्या अंगावर मांसाचे थर आहेत नुसते, मी मनाशीच म्हटलं. 'एस'नी आपल्या हातांवर मोजे चढवले, गाऊनही घातला. 'मी करून बघू का' असं त्यांनी म्हणताच पडत्या फळाची आज्ञा घेतल्यासारखी मी त्यांच्या हातात सिरींज ठेवली आणि बाजूला झालो.

त्यांनी सुई आत घुसवली, सिरींजचा दट्ट्या मागे ओढला आणि काय नवल, काही अडचण न येता सुई थेट आत गेली.

''झालंच हं. फक्त दोन मिनिटं,'' त्या रुग्णाला म्हणाल्या.

आपण अगदीच कुचकामी आहोत, असं मला वाटलं.

त्यानंतरचे पुढचे टप्पे त्यांनी मला करू दिले. अडखळत का होईना, पण मी ते करत राहिलो. प्लॅस्टिकच्या आवरणातली मार्गदर्शक तार मी बाहेर काढली, तेव्हाच मला कळलं की, ती बरीच लांब आणि लेचीपेची अशी आहे. तिचं एक टोक मी रुग्णाच्या छातीत घातलं. तसं करत असताना तारेचं दुसरं टोक त्याच्या बिछान्याला – निर्जंतुक न केलेल्या चादरीला – जवळजवळ चिकटणारच होतं, पण थोडक्यात बचावलं. नीलेचं भोक विस्तारण्याची मधली एक पायरी मी विसरूनच गेलो, पण 'एस'नी मला त्याची आठवण करून दिली. मी भोक विस्तारणारी गोटी, नीलेच्या मुखावर ठेवली, पण पुरेसा जोर दिला नाही; तेव्हा हे कामही 'एस'नीच केलं. शेवटी एकदाची मी सेंट्रल लाइन आत घातली, तिच्यावर निर्जंतुकीकरण करणारं द्रावण ओतलं आणि टाकेही घातले.

आम्ही दोघं रुग्णाच्या खोलीतून बाहेर आलो, तेव्हा मला धीर देण्याच्या

उद्देशाने ‘एस’ म्हणाल्या, ‘‘पुढच्या खेपेस इतका बावचळणार नाहीस तू. आज तुला हे काम करायला त्रास पडला, तरी तू ते मनावर घेऊ नकोस. जमेल हळूहळू.’’ त्या म्हणाल्या, ‘‘शेवटी काय, एखादी गोष्ट चार वेळा केली की जमते. सरावाचाच प्रश्न असतो, दुसरं काही नाही.’’ त्यांच्या शब्दांनी मला थोडा धीर आला, पण मनाला तितकी खातरी वाटत नव्हती, हेही खरंच होतं. अजूनही ती सगळी प्रक्रिया म्हणजे एक गूढच वाटत होतं मला. खरं सांगायचं तर कुणाच्याही छातीत एक धारदार सुई इतकी खोल अन् तीदेखील न पाहता घुसवायची ही कल्पनाच माझ्या पचनी पडत नव्हती.

या प्रक्रियेनंतर जे क्ष-किरण फोटो काढले, ते पाहिले नव्हते तोपर्यंत माझ्या जिवात जीव नव्हता. फोटो ठीक दिसत होते – मी रुग्णाच्या फुप्फुसात सुई घुसवली नव्हती आणि सेंट्रल लाइनही जिथं असायला हवी होती त्याच जागी दिसली, तेव्हा मी सुटकेचा एक नि:श्वास टाकला.

इथे एक गोष्ट तुम्हाला सांगावीशी वाटतेय. माझ्यासारख्यांना शल्यविद्येचं जे आकर्षण वाटतं, ते सगळे लोक समजू नाही शकत. जेव्हा तुम्ही वैद्यकीय शाखेचे विद्यार्थी म्हणून अगदी पहिल्या वेळी शस्त्रक्रियादालनात जाता आणि एखादं फळ कापावं, तेवढ्या सहजतेने सुरीने कापाकापी करताना शल्यविशारदाला बघता, तेव्हा तुमच्या मनात दोन प्रकारच्या प्रतिक्रिया संभवतात – एक तर अंगावर भीतीने काटा उभा राहतो किंवा आपण तोंडाचा ‘आ’ करून त्याच्याकडे बघतच राहतो. माझी प्रतिक्रिया दुसऱ्या प्रकारची होती. मी तोंड वासून बघत राहिलो. त्वचेच्या आवरणाखाली मी जे पाहिलं – रक्त आणि त्या माणसाच्या शरीरातली आतडी वगैरे – त्याने मी रोमांचित झालो नाही. मला कौतुक वाटलं, ते त्या शल्यविशारदाचं. किती आत्मविश्वासाने त्याने सुरीचं पातं रुग्णाच्या शरीरात घुसवलं होतं!

शल्यविशारदांबाबत असं म्हटलं जातं, ‘‘ह्या मंडळींना कधीकधी संभ्रम पडत असावा, पण त्यांच्या मनात शंका कधीच उद्‌भवत नाही.’’ खरं सांगू? लोकांना काय म्हणायचं असेल ते म्हणोत, पण माझ्या दृष्टीने मात्र त्यांच्यातला हा अवगुण नसून ते त्यांचं बलस्थानच आहे. अगदी रोजच शल्यविशारदांना अनेक प्रकारच्या अनिश्चिततांना तोंड द्यावं लागतं. त्यांच्याकडे असणारी माहिती अपुरी असते; वैद्यकशास्त्र अजूनही पूर्णपणे नि:संदिग्ध नाही; आमचं ज्ञान आणि आमची पात्रताही कधीच पुरेशी नसते. अगदी साध्यातली साधी शस्त्रक्रिया घेतली, तरी रुग्ण त्यातून सहीसलामत बाहेर येईल, त्याची तब्येत सुधारेल हे आम्ही छातीठोकपणे सांगू शकत नाही. तो जिवंत राहील, याची शाश्वतीसुद्धा आम्हाला देता येत नाही. अगदी पहिल्या वेळी मी जेव्हा शस्त्रक्रियेच्या टेबलापाशी उभा राहिलो, तेव्हा माझ्या मनात

विचार आला होता, या शल्यविशारदाला हे कसं ठामपणे सांगता येईल की, तो करत असलेल्या शस्त्रक्रियेने रुग्णाचं भलं होईल? शस्त्रक्रियेतले सगळे टप्पे त्याने ठरवल्याप्रमाणे पार पडतील? रक्तस्राव आटोक्यात ठेवणं जमेल? नंतर जखमेत पू वगैरे होणार नाही किंवा इतर अवयवांना इजा होणार नाही? अर्थातच तो यांपैकी कुठल्याही गोष्टींबाबत छातीठोकपणे काही सांगू शकत नाही आणि तरीदेखील तो सुरी चालवतोच.

आणखी काही काळ गेला. मी विद्यार्थी असतानाच मग एकदा मला सुरी चालवायची संधी मिळाली. आडव्या झोपलेल्या रुग्णाच्या पोटावर त्या दिवशी शल्यविशारदाने मार्कर पेनने एक सहा इंच लांबीची तुटक-तुटक रेषा काढली आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे परिचारिकेला सांगितलं, ''त्याला सुरी दे.'' मी सुरी हातात घेतली, तेव्हा ती नुकतीच निर्जंतुक केली असल्यामुळे अजूनही किंचित गरमच लागत होती. माझ्या डाव्या हाताने – अंगठा आणि तर्जनीने – मी रुग्णाच्या पोटावरची त्वचा आधी ताणून धरावी, असं त्यांनी मला सुचवलं. ''आता मध्ये न थांबता एक सरळ छेद घे. थेट चरबीच्या थराच्या खालपर्यंत.'' त्यांनी मला सूचना दिली. सुरीच्या पात्याची धार असलेली बाजू मी रुग्णाच्या त्वचेवर ठेवली आणि छेद दिला. कापाकापीचा तो माझा पहिलाच अनुभव, पण माझ्या मनात एकाच वेळी संमिश्र भावनांचा कल्लोळ मी अनुभवला. काहीसा विचित्र; पण ज्याचं व्यसन लागावं असा. एक ठरवून केलेल्या हिंसक कृत्याचा थरार, हे काम बरोबर होईल की नाही; याबद्दलची मनात असलेली आशंका आणि एक काहीसा उदात्त विश्वास की, हे जे काही मी करतोय; ते त्याच्या भल्यासाठीच आहे. माझ्या मनाला एक प्रकारचं नकोसेपणही वाटलं, कारण मला वाटलं होतं; त्यापेक्षा जास्तच जोर मला लावावा लागला होता. (आपली त्वचा तशी बऱ्यापैकी जाड आणि काहीशी स्थितिस्थापक असते.) मी पहिल्यांदा छेद दिला, तेव्हा सुरी पुरेशी खोल गेली नाही; दोन वेळा सुरी चालवल्यानंतरच मी चरबीचा थर कापू शकलो. तो क्षण माझ्यासाठी निर्णायक ठरला. मला शल्यविशारदच व्हायचं होतं – एक खराखुरा शल्यविशारद जो आत्मविश्वासाने आपलं काम करणार होता.

अर्थात माझ्यासारखा निवासी डॉक्टर आपल्या प्रशिक्षणाला सुरुवात करतो, तेव्हा त्याला काडीचाही आत्मविश्वास नसतो – मनात फक्त एक तीव्र इच्छा असते की, आपल्याला रुग्णाच्या शरीरात सुरी घालता यावी किंवा सेंट्रल लाइनसाठी छातीत सुई खुपसता यावी. मी शल्यविभागातील निवासी डॉक्टर म्हणून काम सुरू केलं, तो दिवस मला चांगला आठवतोय. मला आपत्कालीन परिस्थिती सांभाळायची होती. मी तिथे गेलो. माझ्याकडे आलेली पहिलीच रुग्ण एक तरुण हडकुळी स्त्री होती. साधारणपणे सत्तावीस-अठ्ठावीस वयाची असेल! गडद रंगाचे

केस असलेली ही स्त्री लंगडत-लंगडत आत आली, तेव्हा तिने होणाऱ्या वेदनेमुळे दात आवळले होते. ते दृश्य फारच विचित्र होतं. तिच्या पायात एका खुर्चीचा दोन-अडीच फूट लांबीचा लाकडी पाय रुतल्यासारखा दिसत होता. मला त्याचा काही अर्थच लागेना, तेव्हा तिनेच स्पष्टीकरण दिलं. ‘‘मी किचनमधल्या खुर्चीवर बसायचा प्रयत्न करत होते, तेव्हा एकाएकी खुर्चीचा पाय तुटला. स्वत:ला पडण्यापासून वाचवण्यासाठी मी एकदम उडी मारली, तेव्हा माझ्याही नकळत माझा पाय खुर्चीच्या पायातून बाहेर आलेल्या तीन इंची स्क्रूवर जोरात आदळला अन् स्क्रू पायात घुसला.’’ माझी मोठी विचित्र स्थिती झाली, त्या वेळी कारण नुकताच मी वैद्यकीय परीक्षा उत्तीर्ण होऊन बाहेर पडलो होतो. हा प्रकार मी स्वप्नातही कल्पिला नव्हता, त्यामुळे त्यावर काय तोडगा काढायचा ते मला माहीत असण्याची शक्यता शून्य होती. पण तिच्या लेखी मी एक डॉक्टरच होतो; त्यामुळे असले शेकडो रुग्ण मी पाहिलेत, असा भाव मी चेहऱ्यावर आणला. अगदी निर्विकार चेहऱ्याने मी तिच्या पायाची तपासणी केली; तेव्हा माझ्या असं ध्यानात आलं की, स्क्रू तिच्या पायाच्या अंगठ्याच्या हाडात घुसला होता. मात्र, त्यातून रक्त येत नव्हतं आणि हाडही मोडलं नसावं.

‘‘अरेरे, खूप दुखत असेल ना!’’ मी मूर्खासारखा बरळलो.

खरं म्हणजे त्या क्षणी मी तिला धनुर्वात होऊ नये म्हणून एक इंजेक्शन द्यायला हवं होतं आणि नंतर स्क्रू खेचून बाहेर काढायला हवा होता. मी परिचारिकेला इंजेक्शन आणायला सांगितलं, पण स्क्रू खेचून काढण्याविषयी मात्र माझ्या मनात शंका निर्माण झाली. तिला जोरात रक्तस्राव सुरू झाला तर? स्क्रू खेचत असताना तिच्या पायाचं हाड माझ्यामुळे मोडलं तर? किंवा त्याहून भयंकर काही तरी घडलं तर? ‘‘आत्ता येतो,’’ असं म्हणून मी तिथून सटकलो आणि कामावर हजर असलेले वरिष्ठ शल्यविशारद, ‘डब्ल्यू’ना शोधायला निघालो. मोटार-अपघातात जखमी झालेल्या एका तरुणावर ते उपचार करत होते. भयंकर

"I am reader not because I don't have a life but I choose to have many lives."



होते, जमिनीवर सगळीकडे रक्ताचा सडा पडल्यासारखा झाला होता. एकच गोंधळ माजला होता. अशा परिस्थितीत मी त्यांना प्रश्न विचारणं योग्य ठरलं नसतं.

मी क्ष-किरण फोटो काढायला सांगितला. तिच्या पायाचं हाड-बीड मोडलेलं नाही, या माझ्या मताची खातरजमा करण्यासाठी त्यामुळे मला थोडा वेळ मिळाला असता. क्ष-किरण फोटो मिळायला तासभर लागला आणि त्यावरून हाड मोडलं नसल्याचं मला निश्चितपणे कळलं. ''पहिल्या बोटाच्या हाडात स्क्रू घुसलाय,'' क्ष-किरण तज्ज्ञाने आपलं मत सांगितलं. एखाद्या पढवलेल्या पोपटासारखं मी तिला म्हणालो, ''तुमच्या पायाच्या अंगठ्यात स्क्रू घुसलाय.'' ''मग आता काय करणार तुम्ही?'' तिने मला विचारलं, तेव्हा मी तो प्रश्न स्वत:लाच विचारला. परत एकदा अस्मादिक वरिष्ठांकडे धावले. ते अजूनही जखमी रुग्णावर उपचार करत होते. तरीही मी त्यांना या मुलीचा क्ष-किरण फोटो दाखवलाच. ते एकदम हसले अन् मला म्हणाले, ''मग आता काय करशील तू?'' ''स्क्रू खेचून काढू?'' मी घाबरतच विचारलं. ''हो,'' ते म्हणाले. त्यांच्या या शब्दाचा अर्थ होता, जा तर मग. ''तिला धनुर्वातासंबंधी इंजेक्शन दिलंयस ना,'' त्यांनी खातरी करून घेतली अन् मला जायला सांगितलं.

मी परत ती जिथे होती, त्या खोलीत गेलो अन् तिला म्हटलं, ''आता मी तो स्क्रू ओढून बाहेर काढणार आहे.'' हे म्हणत असताना मी तिच्याकडून 'तुम्ही?' हा शब्द ऐकण्याची मनाची तयारी केलीच होती; पण ती एवढंच म्हणाली, ''ठीक आहे, डॉक्टर.'' तर आता माझ्यापुढे दुसरा काही मार्गच नव्हता. मी तिला तपासणीच्या टेबलावर बसायला सांगितलं. तिचा पाय एका बाजूला अधांतरी तरंगत होता. अशा स्थितीत स्क्रू काढणं शक्य होणार नाही असं मला वाटलं, तेव्हा मी तिला झोपायला सांगितलं. तिचं पाऊल टेबलाच्या बाहेर होतं आणि त्याला खुर्चीचा पाय लटकत होता. प्रत्येक हालचालीनिशी वेदनेचं प्रमाण वाढत होतं. ज्या जागी स्क्रू अंगठ्यात घुसला होता, तिथे मी एक बधिरता आणणारं इंजेक्शन दिलं, त्यामुळे वेदना थोडी कमी झाली. मग मी माझ्या एका हाताने तिचा पाय धरला अन् दुसऱ्या हाताने खुर्चीचा पाय धरला. क्षण-दोन क्षण भीतीने मी पार गारठल्यासारखा झालो. आपल्याला हे काम जमणार आहे ना? दुसऱ्या कुणाला तरी सांगावं का? मला जमेलच असं समजणारा मी कोण?

शेवटी मी मनाचा निर्धार केला, आपणच हे काम करायचं. मी तोंडाने एक-दोन-तीन असं म्हटलं आणि खुर्चीचा पाय खेचला. सुरुवातीला जरा हळूच खेचला अन् मग होता नव्हता, तो सगळा जोर लावला. ती कण्हली. स्क्रू तसूभरही हलला नाही. मी तो किंचित पिळल्यासारखा केला अन् काय आश्चर्य! लगेच तो बाहेर आला. रक्ताचा एक थेंबही आला नाही. अशा जखमांवर निर्जंतुकीकरणाचं औषध

लावतात हे मी पुस्तकात शिकलो होतो, त्यानुसार मी तिच्या जखमेवर औषध लावलं. ती टेबलावरून खाली उतरली. तिचा पाय दुखत होता, पण ती चालू शकत होती हे तिच्या लक्षात आलं. ''नीट काळजी घ्या,'' मी तिला संभाव्य धोक्याची सूचना देत म्हटलं. ''जखमेत पू होण्याची शक्यता असते, तेव्हा त्याकडे लक्ष द्यायचं.'' तिच्या चेहऱ्यावर मला कमालीची कृतज्ञता दिसली. इसापनीतीतल्या सिंहाला उंदराबद्दल वाटली होती; त्याच प्रकारची!

इथे मला हाच निष्कर्ष काढायचाय – आमच्या क्षेत्रात आम्ही अनुभवातूनच कौशल्य आणि आत्मविश्वास कमवत असतो – तोदेखील हळूहळू आणि काही वेळा तर अगदी अपमानास्पदरीतीनं. खरं सांगायचं तर एक शल्यविशारद आणि एक टेनिसपटू किंवा एखादा वादक किंवा एखादा क्रिकेटपटू यांमध्ये फारसा फरक नसतो. आम्ही सगळे जण भरपूर सराव केल्यामुळेच आमच्या कामात प्रावीण्य मिळवतो. पण आमच्या बाबतीत वेगळेपणा हा की, एक फार मोठा फरक आहेच की – आम्ही सराव करतो, तो हाडामांसांच्या, जिवंत माणसांवर!


## सुधा मूर्ती यांचे साहित्य



| | | |
|---|---|---|
| वाइज अँड अदरवाइज | लीना सोहोनी | १५० |
| गोष्टी माणसांच्या | लीना सोहोनी | १४० |
| पुण्यभूमी भारत | लीना सोहोनी | १३० |
| थैलीभर गोष्टी | लीना सोहोनी | १५० |
| सुकेशिनी | लीना सोहोनी | १३० |
| बकुळा | लीना सोहोनी | १२० |
| आयुष्याचे धडे गिरवताना | लीना सोहोनी | १५० |
| आजीच्या पोतडीतल्या गोष्टी | लीना सोहोनी | १४० |
| महाश्वेता | उमा कुलकर्णी | १४० |
| डॉलर बहू | उमा कुलकर्णी | १४० |
| सामान्यांतले असामान्य | उमा कुलकर्णी | १५० |
| अस्तित्व | ए. आर. यार्दी | ९० |
| पितृऋण | मंदाकिनी कट्टी | ८० |

!

# अभिप्राय

## जीवनाविषयीच्या मूलभूत प्रश्नांचा खल




नाझी छळछावणीतून तावूनसुलाखून बाहेर पडलेले डॉ. व्हिक्टर फ्रँकल यांच्या तत्त्वांवर हे पुस्तक बेतले आहे. डॉ. ॲलेक्स पॅटाकोस यांनी लिहिलेले हे पुस्तक आजच्या काळातही व्यावसायिक आणि व्यक्तिगत जीवनात दिशादर्शक ठरते. आपल्याला जीवनाबद्दल, व्यवसायाबद्दल जे मूलभूत प्रश्न पडतात, त्या संदर्भात अर्थ शोधण्याचा प्रयत्न या पुस्तकात व्हिक्टर फ्रँकल यांच्या तत्त्वांच्या आधारे केला आहे. या आयुष्य आपोआप घडत नाही, अर्थाचे चक्रव्यूह, दृष्टिकोन निवडण्याच्या स्वातंत्र्याची अंमलबजावणी, अर्थमय जीवन जगण्याची इच्छा आणि तळमळ साकार करा, आयुष्याच्या क्षणाक्षणातील अर्थ ओळखा. स्वत:कडे अलिप्ततेने पाहा, स्वत:पलीकडे विचार करा, या फ्रँकल यांच्या तत्त्वाविषयी सविस्तर विवेचन केले आहे. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी वाचकांसाठी एक अर्थपूर्ण प्रश्न विचारण्यात आला आहे. त्याचे उत्तर प्रत्येकाने शोधणे अभिप्रेत आहे.

योगिता माणगांवकर
लोकसत्ता, ८ जुलै २०१३




# तडा

डॉ. एस. एल. भैरप्पा हे कन्नड साहित्यविश्वातीलएक अग्रगण्य नाव. त्यांच्या पुस्तकांचे हिदुस्थानातील बहुतेक भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत.

डॉ. उमा कुलकर्णी भैरप्पांच्या पुस्तकांचा मराठी अनुवाद करतात ती अतिशय लोकप्रिय होतात.

'तडा' ही कादबंरी आपल्या सांस्कृतिक, सामाजिक परंपरा झुगारून देऊन स्वातंत्र्य व मुक्ती यांचा विपरीत अर्थ घेऊन व्यक्तिस्वातंत्र्याच्या, स्त्रीमुक्तींची अफाट कल्पनांनी भारलेल्या व्यक्तीची कहाणी आहे. अशा व्यक्ती स्वत:चे व भोवतालच्या संबंधितांचे आयुष्य उद्‌ध्वस्त करतात त्याची ही विदारक कहाणी. एस. पी. जयकुमार एका स्वनिर्मित, स्वकष्टाने उभ्या केलेल्या कपंनीचा चेअरमन एक प्रतिष्ठित, सज्जन, सरळमार्गी व्यक्ती, सुस्वभावी, समंजस पत्नीच्या साथीने सारे सुरळीत चालू असताना अचानक प्रिय पत्नीच्या मृत्यूने जयकुमार खचतो. अशा मन:स्थितीत त्याची सेक्रेटरी त्याला मोहजालात फसवते. दुर्दैवाने मोहात पडलेल्या जयकुमारपुढे तिच्याशी विवाह करण्यावाचून दुसरा पर्याय उरत नाही. त्याच्या मतिमंद मुलाशीही मंगला (दुसरी पत्नी) वाईट वागत असते. मंगलाचाही एक प्रियकर आहे हे जयकुमारला समजते, पण ती घटस्फोटही देत नाही. स्त्रीस्वातंत्र्याचा अतिरेक 'आक्रस्ताळेपणा' बनेलपणा अंगी असलेली ही मंगला जयकुमारचे आयुष्यच उद्‌ध्वस्त करते. त्याचं करीअरही धोक्यात येतं.

स्त्रीमुक्तीचा सोयीस्कर अर्थ लावून आपलं व इतरांचं आयुष्य क्लेशकारक बनविणाऱ्या, कित्येकदा त्यांना देशाधडीला लावणाऱ्या स्वैराचारी स्त्रिया आहेत. त्यांचं अध:पतन अत्यंत हीन पातळीवरचं आहे. हिदुस्थानी समाजातील नातेसंबंध, त्यातील गुंतागुंत व्यामिश्र आहे. यात दोन पिढ्यांचं, दोन टोकांच्या विचारप्रवाहांचा, अतिरेकी व्यक्तिवादाचा परिपाक 'तडा'तून समोर येतो. तो भविष्यकाळातील समाजाचं, सामाजिक परिस्थितीचं चित्र उभं करतो.

रमेश उदारे

सामना, ७ जुलै २०१३




# नष्टनीड

'नष्टनीड' हा रवींद्रनाथ टागोरांच्या नष्टनीड, मालंच, दुईबोन या तीन दीर्घकथांचा संग्रह आहे. मूळच्या बंगाली पुस्तकाचा मराठी अनुवाद नीलिमा भावे यांनी केला आहे.

या कथासंग्रहातल्या तीनही कथांमध्ये विवाहबाह्य संबंध केंद्रस्थानी आहे.

नष्टनीडचा अर्थच मुळी उद्‌ध्वस्त घरटे असा आहे. नष्टनीड या कथेवर 'चारुलता' हा चित्रपट सत्यजित राय यांनी काढला. नष्टनीड ही कथा विवाहितेच्या संदर्भात आहे. तर मालंच (फुलबाग), आणि दुईबोन (दोन बहिणी) या कथा विवाहित पुरुषांच्या संदर्भात आहेत. हा विषय आता जरी वाचकांना नवीन वाटला नाही तरी शंभर वर्षापूर्वी लिहिल्या गेल्यामुळे टागोरांच्या कथांनी समाजामध्ये केवढी अस्वस्थता निर्माण केली असेल याची आपण कल्पना करू शकतो. कारण हा विषय नवीन नसला तरी अजूनही समाजमान्य नक्कीच नाही.

नायिका चारू ही साहित्याची आवड असलेली स्त्री. लग्न होऊन स्त्री-सुलभ स्वप्ने घेऊन पतिगृही आलेली. चारूचा पती भूपती हा एका वर्तमानपत्राचा मालक, संस्थापक, संपादक. साहजिकच त्याचे लक्ष नवथर शृंगाराची अपेक्षा असलेल्या पत्नीकडे कमी असते आणि यामुळेच चारू हळूहळू एकटी पडत जाते. तेव्हा आपला कंटाळा ती पतीकडे व्यक्त करते. तो तिच्यासाठी आपल्या नात्यातल्या एका जोडप्याला आणतो. पण मूळ वाचनाची, लिखाणाची आवड असलेली चारू मात्र निरनिराळी पुस्तकं आणून वाचनात रमते.

भूपतीचा आतेभाऊ अमल हा या घरात तिला शिकविण्यासाठी राहिलेला असतो. कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाला असलेला हा अमल हे काम तिच्यासाठी आनंदानं करू लागतो आणि पती सहवासाला पारखी असलेली चारू हळूहळू त्याच्यात गुंतत जाते. त्याच्यासाठी ती भरतकाम शिकते. त्याच्या लहानमोठ्या आवडी पुरविते. दोघे मिळून घरामागे एक बाग बनवतात. हे वर्णन वाचताना आपल्या बंगाली कुटुंबामधल्या अनेक चालीरीतींची, रिवाजांची माहिती होते. नात्यातल्या त्या जोडप्यातली स्त्री ही साधी गृहिणी असते. ती चारुलताला

समजावते, परंतु चारू अमलकडे आकर्षित होते. चारू आणि अमल यांच्यातील भावनिक बंध खूपच हळुवारपणे उलगडत नेले आहेत. चारू जे लिखाण करते, ते अमलकडून मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे. ते लिखाण अमल मासिकांमधून प्रसिद्ध करून आणतो. एकीकडे चारू आदर्श पत्नी बनण्याचाही प्रयत्न करत असते. भूपतीच्या हे लक्षात आल्यावर त्याची तगमग होते. ती वाचताना आपणही अस्वस्थ होतो. तो आपले वर्तमानपत्राचं काम थांबवून चारूकडे लक्ष द्यायचा प्रयत्न करतो. पण आता उशीर झालेला असतो. तेव्हाचं भूपतीचं स्वगत वाचण्यासारखं आहे. अमल गेल्यावर चारू दु:खीकष्टी आहे. पण तिला ते दाखवता येत नाही. ते भूपतीला ही जाणवतं. तो शेवटी म्हणतो,'' जे आश्रयस्थान उद्ध्वस्त झालंय, त्याच्या फुटक्या विटा आणि मोडकी लाकडे आता मला खांद्यावर घेऊन वाहावी लागतील.'' इथेच टागोरांनी ही कथा संपवली आहे. कथेचा शेवट त्यांनी अमलला परदेशी पाठवून केला आहे. पण चारू आणि भूपती यांच्या सहजीवनावर फारसं भाष्य केलेलं नाही.

'मालंच' या कथेत पुरुषांचे विवाहबाह्य संबंध दाखवले आहेत. 'मालंच'मधील नायिका नीरजा आजारी पडते. तिचे बागेचे काम करायला तिच्या पतीची दूरची बहीण सरला येते. ती लहानपणापासून आदित्यबरोबर राहिलेली आहे. तिचं आदित्यवर एकतर्फी प्रेमही आहे. या कथेतूनही आपल्याला बंगाली वातावरण अनुभवता येतं. आदित्यची आणि सरलाची जवळीक लक्षात आल्यावर अस्वस्थ झालेली नीरजा तिच्या प्रत्येक गोष्टीत चूक शोधत राहते आणि आपली नाराजी व्यक्त करत राहते. या नाराजीतूनच सरलाला आपली चूक कळते. परंतु मरणासन्न, नीरजाला एक व्यक्ती - रमेनदा- समजावते. रमेनदा आणि नीरजा यांच्यामधील दीर्घ संवाद वैवाहिक जीवनातली काही सूत्रे सांगतो. पण शेवटी मानवी मनातील हेवा किंवा असूया या भावना प्रबळ ठरतात. नीरजा मृत्यूपूर्वी सरलाला माफ करू शकत नाही. याही कथेच्या शेवटी टागोरांनी कोणतेही भाष्य केलेले नाही किंवा हे चूक हे बरोबर असा निष्कर्षही मांडलेला नाही.

दुईबोन ही दोन बहिणींची गोष्ट आहे. मोठी बहीण शर्मिला घरसंसाराची आवड असलेली गृहिणी आहे. शशांक हा तिचा पती. या कथेच्या सुरुवातीलाच टागोर स्त्रियांचे दोन प्रकार सांगतात. एक आई आणि दुसरी प्रिया. या दोनही



प्रत्येक पुस्तक हे लहानग्यासाठीच असते.
पण ते लहानांना
वाचता यायला हवे.

***-चार्लेस घीगना (फादर गोसे)***

प्रकारच्या स्त्रियांची तुलना केली तर आई ही वर्षाऋतु सारखी असते. ती पाणी देते. शुष्कता दूर करते. ताप निवारते. तर प्रिया म्हणजे वसंतऋतु असते. तिचे रहस्य खोल असतं. मोहिनी मधुर असते. ती मनाच्या रत्नजडित गाभ्यात पोहोचवते.

शर्मिला ही वर्षाऋतू सारखी आहे. नवऱ्याला सांभाळणं, त्याचं कोडकौतुक करणं ही तिची आवड आहे. सुरुवातीला ते शर्मिलेची व्यक्तिरेखा दाखवतात. त्यानंतर येतो नीरव, हा शर्मिलेच्या धाकट्या बहिणीचा नियोजित पती हा डॉक्टर आहे आणि शेवटी शर्मिलाचा नवरा शशांक, ही तीनही व्यक्तिरेखाटनं एका मागोमाग येतात. त्यांच्या आयुष्यातल्या घटना पुढे सरकत असतात. ऊर्मी ही तीनही व्यक्तिरेखाटनातून फिरत असते.

शर्मिलाच्या धाकट्या बहिणीला तिचा पती खरे तर पसंत नसतो. तरी वडिलांसाठी त्याला ती हो म्हणते. पुढील शिक्षणासाठी तो परदेशात जातो. इकडे बहिण आजारी पडते आणि ऊर्मीचा शर्मिलाच्या घरात आणि शशांकच्या आयुष्यात प्रवेश होतो. शर्मिलाच्या हे सारे लक्षात येऊनही ती साऱ्याचा स्वीकार करते. कथेची नायिका ही वर्षाऋतुप्रमाणे नवऱ्याच्या सुखासाठी सारं सहन करते आहे. ऊर्मीला शेवटी आपली चूक कळते आणि ती नीरवकडे परदेशात जायला निघते. या कथेत तिघांच्या आयुष्यातल्या भूमिका कसकशा बदलत जातात हे दाखवले आहे. या तीनंही कथांत एक चौथं पात्र येतं, ते चुकणाऱ्याला पात्राला योग्य मार्ग दाखवण्याचा प्रयत्न करतं. पण घडणारं अटळ असतं.

या कथा ७०-८० वर्षांपूर्वीच्या आहेत. तरीही त्यातले बाकीचे संदर्भ कुठेही कालबाह्य वाटत नाहीत. तीनही कथांमध्ये निसर्गाचे रम्य वर्णन वाचायला मिळतं. बंगाली समाजाच्या प्रथा, नात्यांमधे वापरली जाणारी संबोधने वाचताना वाचकाला वेगळी माहिती मिळते.

अनुवाद खूप मनोवेधक आहे. यात कुठेही कृत्रिमता जाणवत नाही. रवींद्रनाथांच्या कथा आजच्या पिढीतील मराठी वाचकांना आपल्याच वाटतील.

**– चंचल काळे, पुणे**

(चिंतन आदेश, १ जुलै २०१३)

आपण काही वेळा गृहीत धरतो,
आपल्याला सारे काही माहित आहे.
मात्र तसे नसते. आपण आपल्यालाच
काय पाहण्यासारखे आहे ते
पाहण्याची सूट द्यायला हवी आणि
आपण तशी कल्पना करायला हवी.

***-डेव्हिड अलमण्ड***






**२ री आवृत्ती**

# द क्लायंट

मूळ लेखक : **जॉन ग्रिशॅम**
अनुवाद - **माधव कर्वे**

**किंमत : ३५०/-रु.**
**पोस्टेज: ३०/-रु.**

मार्क स्वे... एक अकरा वर्षांचा, काहीसा उनाड पण हुषार पोरगा अचानक एका दुष्टचक्रात गुरफटला जातो. त्याच्या डोळ्यासमोर एक आत्महत्या घडते आणि संकटांची मालिका सुरु होते. ह्या आत्महत्येमागे बरीच रहस्यं दडलेली असतात.. 'एफबीआय' ह्या रहस्याचे धागेदोरे जुळवू पहात असल्यामुळे मार्क त्यांचं हुकुमाचं पान ठरतं.... मार्कनं ही रहस्यं उघड करावीत म्हणून 'एफबीआय'ची यंत्रणा हलत राहते...
दुसरीकडे ह्या आत्महत्येमुळे गुन्हेगारी वर्तुळही धोक्यात येतं.... गुन्हेगारांच्या काळ्या सावल्या मार्कचा पाठलाग करत राहतात. ह्या जीवघेण्या पाठलागात मार्कला भेटते एक वकील... रेगी लव्ह...
मार्क आणि रेगी आता न्याययंत्रणा हलवू लागतात आणि गुन्हेगारी जगताचा रहस्यभेद होऊ लागतो...
अमेरिकन समाजाचा छेद घेत राजकारण आणि गुन्हेगारी जगतामधल्या दुव्यांना हात घालणारी मार्क स्वेची ही लढत खिळवून ठेवते....
अंतर्मुख करते...

English Books

## Lisa Scottoline



She is the New York Times best selling and Edger Award-winning author of seventeen novels. She has 25 million copies of her books in print in the United States and she is published in twenty-five countries. She is also an adjunct professor of justice and fiction at the University of Pennsylvania Law School, where she has won an award for excellence in teaching. She lives in Philadelphia with too many pets, some of whom are cranky that they didn't make the cover of the book.

# Book Review




## Why My Third Husband Will Be a Dog

**Lisa Scottoline**

**Price Rs. 400/-**

Postage - Rs.30/-

If you can imagine an extremely chatty friend by your side, it is Lisa Scottoline. Her book '*Why my third husband will be a dog'* puts the book in perspective right away. You settle down to hear a friend ramble about her husband, her life, her world. And Lisa does not let you down. She plunges into the descriptions with much gusto.

It is a book which you can take everywhere with you, open any page and start reading. The chapters are small, hardly a couple of pages. The language is simple, friendly, chatty and clichéd at places.

The subjects are mundane to marginally interesting. But the narration keeps a racy pace.

The way she narrates her stories keeps you engrossed,

has you nodding in agreement or giggling gently. She whispers story after story of her life and doings, non-stop, while the chicken cooks, while you wait for your son to finish football or simply lounge in the balcony with a cup of coffee. It can be relaxing after a long day at work. You can simply put up your feet and let this friend do the entertaining while you sip your coffee. She does not insist that you think, feel or respond.

She talks about her mother, her gay brother, her daughter, her daughter's cats and dogs, and gets slightly obnoxious when she starts describing her underarms. Do we really want to know? But then like I said she is a friend whose life's mission is to describe her world in lucid detail. There can be some hidden gems if you have the patience to sit through.

She tries to make it profound by quoting Eleanor Roosevelt in the beginning. But as we turn the pages it is anything but. And yet, it is short, entertaining, does not confuse, does not compel, relaxes, let you ignore, agree or object mildly. It carries on regardless.

In short a comfortable friend who lets you be while she chatters on.

The story begins with Mr. Two-Bomb describing his callous, selfish attitude towards everything in life. A self-confessed despicable man, Mr. Two-Bomb lives in Hiroshima, away from his wife Mako and son Toshiaki who live at Nagasaki. Life is carefree for him with his job as a kite-maker and scores of lovers to keep him entertained. Till then, it has been four years since Japan's attack on Pearl Harbour and increasingly, the buzz of America planning a vicious revenge had begun strengthening its hold. After the euphoria of

the attack dies down, Japan starts preparing for the impending blowback by America. But nothing could have prepared it for the enormity of what the enemy had in store for them.

English Books

## Rei Kimura



Rei Kimura is a lawyer with a passion for writing about unique events and personalities. She has adopted an interesting style of creating stories around true events and the lives of real people in a number of her books, believing that is the best way of making hidden historical events and people come alive for 21st century readers.

Kimura considers her writing as part of the perennial quest for truth, challenge and fulfillment. Her books have been translated into various Asian and European languages and widely read all over the world. Apart from being a lawyer, Rei Kimura is also a qualified freelance journalist and is associated with the Australian News Syndicate.

# Book Review




## Japanese Magnolia

**Rei Kimura**

**Price Rs. 299/-**

Postage - Rs.30/-

Japanese Magnolia is an interesting book about the forbidden relationship between two young men further complicated by the vast difference in their social standing. One is the heir to a powerful samurai family and the other a peasant son of the farmer in his province.

Rei Kimura does a good job of creating both Edo period Japan, modern 21st Century Japan.

Mayumi, a historian sets out to decipher ancient manuscripts when tell the tale of the young lovers can be called the female protagonist of this book, although it is predominantly about the two men, young peasant Fusao and the samurai Lord Okimoto, and their forbidden love.

The book begins in Mayumi's point of view. Rei Kimura mentions certain specific Japanese terms, such as *izakaya* and then explains them immediately in brackets (small bar). This ruins the flow of the narration because it is almost as if she were writing a tourist brochure. A better idea would have been to provide a small index at the bottom of every page, explaining all the Japanese words used on that particular page.

The fact English is not Rei Kimura's first language also comes through in the long, winding sentences that are inadequately punctuated, or incorrectly punctuated. In some places there is too much information provided, too many descriptions of events, people, relationship that are not relevant to the story and add nothing to it. There are so many exclamation marks, both in speech and narration, that there is a danger of sounding childish and immature.

However these are issues that should have been taken care of by the editor. As an author, Rei Kimura creates a satisfactory suspense as she builds up both story lines in co-ordination with each other and finishes off with a nice surprise in the end. The characters are reasonably well rounded. Overall the book makes for an interesting read.

**- Reshma S. Kulkarni**

# श्रद्धांजली



**माधवी देसाई यांचे निधन**

'नाच गं घुमा' या आपल्या आत्मकथनाने मराठी साहित्यविश्वात वेगळी मुद्रा उमटविणाऱ्या ज्येष्ठ लेखिका माधवी देसाई (वय ८०) यांचे बेळगाव येथे वार्धक्याने १४ जुलै रोजी निधन झाले.

माधवी देसाई यांनी आपल्या लेखनाने मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. प्रतिष्ठेचा दमाणी पुरस्कार त्यांना मिळाला होता. बेळगाव परिसरात ग्रामीण साहित्य संमेलनाची मुहूर्तमेढमाधवीताईंनीच रोवली होती.

माधवी देसाई यांच्या निधनामुळे महाराष्ट्र कर्नाटक-गोवा अशा तीन राज्यांना जोडणारा साहित्य क्षेत्रातला महत्त्वाचा दुवा निखळला आहे.

चित्रतपस्वी भालजी पेंढारकर आणि लीलाताई पेंढारकर या प्रतिभासंपन्न दाम्पत्याच्या माधवी देसाई या कन्या. गोव्याच्या काटकरांबरोबरील संसाराचा सारीपाट अर्ध्यावर उधळल्यानंतर काही काळाने 'स्वामी'कार रणजित देसाई यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या होत्या. प्रतिभावंताच्या सावलीत वाढलेल्या माधवी देसाई यांना स्वत:ची ओळख मिळाली ती 'नाच गं घुमा' या आत्मचरित्रामुळे. आहे मनोहर तरी, बंध-अनुबंध, मला उद्ध्वस्त व्हायचंय अशी साहित्यिकांच्या पत्नींची खळबळजनक आत्मचरित्रे आली. त्या काळात 'नाच गं घुमा' हे वाचकप्रिय ठरले. माधवी देसाई आत्मचरित्र लिहून थांबल्या नाहीत. शुक्रचांदणी, सीमारेषा, विश्वरंग, किनारा, नियती, प्रार्थना, मंजिरी, हरवलेल्या वाटा वगैरे सुमारे पंचवीस पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. सीमाभागात आज अनेक साहित्य संमेलने होतात. त्याची सुरुवात सुमारे सत्तावीस वर्षांपूर्वी बेळगावच्या कडोली येथून प्रा. तुकाराम पाटील यांच्याबरोबर माधवी देसाई यांनी केली. 'गोमंतक सौदामिनी'मध्ये गोव्यातील कर्तृत्ववान महिलांचे कर्तृत्व स्पष्ट केले. 'नाच गं घुमा'मध्ये त्यांच्यातील वात्सल्य आणि बंडखोर वृत्तीचे दर्शन घडले. रणजित देसाई यांच्या पहिल्या पत्नी सुनंदा यांच्या जगण्याचा वेध घेण्याचा प्रयत्न

त्यांनी केला. त्यासंदर्भात त्या लिहितात, 'नात्यानं माझी सवत होती पण त्यापेक्षा ती एक 'स्त्री' होती, बावीस वर्षे ती जिवंत होती, अन् कुणी तिची दखलही घेतली नव्हती.' त्यांनी रणजित देसाईंची आणि सुनंदाची भेट घडवली. त्या लिहितात, 'मी कमळीचं, द्रुपदाचं दु:ख शोधत होते; पण माझ्याच घरात एक प्रचंड चित्तरकथा घडून गेली होती का? आणि त्या अहल्येच्या शिळेवर मी विराजमान झाले होते? सिंहासन समजून...???, नंतर माधवी देसाईही रणजित देसाई यांच्यापासून विभक्त झाल्या. त्यानंतरचे एक पुस्तक रणजित देसाई यांनी त्यांना अर्पण केले असून अर्पणपत्रिकेत म्हटले आहे, 'नातं सरलं तरी जिव्हाळा सरला नाही, त्या माधवी देसाई यांना...' ही अर्पणपत्रिकाच माधवी देसाई यांचे माणूस म्हणून मोठेपण अधोरेखित करते.

### डॉ. शर्मिला रेगे यांचे निधन



पुणे विद्यापीठाच्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालिका आणि ज्येष्ठ स्त्रीवादी लेखिका डॉ. शर्मिला रेगे यांचे दि. १२ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ४८ वर्षांच्या होत्या.

पुणे विद्यापीठातून एमए केल्यानंतर त्यांनी विद्यापीठामध्ये 'फ्रॉम ए मेलस्ट्रीम सोशिओलॉजी टू ए जेंडर सेन्सिटिव्ह सांशिओलॉजी' या विषयावर संशोधन करत पीएचडी मिळविली होती. पुण्यातील एसपी कॉलेज, सेंट मीराज कॉलेज, विद्यापीठाचा सोशिओलॉजी विभाग, तसेच आयआयटी मुंबईमध्येही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. महाराष्ट्रातील दलित महिलांच्या जीवनचरित्रावर आधारित 'रायटिंग कास्ट, रायटिंग जेंडर-रीडिंग दलित विमेन्स टेस्टोमोनिज', 'सोशिओलॉजी ऑफ जेंडर : दि चॅलेंज ऑफ फेमिनिस्ट सोशिओलॉजिकल नॉलेज' या पुस्तकांचे लेखन त्यांनी केले होते. पुणे विद्यापीठाचे स्त्री अभ्यास केंद्र आणि इतर संस्थांमधील आपल्या सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी महिलांच्या प्रश्नांवर केलेल्या कामाची दखल घेत, त्यांना चेन्नईच्या 'माल्कम अँड एलिझाबेथ अदिशेशैय ट्रस्ट' तर्फे 'माल्कम अदिशेशैय' पुरस्काराने २००६मध्ये गौरविण्यात आले होते.

**C ज्येष्ठ समाजसेविका डॉ. शैला लोहिया यांचे निधन**



निराधार, परित्यक्ता व महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी मनस्विनी महिला प्रकल्प सुरू करून आधार बनलेल्या, तसेच विपुल लेखनाने साहित्यक्षेत्रात लौकिक मिळवलेल्या समाजव्रत्ती डॉ. शैला लोहिया यांचे वृद्धापकाळाने २४ जुलै रोजी निधन झाले. त्या ७३ वर्षाच्या होत्या. 'मानवलोक' चे संस्थापक डॉ. द्वारकादास लोहिया यांच्या त्या पत्नी होत.

सामाजिक चळवळीतील डॉ. द्वारकादास लोहिया यांच्याशी सन १९६२ मध्ये विवाह करून डॉ. शैला लोहिया अंबाजोगाईत स्थायिक झाल्या. राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते ॲड. शंकरराव व शकुंतला परांजपे यांची कन्या असल्याने लहानपणापासूनच सेवा दलाशी त्यांचा संबंध आला. डॉ.लोहिया यांच्याशी विवाह झाल्यानंतर एकाने अर्थार्जन व एकाने पूर्ण वेळ सामाजिक काम करण्याचे ठरवून लोहिया दाम्पत्याने मराठवाडा नवनिर्माण लोकायत (मानवलोक) संस्थेची सुरुवात केली.

डॉ. शैला लोहिया या स्वामी रामानंद तीर्थ कला व वाणिज्य महाविद्यालयात अधिव्याख्यात्या म्हणून कार्यरत होत्या. निराधार, परित्यक्ता व महिलांसाठी 'मानवलोक' ची शाखा म्हणून मनस्विनी महिला प्रकल्प सुरू करून डॉ. लोहिया यांनी हजारो निराधार महिलांना आधार देण्याचे काम केले. विपुल लेखनही केले.

'लोकसत्ता' च्या मराठवाडा वृत्तान्तमध्ये त्यांनी स्तंभलेखन केले. भूमी व स्त्री या विषयात पीएच.डी तसेच भोंडाला, भोंलाबाईची गाणी या विषयात एम.फील केले. स्वरांत, तिच्या डायरीतील पाणी, कथालिका, वाहत्या वाऱ्यासंगे, मनतरंग, रुणझुणत्या पाखरा, गजाआडच्या कविता, सात रंग सात सूर बालकादंबरी असे लेखन केले.त्यांच्या साहित्याला व सामाजिक कार्याला विविध संस्था व सरकारचे २२ पुरस्कार प्राप्त झाले. आंतरराष्ट्रीय परिषदांमधून विविध विषयांवर पेपर सादर केले. या काळात अनेक देशात भ्रमंती केली. समाजातील उपेक्षित व दुर्लक्षित घटकांबद्दलचा त्यांचा अभ्यास दूरदृष्टीचा ठरला. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात या दाम्पत्याची वेगळी ओळख आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे.

C **संगीत 'श्रवणीय' बनवणारे अमर बोस यांचे निधन**

भारतीय-अमेरिकी उद्योजक व ध्वनिशास्त्रामध्ये वेगळे प्रयोग करणारे,



आवाजाच्या दुनियेतील दूरदृष्टीचे व्यक्तिमत्त्व म्हणून नावलौकिक मिळवणारे अमर जी. बोस (वय ८३) यांचे वेलँड (बॉस्टन) येथे निधन झाले. बोस यांच्या नावाने प्रसिद्ध असलेली श्रवण उपकरणे व प्रेक्षागृह, मोटारी व घरातील वापराची ध्वनी उपकरणे यांच्या मदतीने संगीत ऐकण्याचा अनुभव अतिशय तरल व आनंददायी केला.

मॅसॅच्युसेटस इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) या संस्थेत बोस हे चाळीस वर्षांहून अधिक काळ अध्यापन करीत होते.

C **अभिनेता सतीश तारे यांचे निधन**

आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अभिनयाने मराठी रंगभूमीसह टीव्ही आणि चित्रपट क्षेत्रात आपला ठसा उमटवणारे विनोदी अभिनेते सतीश तारे (वय ५३) यांचे



अंधेरीतील सुजय हॉस्पिटलमध्ये निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि एक मुलगी आहे.

काही दिवसांपूर्वी पायाला गँगरिन झाल्याने तारे यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.

पुण्यात बालरंगभूमी रुजविण्यात मोलाचा वाटा उचलणाऱ्या प्रो. जयंत तारे यांचे संपूर्ण कुटुंबच नाटकाने झपाटलेले होते. त्यांच्या 'फुलराणी' या नाट्यसंस्थेच्या नाटकांत स्वत: जयंत तारे आणि सतीश, सुनील, आसावरी ही त्यांची मुले काम करीत असत. सतीशने त्यानंतर पुण्यात स्पर्धात्मक आणि व्यावसायिक रंगभूमीही गाजवली. भाषेची उत्तम जाण, शब्दांशी खेळण्याची वादातीत क्षमता, चकित करणारा हजरजबाबीपणा आणि शरीराचा लवचिक वापर यामुळे त्याने साकारलेली प्रत्येक भूमिका वैशिष्ट्यपूर्ण ठरली. तो नाटके लिहायचा, दिग्दर्शित करायचा, भूमिका करायचा, वाद्ये वाजवायचा, उत्तम वाचायचा. परंतु स्वत: मधील अफाट क्षमतांचे योग्य व्यवस्थापन न झाल्याने तो भरकटत गेला. त्याची अनियमितता, बेशिस्त आणि व्यसनाधीनता यामुळे त्याच्यावर बहिष्कार टाकण्याचे कठोर पाऊल निर्मात्यांनी उचलले. यामुळे

त्यांची मन:स्थिती ढासळली होती. तरीही हाडाच्या विनोदी नटाप्रमाणे तो आपला मुखवटा सतत हसरा ठेवण्याचा आणि नाटकात गुंतून राहण्याचा प्रयत्न करत राहिला. एक स्वयंप्रकाशी तारा मनोरंजनाच्या क्षितिजावर लुकलुकला आणि अंती निखळून पडला.

**c ज्येष्ठ इतिहासकार ए. के. नारायण यांचे निधन**

ज्येष्ठ इतिहासकार आणि पुरातत्त्ववेत्ते अवध किशोर नारायण (९०) यांचे ७ जुलै रोजी येथे निधन झाले.

नारायण यांनी प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्त्व या विषयावर बनारस विश्वविद्यालयातून १९४७ मध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. याखेरीज लंडन विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ ओरिएंटल अॅण्ड आफ्रिकन स्टडीज' शाखेतून त्यांनी पीएच.डी घेतली होती. नारायण यांनी दक्षिण आणि मध्य आशियावर लिहिलेली पुस्तके इतिहासाच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरली 'द इण्डो ग्रीक' हा त्यांचा ग्रंथ विशेष गाजला.

नारायण यांनी इतिहास, राजकारण, कला, प्राच्यविद्या, आदी विषयांवर विपुल लेखन केले असून ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झाले आहे. भारत आणि भारताबाहेरही अनेक विद्यापीठांमध्ये नारायण यांनी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या.

नारायण यांच्या पश्चात पत्नी, दोन पुत्र, तीन कन्या असा परिवार आहे.

**c कम्प्युटर माउसचा जन्मदाता कालवश**

कम्प्युटर क्षेत्रातील द्रष्टे आणि माउस या लोकप्रिय उपकरणाचे जनक डग्लस सी. एंजलबर्ट (वय ८८) यांचे दीर्घ आजाराने ७ जुलै रोजी निधन झाले.

एंजलबर्ट यांनी दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात अमेरिकेच्या नौदलात रडारवर तंत्रज्ञ म्हणून काम पाहिले. त्यानंतर ते 'स्टॅनफर्ड रिसर्च इन्स्टिट्यूट' (एसआरआय) येथे रुजू झाले. तेथे त्यांना कम्प्युटर माउसची कल्पना सुचली आणि हे उपकरण त्यांनी प्रत्यक्षात आणले. १९५९ ते १९७७ या १८ वर्षांच्या कालावधीत त्यांनी एसआरआयच्या ऑगमेंटेशन रिसर्च सेंटरचे नेतृत्व केले. याच काळात त्यांनी अर्पानेटचा शोध लावला. ते इंटरनेटचे प्राथमिक रूप ठरले.

■■■



म्हातारपणी तुम्ही लहान मुलांच्या गोष्टी वाचाल, फावल्या वेळात चटपटीत पदार्थांचा स्वाद घेत आरामात वेळ घालवाल... मात्र हे केवळ आपले कल्पनाविश्व आहे. ते आपल्याला काय हवे तेच दाखवते. - ***स्टीव्हन डी. रॉबर्टस्***




**९ वी आवृत्ती**

**विस्तारित आवृत्ती**

# आय डेअर

मूळ लेखक : **किरण बेदी**

अनुवाद - **सुप्रिया वकील**

**किंमत : ३००/-रु.**

**पोस्टेज :३०/-रु.**

या सुधारित आणि विस्तारित आवृत्तीत, नोकरशहा आणि अधिकारी यांनीच पोलीस-यंत्रणेमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या मार्गात अडथळे कसे निर्माण केले, याचे तपशीलवार कथन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे याबाबतचा निकाल सुप्रीम कोर्टाने दिला होता. परंतु तसे न करता त्या व्यक्तींनी बेदी यांची पोलीस कमिशनरपदी नियुक्ती होऊ नये, यासाठी अडथळे निर्माण केले.

या अडथळ्यांवर मात करत, ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर बेदी यांनी, सत्तेचा गैरवापर करणाऱ्यांसोबत काम न करण्याचे ठरवले. अशा लोकांसमोर मान तुकवायची नाही, असा त्यांनी निर्धार केला.

पण खरेच या व्यक्तींनी विकासाच्या मार्गात अडथळे-अडचणी निर्माण करून, मनोधैर्य खच्ची करण्याचा प्रयत्न करून काय मिळवले? असे अनेक प्रश्न मागे उरतातच.

किरण बेदी म्हणतात, 'माझा आत्मसन्मान, न्यायबुद्धी आणि माझा विश्वास व मूल्ये यांनी माझ्या आत्मविकासामध्ये अडथळे निर्माण करणाऱ्यांवर मात करण्याची प्रेरणा मला दिली. म्हणूनच मी कोणाच्याही बंधनात न राहण्याचा निर्णय घेतला.'

प्रेरक, अंतर्दृष्टी देणारे आणि जागरूक करणारे कथन!

आगामी




# हुबेहुब

**द.मा. मिरासदार**

'हुबेहूब' नक्कल करणाऱ्या बबनचे वास्तविक आयुष्यही
नकलेसारखेच झाले...
पोटाची खळगी भरण्यासाठी स्वार्थी माणसाने देवालाही
'घाम' फोडायला लावला...
स्वत:च्या जीवापेक्षाही मुक्या जनावरांवर जीवापाड
प्रेम करणारा तात्या म्हातारा...
'तगई'साठी पैसे खाणाऱ्या प्रत्येक माणसाला जन्मभराची
अद्दल घडविणारा अण्णा भागवत...
'जेवणवेळ' झाली की, लिंबाखाली बसणाऱ्या आबामुळे
कितीतरी चांगल्या गोष्टी घडल्या आणि वाईट गोष्टी टळल्याही...
केस कोणती अन् कशीही असू दे; दिगुअण्णा 'साक्षीदार' असले की,
निकाल लागलाच म्हणून समजा...

मानवी स्वभावाच्या अशा नाना कळा... अनुभवा द.मांच्या खुमासदार
शैलीत!

# फ्लॉरेन्स नाइटिंगेल



दोनशे वर्षांपूर्वी आजच्यासारखी अजस्त्र इस्पितळे नव्हती, अन् जी इस्पितळे होती तीही म्हणे रोग बरा करण्याऐवजी रोगांचा प्रसार करायचेच काम करीत! डॉक्टरही मोजकेच. हाताला गुण असणारे डॉक्टर अशा भिकार दवाखान्यांतून कशाला काम करतील? ते आपले श्रीमंत रोग्यांच्याच वाट्याला येत. आणि परिचारिका म्हणजे नर्सेसही फारशा शिकलेल्या नसत. दुसरे कुठलेही उपजीविकेचे साधन उरले नाही म्हणजे मग नर्स व्हायचे, असा त्या वेळी शिरस्ता होता. त्यांच्यात स्वच्छता चुकूनच आढळायची- आणि त्यांना मानही मिळायचा नाही फारसा- पण गावांत काही हुशार बायका असायच्या. कुठलेही बाळंतपण

असले की त्यांना बोलावणे यायचे. शिवाय जादूटोणा करणारे, मंत्रतंत्र करणारे ऋषि-देवऋषी यांची त्या वेळी फार चलती असायची.

त्या काळच्या त्या इस्पितळांत स्वच्छता व रोग्यांना दिलासा देणारे वातावरण निर्माण करून, नर्सेसना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे काम कुणी केले, ठाऊक आहे?




या साऱ्यांचे श्रेय फ्लॉरेन्स नाइटिंगेलला द्यावे लागेल.

इटलीतल्या फ्लॉरेन्स शहरात १५ मे १८२० रोजी तिचा जन्म झाला. ज्या शहरात तिचा जन्म झाला, त्याच शहराचे नाव तिला ठेवण्यात आले. आपल्याकडेही गया, काशी, द्वारका अशी गावांवरून दिलेली नावे असतातच.

नाइटिंगेलचे वडील अत्यंत श्रीमंत होते. त्यांना प्रवासाचा छंद होता. त्यामुळे फ्लॉरेन्सला लहानपणीच सारा युरोप पहायला मिळाला. आपल्या घरा-शेजारी राहणाऱ्या सरदार घराण्यांतील एका मुलाशी-सिडने हरबर्टशी तिची चांगलीच मैत्री जमली होती. त्याला ती नेहमी आपल्या जीवाचे हृद्गत बोलून दाखवायची, ''मोठं झाल्यावर मला नर्स व्हायचंय. लोकांची सेवा करायचीय्.''

हरबर्ट म्हणायचा, ''मीही तुला मदत करीन.''

लहानग्या फ्लॉरेन्सचा आवडता खेळ म्हणजे नर्स बनून आपल्या बाहुल्यांची – त्या नेहमी आजारी पडतात असे छोट्या नाइटिंगेलला वाटे– शुश्रूषा करणे हा. तिच्या मोठ्या बहिणी म्हणत, ''हे ग काय तुझं! सारखं त्या बाहुल्या अन् त्यांची शुश्रूषा. कंटाळा कसा येत नाही कुणाला ठाऊक! चांगले लपाछपी, सागरगोटे वगैरे खेळ खेळावे– तर तू आपली सदान्कदा या बाहुल्यांत गुंग. चल. ये आमच्याबरोबर खेळायला.''

पण तरीही फ्लॉरेन्स आपल्या बाहुल्यातंच रममाण असे. त्यामुळे त्या बहिणी खूप चिडत. कधी कधी रागाने तिच्या बाहुल्याच मोडूनतोडून टाकत.

तेव्हा फ्लॉरेन्स बाहुल्यांचे मोडके भाग एकत्र करून ते जोडीत असे, त्यावर पट्ट्या बांधीत असे, त्यांची मलमपट्टी करीत असे.

जरा मोठी झाल्यावर ती ठिकठिकाणच्या हॉस्पिटल्सना भेटी देऊ लागली. तेथील कार्यपद्धतीचे सूक्ष्म निरीक्षण करू लागली. औषधे बनवणे, रोग्याची शुश्रुषा करणे, त्यांना खाऊ-पिऊ घालण या प्रत्येक बाबतीत तिने स्वत: विचार करून, एक निश्चित धोरण ठरवले. सरकारला व इस्पितळांतील डॉक्टरांना वेळोवेळी आपले विचार कळवले. त्यामुळे इस्पितळांच्या बाबतीत तिला अत्यंत तज्ज्ञ मानण्यात येऊ लागले. वेळोवेळी तिचा सल्ला घेण्यात येऊ लागला.

१८५३ साली लंडन येथील हार्ले स्ट्रीटवरील एका अनाथ महिलाश्रमाची सुपरिंटेंडेंट म्हणून तिची नेमणूक करण्यात आली. येथे तिने आपले अनेक विचार प्रत्यक्षात आणले, आतापर्यंतच्या अनुभवांचा व अभ्यासाचा उपयोग केला. हे काम चालू असतानाच मार्च १८५४ मध्ये क्रिमिया देशात युद्ध सुरू झाले.

युद्धात अनेक लोक जखमी होतात, मरतात. जखमी माणसांना नीट औषधोपचार मिळत नाहीत, त्यांची नीट शुश्रूषा केली जात नाही. त्यांचे हाल कुत्रा खात नाही. सैन्यांतील जखमी शिपायांच्या दुर्दैवी हालांचे वर्णन ऐकून फ्लॉरेन्स नाइटिंगेलच्या हृदयात कालवाकालव होई, डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागत. या सैनिकांच्या मदतीला, सेवेला जावे असे तिला वाटे. त्या वेळी तिचा बालपणाचा दोस्त, सिडने हरबर्ट हा इंग्लंडच्या युद्धखात्याचा चिटणीस होता.

त्याने पत्र लिहिले, ''या जखमी सैनिकांची सेवा शुश्रूषा करायला तू तयार आहेस का?''

तिनेही आनंदाने होकार कळवला.

फ्लॉरेन्सचा आनंद गगनांत मावेना. आठवड्याच्या आत तिने ३८ नर्सेस जमवल्या; क्रिमियाकडे प्रयाण केले. ही एक मोठी क्रांती होती. यापूर्वी कुठल्याही स्त्रीने हे धाडस केले नव्हते. सार इंग्लंड तिच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव करू लागले.

सैनिकांसाठी स्कुटरी येथे प्रमुख इस्पितळ होते. तेथील परिस्थिती पाहून कुणीही पळ काढला असता. जखमी सैनिक कुठेही अस्ताव्यस्त पसरलेले आहेत, कुणी कण्हत आहे, कुणी थुंकत आहे, कुणाचे हाड मोडले आहे, कुणाचे डोळे गेले आहेत. तेथेच सगळे विधी. खाण्यापिण्याची नीट व्यवस्था नाही. तशातच आपापसात अचकट – विचकट शिव्यांची देवाणघेवाण. मारामाऱ्या. नरक नरक म्हणतात तो यापेक्षा काय वेगळा असणार?

पण फ्लॉरेन्स नाइटिंगेलने तिथून पळ काढला नाही. स्त्रीला घर

आवरायला शिकवावे लागत नाही, त्याचे शिक्षण तिला उपजतच मिळालेले असते. आपल्या अडतीस सहकाऱ्यांच्या मदतीने तिने प्रथम त्या इस्पितळात स्वच्छता केली, शिस्त आणली. रोग्यांना, जखमींना नीट झोपवले. ''ही कोण बाई आलीय आमच्यात लुडबुड करायला?'' असा काही म्हाताऱ्या सैनिकांना प्रश्न पडायचा. स्त्रियांचा वैद्यकीय मदतीत काही उपयोग होईल, अशी त्यांना स्वप्नांतही कल्पना नव्हती. पण तिने त्या इस्पितळात सुव्यवस्था आणली, रोग्यांना औषधपाणी, खाण्यापिण्याला नीट अन् वेळेवर मिळू लागले. डॉक्टरांच्या भेटी नियमित होऊ लागल्या, वर फ्लॉरेन्सच्या तोंडचे गोड अन् दिलासा देणारे शब्द ऐकायला मिळू लागले तेव्हा मात्र सारेजण तिच्याकडे आदराने पाहू लागले. ही कोणी देवता तर नाही ना अवतरली, म्हणून आपापसात विचारू लागले. रात्री रुग्णांना भेटताना बरोबर ती कंदील घेऊन हिंडत असे,



त्यामुळे तिला 'दीप घेऊन हिंडणारी बाई' (Lady with the Lamp) असे नाव मिळाले. दीप घेऊनच ती हिंडत नव्हती, तर साऱ्यांच्या मनांतील सद्भावनांचे दिवे पेटवून, ती त्यांची अंत:करणे आशेने, प्रसन्नतेने उजळून टाकीत होती.

स्कुटरीची व्यवस्था सुरळित लावल्यावर तिने क्रिमियात जागोजाग इस्पितळे उभारली. तिला आता डॉक्टरांची अन् परिचारिकांची वाण नव्हती. सर्वांचे हात तिच्या मदतीला तयार होते. या सगळ्या रुग्णालयांना ती स्वत: भेट देत असे; त्यासाठी घोड्यावर बसून थंड अन् डोंगराळ प्रदेश तिला तुडवावा लागे.

या साऱ्या अविश्रांत श्रमांनी तिची तब्येत मात्र ढासळली. सारेजण तिला विश्रांती घेण्याचा सल्ला देऊ लागले. पण तो सल्ला तिने मानला नाही. तिच्या

कामात खंड पडला नाही. शेवटी तिला तापाने गाठले.

मित्रमंडळींनी इंग्लंडला परत जाण्याबद्दल विनवणी केली. पण तिने तीही धुडकावून लावली. ''स्कुटरीतून सारे सैनिक बरे होऊन जाईपर्यंत मी परतणार नाही!'' तिने निश्चयपूर्वक सांगितले.

युद्ध संपले. त्यानंतर चार महिने गेले. बहुसंख्य सैनिक स्कुटरींतून बरे होऊन गेले. मग ती इंग्लंडला परतली.

इंग्लंडमध्ये तिची लोकप्रियता शिखराला पोचली. व्हिक्टोरिया राणीने तिचा गौरव केला, तिला एक ब्रोच-म्हणजे छातीवर लावण्याची एक प्रकारची नक्षीदार मानदर्शक पिन् भेट म्हणून दिली. त्या ब्रोचवर 'दयाळू लोक धन्य होत' असे शब्द कोरलेले होते.

क्रिमियातील श्रमांनी तिची तब्येत मात्र खालावली ती कायमचीच. पुढचे सारे आयुष्य ती अंथरुणाला खिळलेलीच होती. पण आजारपण तिला कार्यविन्मुख करू शकले नाही. इंग्लंडमधील व भारतातीलही इस्पितळांत सुधारणा कशा कराव्या, याचे ती सतत मार्गदर्शन करीतच होती. १८६० साली तिने 'नाइटिंगेल ट्रेनिंग स्कूल फॉर नर्सेस' नामक विद्यालय सुरू केले. या विद्यालयानेच आधुनिक परिचर्याशास्त्राचा पाया घातला.

पुढील पन्नास वर्षे हे कार्य अविरत चालू होते. तिच्या कार्याचे महत्त्व ओळखून १८७० साली सातव्या एडवर्डने तिला 'ऑर्डर ऑफ दि मेरिट' ही इंग्लंडमधील सर्वश्रेष्ठ बहुमानाची पदवी दिली. ती घेण्यासाठी उठून सभास्थानी जाणेदेखील तिला शक्य नव्हते, अंगांत तेवढे त्राण नव्हते. त्यामुळे तिच्या घरी पदवी पोचविण्यात आली. अत्यंत थकलेल्या नि अशक्त झालेल्या फ्लॉरेन्स नाइटिंगेलला या बहुमानाचे महत्त्व ते काय असणार? सेवा हेच तिचे ध्येय होते, त्यांत तिने कसूर केली नव्हती. पण तरीही इंग्लंडने आपल्या कार्याचा गौरव केला, याचे समाधान तिला झाल्याखेरीज राहिले नाही. आपल्या क्षीण आवाजात ती म्हणाली, ''फार फार दयाळू आहात तुम्ही.''

तीनच वर्षांनी, १९१० साली १३ ऑगस्टला वयाच्या ९० व्या वर्षी ती मरण पावली.

दयेचा दीप बरोबर घेऊन हिंडणाऱ्या या बाईच्या जीवनज्योतीबरोबर तिच्या हातांतील दिवा मालवला. पण त्याचा प्रकाश हजारों हृदयांतील सद्भावना आजही रुग्णसेवेचा मार्ग उजळवत आहे.

**- शंकर सारडा**

■■

# ओळखा पाहू



**मराठीतील लोकप्रिय कादंबरीकार. तरुणवर्गामध्ये क्रेझ असलेल्या त्यांच्या पुस्तकावर नुकताच चित्रपट निघाला आहे.**

विजेत्यास कोणत्याही पुस्तकाच्या खरेदीवर आकर्षक सवलत देण्यात येईल. ही सवलत फक्त एका खरेदीसाठी राहील.

आपली उत्तरे दिनांक १५ सप्टेंबर २०१३ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल ऑक्टोबर १३ च्या अंकात जाहीर होईल.

## 'जून' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

दादासाहेब फाळके पुरस्कार मिळवणारा ज्येष्ठ खलनायक - प्राण

ओळखा पाहू स्पर्धेचे विजेते - **संपतराव मारणे -**
सरीता एलिगन्स, फ्लॅट नं. ६०५, पु. ल. देशपांडे उद्यानासमोर,
सिंहगड रोड, पुणे. ४११०३०

भीमराव गुंडे, सोलापूर. जगदीश नत्थुजी, वर्धा. प्रज्वल दांडेकर, औरंगाबाद. सुरेश पेटकर, मुंबई. राजेश सरोदे, ठाणे (प.). द.तु. नन्दापुरे, (लोणी) यवतमाळ. प्रकाशवीर आर्य, लातूर. प्रज्ञा घोडेस्वार, जळगाव. हेमा नरगुंदे, स्नेहल फणसे, प्रभा बावडेकर, पुणे. व्ही बालकृष्ण, सुरत.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.




५ वी आवृत्ती

# मंतरलेले बेट

**व्यंकटेश माडगूळकर**

**किंमत : १२०/-रु. पोस्टेज :२५/-रु.**




४ थी आवृत्ती

# द माइंड जिम

**व्यायामशाळा, पण मनाची....**

**अनुवाद - श्याम भुर्के**

**किंमत - २००/-रु.**
**पोस्टेज - २५/-रु.**

आपल्याला 'हे बरोबर हे चूक'ची यादी, किंवा 'हे करा, हे करू नका' चे तक्के नकोत. आपल्याला पुस्तके, पुरेसा वेळ आणि शांततेची गरज आहे. तत्त्यावरून ध्यानात ठेवलेले 'हे करू नका' हे आपण चटकन विसरतो पण पुस्तकरूपी 'कोणे एके काळी' वाचलेले कायम स्मरणात राहते

*-फिलीप पुलमन*



# पाहिजेत

## पुस्तक प्रकाशन संस्थेत पुढील जागा त्वरित भरावयाच्या आहेत

### संपादक ('ग्रंथजगत' मासिक) (१ पद)

**मासिक वेतन :** १०,०००/- ते १२,०००/-

**पात्रता :** मराठी भाषेचे उत्तम ज्ञान, पेजमेकर, कोरल ड्रॉ, ले-आऊटचे, एम.एस.ऑफिसचे ज्ञान आवश्यक.

### डीटीपी ऑपरेटर - महिला उमेदवार

**मासिक वेतन :** ९,०००/- ते १०,०००/-

**पात्रता :** मराठी भाषा व व्याकरणाची उत्तम जाण, कॉम्प्युटर विशेषत: पेजमेकर, कोरल-ड्रॉ, फोटोशॉपची माहिती असणे आवश्यक.

### Godown Incharge - Male (1 Post) Salary : 8,000/-

Skills : Graduate, Knowledge of MS-Office,
Prior experience in book shop will be preferred.

### Telephone Operator - Female (1 Post) Salary : 6,000/-

Skills : Graduate having good communication skills, Smart & Active.

**प्रकाशन संस्थेतील उमेदवारांना विशेष प्राधान्य दिले जाईल.**

## Mehta Publishing House

1941, Sadashiv Peth, Madiwale Colony, Opp.
Bajirao Road Telephone Bhavan, Pune - 411030.

Send us your updated resume along with photograph
to above Address or
**e-mail to hr@mehtapublishinghouse.com**







साहित्य क्षेत्रातील संस्मरणीय आनंदयात्रा -

# मेहता मराठी ग्रंथजगतचा
# दिवाळी अंक २०१३

या अंकात आपल्या वाङ्मयीन सर्कलबद्दल,
अनुभवांबद्दल लिहिणार आहेत खालील मान्यवर -

- डॉ.द.भि.कुलकर्णी
- डॉ. श्रीपाल सबनीस
- डॉ. अनुराधा औरंगाबादकर
- डॉ. आनंद पाटील
- प्रा. अनंत मनोहर
- स्वाती चांदोरकर
- अंजनी नरवणे
- डॉ. संजय ढोले
- न्या. एस.व्ही.नाईक
- शकुंतला फडणीस
- शंकर सारडा
- महावीर जोंधळे
- संजय भास्कर जोशी
- मंजूषा आमडेकर
- डॉ.संतोष मुळावकर
- श्याम भुर्के
- डॉ. वासुदेव मुलाटे

आणि इतरही अनेक

**किंमत**
**१००रु.**

ऐन दिवाळीच्या आनंदात भर टाकणारा वाङ्मयीन उत्सव

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 August 2013

## आगामी

# सोनिया गांधी

एक अनन्य साधारण जीवनप्रवास




भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर सोनियांचा उदय कसा झाला आणि त्यांनी लक्षावधी भारतीयांची हृदये कशी जिंकली, याची मनोवेधक कहाणी.

सोनियांची ही कहाणी गेल्या चार दशकांमधील कोणत्याही जागतिक पातळीवरील नेत्याच्या परिवर्तनाच्या प्रवासाचे प्रतिनिधित्व करणारी आहे.

वैयक्तिक स्वरूपाच्या राजकीय महत्त्वाकांक्षेपेक्षा प्राप्त परिस्थिती आणि आयुष्यात घडलेली दारुण शोकांतिका या दोन गोष्टींमुळे सोनियांची राजकारणाच्या मार्गावरील वाटचाल सुरू झाली....

आपल्या सासूबाई – इंदिराजी आणि पती राजीव गांधी यांच्या अमानुष हत्येनंतर सोनियांचे व्यक्तिमत्त्व बदलून गेले. त्या खंबीर, कणखर व ठाम विचारांच्या बनल्या, पण त्या पूर्वीपासूनच अत्यंत मितभाषी होत्या आणि तशाच राहिल्या. आता त्या आघाडी सरकारच्या अध्यक्ष बनल्या आणि

BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ____________________

____________________

____________________

____________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.